दुसरें हिंदूधर्मप्रसिद्धीकरण.

जान् उइल्सन कृत.

A

SECOND EXPOSURE

OF THE

HINDU RELIGION;

IN REPLY TO

NARÁYANA RÁO of SATÁRÁ:

INCLUDING STRICTURES ON THE VEDÁNTA.

BY THE

REV. JOHN WILSON.

BOMBAY:

SOLD BY W. CHAPMAN, AMBROLIE.

1835.

Lithographed by R. PRERA,—Agiaree Lane.

TO

JAMES FARISH Esq.

OF THE BOMBAY CIVIL SERVICE,

THE FOLLOWING SMALL WORK

IS AFFECTIONATELY AND RESPECTFULLY

INSCRIBED

BY THE AUTHOR.

दुसरें हिंदूधर्मप्रसिद्धिकरण.

मोरभट्टदांडेकरास जें म्या पूर्वी उत्तर दिल्हें त्या हिंदुधर्मप्रसिद्धिकरणांत म्यां आपली इच्छा अशी स्पष्ट दर्शविली होती कीं त्याजवर कोणी कधींहि उत्तर दिल्हें असतां त्यास प्रत्युत्तर द्यायास मी सिद्ध आहें. असें म्या लिहिलें होतें त्याचें कारण असें आहे कीं जितके जितके मोठे विचार धर्मप्रकरणी माझे आढळण्यांत आले तितक्यां विषयीं जें सत्य तेंच मी बोललों असा माझा निश्चय होता. अ[illegible]रवी मला असें कळून आलें कीं हिंदुधर्मस्थापनेबिषयीं कोणी जेवढा प्रयत्न करील तितका त्या धर्माच्या खोटेपणाच्या अधिक आणि स्वच्छ निर्देशास कारण होईल आणि असे प्रयत्न करणारे आणि जे

कोणी

कोणी पुढें हीं उत्तरें प्रत्युत्तरें वाचतील ते सर्व त्यांतील
दोषादोष पाहून ईश्वरी कृपेने कदाचित् ख्रीस्ती धर्म स्वी-
कारितील. असा माझा विचार असतां मग मांझ्या हिंदू-
धर्मप्रसिद्धिकरणास उत्तर स्वदेशधर्माभिमानी ह्मण-
जे नारायणराव याने दिल्हें ह्मणून मला त्याचा खेद मा-
नायास कांहीं कारण दिसत नाहीं तें उत्तर कसेंहि असो
आणि त्याच्या लिहिणाराचें सामर्थ्य कसेंहि असो परंतु
मला असें वाटतें कीं त्यांतून माझ्या मनांत जो अभिप्रा-
य आहे तो अनायासाने निघतो अणखी त्याची योग्य-
ता सांगितली असतां अवघड प्रसंगीं हिंदूधर्म ज्या स्था-
नीं आश्रय पावतो त्या स्थानाचा नाश होईल.

स्वदेशधर्माभिमानी याचा लाहन ग्रंथ पाहून अ-
सें मला कळून आलें कीं जो बहुत दोषप्रक्षेप म्या हिंदू-
धर्मावर केला त्याचा शोध करून त्याचें निवारण क-
रायास त्याने यत्न केला नाहीं. हें माझ्या ध्यानांत येऊ-
न आणि जी विद्या व ईर्ष्या प्रतिवादीस आहेत त्याहि
लक्ष्यांत आणून म्या असें अनुमान केलें होतें कीं हिं-
दूधर्माचा पक्ष धरायास त्याला इच्छा आहे परंतु त्याचें
स्थापन करायास तो समर्थ नाहीं. "जो हिंदुधर्म यावि-
"षयींचे पुस्तकांत जे पाद्रींस दोष भासतात ते त्या म-

तांत

"तांत जे प्रवीण आहेत ते चांगल्या रीतीने निवारण करि-
तात" असें जें नारायणरावानें लिहिलें तें जरी म्या पाहि-
लें तरी तेंच अनुमान म्या केलें. "बहुभाषणानें मन जिं-
"कण्या करितां भुलतापा देऊन बाटवणे या दुर्वासने-
"वांचून दुसरें कांहीं एक नाहीं" असें जें प्रतिवादीने लि-
हिलें आहे तें पाहून आणि जो वादविवाद झाला त्यामुळें
सर्वत्र हिंदूधर्माविषयींचे संशय लोकांच्या मनांत येत
आहेत हें पाहून आणि मला प्रत्युत्तर द्यायास कांहीं लो-
कांचा यत्न व्यर्थच झाला तें पाहून आणि धोपट मार्ग
सोडून अडमार्गावर विवाद होण्याच्या समयीं नाराय-
णराव गेला हेंही पाहून म्या मागील सांगितलेलें अनु-
मान केलें. जो युद्धप्रसंगीं नावाजून त्याच्याने तरवार क-
रवत नाहीं तो अशक्त दिसतो.

"ह्या देशांत बहुतकरून कांहींच शोध न करितां आ-
"ई बाप गुरु यांच्या वचनावर विश्वास ठेऊन धर्मप्रमाणा-
"विषयीं नझटतां आचरण करितात" असें जें म्या लिहि-
लें होतें त्याविषयीं नारायणराव कबूल होत नाहीं आणि
ही रीत हिंदूलोकांतच विशेष आहे असें नाहीं ख्रीस्ती लो-
कांत ही आहे असें ह्मणतो. आईबाप गुरु यांजपाशीं ज्ञा-
नाचा शोध होण्याकरितां ख्रीस्ती लोक जातात ही गोष्ट

खरी

खरी आहे परंतु नुसताच भार त्यांजवर ठेवितात असें अगदीं नाहीं. जे ख्रीस्ती लोक ख्रीस्ती नामास योग्य आहेत त्यांपासून जी आज्ञा आहे ती उत्पन्न व्हावयास त्यांपासून कारण होतें. सर्वांस ख्रीस्ती धर्मपुस्तकांत आज्ञा केली आहे कीं त्यानीं तें पुस्तक वाचीत व त्याचा अभ्यास करीत असावें. ख्रीस्ती धर्माचीं प्रमाणें आहेत त्यांची त्यानीं चौकसी करावी आणि तीं कसकसीं आहेत याचा विचार त्यानी फार लक्ष्य देऊन करावा. बुद्धिमान् व विद्वान् अशा पुरुषांनी जे ग्रंथ केले आहेत त्यांत ख्रीस्ती धर्मांवर दूषणें देणाऱ्या माणसांच्या दूषणाचें निवारण केलें आहे आणि जीं भलीं मनुष्यें आहेत तीं ते ग्रंथ मान्य करितील असे ते योग्य आहेत. ते ग्रंथ हे ख्रीस्ती लोक दाखवितात परंतु हिंदूलोकांमध्यें असें नाहीं राममोहनराय ह्मणतो कीं "ब्राह्मणांतील व इतर हिंदुजातींतील जे बहुतेक "मूर्तिपूजक धर्म आचरतात त्या धर्माचें स्थापन करायास ते केवळ शक्तिहीन आहेत. त्याविषयीं त्यांस कांहीं प्रश्न केला ह्मणजे त्यानी आपल्या धर्मसंरक्षणार्थ कांहीं "योग्य कारणें सांगावीं तीं त्यांस वाटतें कीं आपले पूर्वज "असेंच करीत आले हे सांगावें ह्मणजे पुरे". सामान्य लोक सर्व ठिकाणीं ह्मणतात कीं आमच्या आईबापानी व गु-

रू-

रूनीं जें सांगितलें आहे त्यापेक्षां आह्मास हिंदूधर्माविषयीं अधिक कांहीं ठाऊक नाहीं. त्यांस वेद वाचायास किंवा श्रवण करायास आज्ञा नाहीं. ब्राह्मण हे ईश्वराचें मुख असें त्यानी मानावें नाहीं तर त्यांस मोठें शासन होईल. ते जर कदाचित् ब्राह्मणाविरुद्ध बोलले तर त्यानी त्यांचे पाय धरून त्या दोषांवाचून मुक्त व्हावें. जर त्यानी एकाद्या ब्राह्मणाचें वाईट इच्छिलें तर त्यांच्या घशांत शिसें कढवून घालावें असें मनूचें वाक्य आहे. याप्रमाणें त्यांस आपल्या कल्याणाचे विचार करण्यास प्रतिबंध आहेत. सांप्रत भूदेवांची हि चांगली अवस्था नाहीं. त्यानी वाचावें असें आहे तरी त्यानी त्यावर विचार करावे असी त्यांस आज्ञा नाहीं गीतेंत असा प्रसिद्ध श्लोक आहे.

श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात्।
स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः।

"आपला धर्म जरी वाईट असला तरी तो दुसऱ्याच्या धर्मा-
"पेक्षां चांगला ह्मणून तोच धर्म आचरीत असावा स्वध-
"र्मांत मृत्यु आला असतां चांगलें कांकीं दुसऱ्याचा धर्म भ-
"यावह आहे." हिंदुधर्म शोधरहित आहे असें ह्मणतां येतें कांकीं जो कुकर्म करितो त्यास सत्याचा त्रास असतो व त्याचे कर्मांवर दूषण दिल्यावांचून तो सत्य मार्गास येत ना-

हीं

हीं हें जें ख्रीस्ताचें वचन त्यावरून हे लोक आपले ग्रंथ अंधकारांत ठेवावयास कां प्रयत्न करितात?त्याचें कारण दिसतें.ज्या काळीं सर्व मनुष्यें या धर्माचा शोध करूं लागतील आणि सत्याविरुद्ध असें जें धर्मांत दिसून येईल तें तीं मान्य करणार नाहींत.असा जो काळ तो जवळ येत आहे असें मी इच्छितों.

"दांडेकराने सर्व मनुष्यें स्वभावेंकरून उद्धत पापी "आणि अज्ञानी आहेत असें लिहिल्यामुळें पाद्री साहेब म्ह- "णती याजकरितांच या देशाचे लोक मिथ्या धर्माविषयीं "प्रवृत्त आहेत" असें नारायणरावाने लिहिलें.परंतु गोष्ट असी नव्हे.सर्व मनुष्यें स्वभावेंकरून उद्धत पापी आणि अज्ञानी आहेत याजकरितां हिंदूधर्म मिथ्या आहे असें म्या ह्मटलें नव्हतें परंतु पुढील वाक्याप्रमाणे म्या लिहिलें होतें- "सर्व मनुष्यें उद्धत पापी आणि अज्ञानी आहेत असें अ- "सतां जर मिथ्या धर्मावर निश्चय होऊन या धर्मेंकरून आ- "ह्मी मुक्त होऊं थाप्रमाणे वागून खऱ्या धर्मांत शिरायास "न इच्छितील तर आश्चर्य कां मानावें" माझे शब्द नारायणरावाने नीट काढिले नाहींत.इतक्यांत त्याने स्वेच्छेने चूक केली असें मी बोलणार नाहीं परंतु धर्म प्रकरणीं विवाद केला असतां दुसऱ्याचें मत्त शुद्ध रितीने सांगावें ला-

गतें

गतें असें मात्र ह्मणतों.

ज्या गोष्टी नारायणरावाच्या वहीच्या प्रस्तावनेंत लिहिल्या आहेत त्या सोडून जीं प्रमाणें त्याने स्वमत्ताच्या स्थापनार्थ काढलीं त्यांजवर लक्ष्य लावितों.त्याप्रमाणाचे संक्षेप पुढील वाक्यानुसार आहेत- अन्य देशांत जे धर्म प्रवृत्त आहेत त्यांचे तत्वसिद्धांत एकच आहेत.ख्रीस्ती धर्माविरुद्ध जो दोषप्रक्षेप लोक करितील त्याचें निवारण ज्या रितीने होईल त्या रितीनें जो दोष प्रक्षेप हिंदूधर्माविरुद्ध त्याचें निवारण होईल.हेंच नारायणरावाचें मत आहे त्याचा नाश करावा लागतो.

अन्य धर्मांत तत्वसिद्धांत एकच आहेत त्याचें प्रमाण दाखवावयासाठीं नारायणरावाने ही पुढील पद्धति लिहिली आहे.

"ईश्वर एक	" ईश्वर एक तो ईश्वर
	"नित्य
	"आदिमध्यांतरहित
	" सर्वव्यापी
	"ज्याचा आकार अगोचर व अनि-
	" र्वाच्य
"तो स्वरूप व गुण	" सर्वज्ञ
"यांहीं करून ओ	

“ळखावा	“ज्याचें अनंत शक्तियुक्त कर्तृत्व
	“सत्वगुणी :
	“पूर्णकरुणाकर
	“सर्वकर्ता
	“अनंत बंह्मांड नायक
“उपासनेचा पर्याय	“उपासनेचा पर्याय
“इष्ट”	“पुण्य फळ व मोक्ष”

“ज्या देशांतील लोक आपला धर्म ईश्वरनिर्मित आहे अ-
सें ह्मणतात तो धर्म हि या तत्वसिद्धांतास अनुसरून आहे”
असें नारायणराव ह्मणतो. आपलें मत्त समजावयासाठीं
त्याने दृष्टांत सांगितला आहे खरा परंतु मत्ताचें स्थापन त्या-
नें केलें नाहीं “धर्माचीं उदाहरणें ध्यानांत आल्याने असें अ-
“नुभवास येईल कीं एक धर्म मात्र खरा आहे. ज्या धर्माची
“प्रवृत्ति जगांत चालत आली त्यांच्या सिद्धांतात बहुत वैप-
“रीत्य आहे. त्यांतून कांहीं धर्म देवाची स्तुति आणि कांहीं दे-
“वाचा अपमान प्रगट करितात आणि कांहीं त्यांतून एक दे-
“व व कांहीं बहुत देव मानितात. देवाच्या गुणांविषयीं यां
“मध्यें बहुत अंतर पडतें त्यांतून कांहीं एक ह्मणतात कीं दे-
“व प्रथम निर्गुण होता आणि कांहीं धर्म ह्मणतात कीं तो
“अचल असतां त्याला प्रारंभापासून सर्व चांगले गुण आ-
हेत

“हेत. कांहीं एकांच्या मतें देवाच्याने पाप करववत नाहीं कां-
“हीं एकांच्या मतें असें आहे कीं जरी त्याने पाप केलें तरी त्या-
“ला पाप लागत नाहीं. कांहीं एकांच्या मताने मूर्तिपूजेने दे-
“व संतुष्ट होतो आणि कांहीं एकांच्या मताने मूर्तिपूजेसारि-
“खें दुसरें कांहींच जगांत कुत्सित नाहीं. जगाची उत्पत्ति व
“स्थिति या विषयींचें अनेक धर्मामध्यें अनेक प्रकारचें व-
“र्णन आहे. कांहीं एकांच्या मताप्रमाणे मनुष्यात्मा देवांश
“आहे कांहीं एकांचें मत देवात्मा व मनुष्यात्मा अगदीं निरा-
“ळा आहे. कांहीं धर्म सांगतात कीं जन्मकालीं मनुष्य पा-
“परहित आहे कांहीं सपाप सांगतात. कांहीं जाती वर्ण मा-
“नितात कांहीं ह्मणतात कीं सर्व एकापासून निर्माण झाले
“ह्मणून बंधुत्वामुळें अन्योन्य प्रीति असावी. कांहीं एकां-
“ची उक्ति असी आहे कीं मनुष्यापासून पुण्य होतें कांहीं-
“एकाची उक्ति देवाच्या कृपेकडून मात्र होतें. कांहीं एकांच्या
“मतें मनुष्यास अनेक जन्म होतात कांहीं एकांच्या मतें
“मरणानंतर दुसरें जन्म होत नाहीं. जितके धर्म आहेत
“तितक्यांच्या मताप्रमाणें अनेक धर्म खोटे आहेत.” ह्या
ज्या गोष्टी अगोधर म्या लिहिल्या होत्या त्याचें उत्तर ना-
रायणरावाने कां केलें नाहीं ? मला फार आश्चर्य वाटलें
आहे कीं त्याने ह्या गोष्टी पाहून आणि ब्रह्मा विष्णु शिव
यांचें

यांचें हिंदूशास्त्रांतील जें वर्णन त्यापासून जो भगवानाचा अपमान होतो आणि ज्या विषयीं म्या अगोदर विचार केला तें पाहून नुस्तेंच आपलें मत प्रमाणा वांचून लिहिलें आहे. ज्या गोष्टी त्याच्या पद्धतींत लिहिलेल्या आहेत त्या विषयीं हिंदूधर्मप्रकरणीं जर मी अधिक गोष्टी प्रसिद्ध करणार तर उपयोगी होईल असी माझी खातर आहे.

हा विचार मनास येऊन मी पुढील अभिप्राय सांगतों. त्याजवर हिंदूलोक जर लक्ष्य लावितील तर बरें होईल. धर्माच्या गोष्टी समजायास आणि धर्म अनुसरावयास असा अधिकार देवाने मनुष्यांस दिल्हा आहे आणि सर्व मनुष्यांस तो आपल्या कर्मांनी आणि चलनवलनाने बोध देत असतो. असें असतां मनुष्यें देवाविषयीं कांहीं मत व भीड धरणार नाहींत असें कदापि होणार नाहीं. देवाचें अस्तित्व व गुण व राज्य यांविषयीं आणि मनुष्याचा स्वभाव व सार्थक व परिणाम यांविषयीं त्यांस बोध मिळतो आणि त्या विषयीं संप्रदाय आहे. सत्य व पवित्र रितीने वर्त्तावें असें त्यांस हृदयांतील विचारापासून कळून येतें. असें असतां सर्व राष्ट्रांमध्यें कांहीं गोष्टींविषयीं साम्य असेल. परंतु भगवान व मनुष्यांसंबंधी जो अन्य शास्त्रांप्रमाणे सिद्धांतांतील भेद आहे त्याविषयी जें

जें अनुमान करावें त्याचें निवारण होत नाहीं. शास्त्रांच्या सिद्धांतांतील भेदावरून असें अनुमान करावें कीं सर्व शास्त्रें देवापासून आलीं नाहींत. जें सत्य आहे तें मात्र देव बोलेल. त्याचें वाक्य निरनिराळें कदापी होणार नाहीं सर्वदां बराबरच लागेल.

ज्या वेळेस दोन उद्देशांचा शोध होत आहे त्या वेळेस त्यांचें साम्य व भेदहि लक्ष्यांत घ्यावी. याविषयीं दृष्टांत कोणी मनुष्य असें जर बोलेल कीं नारायणरावाची आणि वानराची योग्यता एकच आहे आणि ह्या गोष्टीच्या स्थापनेसाठीं पद्धति लिहील तर तो आपला अपमान मात्र करील. दोघांचींहि तोंडें व डोळे व कातडी हीं एकच आहेत आणि दोघांसहि खातां पितां येतें ह्मणून दोघांची योग्यता बराबरच आहे असें जर ह्मणेल, तर त्यांचें मूर्खत्व पाहून त्याला फारकरून उत्तर मिळणार नाहीं. त्याला उत्तर जर मिळेल तर यासप्रमाणें होईल- अरे मित्रा जो भेद नारायणराव आणि वानराचा आणि विशेषें करून जो भेद त्यांच्या मनांत व स्वभावांत आहे तो तुह्मी लक्ष्यांत घेतला नाहीं तो भेद पाहून नारायणराव वानरापेक्षां फारच थोर दिसतो असें आहे.

ह्या दृष्टांताप्रमाणे नारायणाने ख्रीस्ती धर्म व हिंदू

दू धर्म यांचा विचार केला आहे त्या धर्मांत जें साम्य आहे तें मात्र त्याने पाहिलें आहे. त्या धर्मांत जो भेद आहे तो त्याने पाहिला नाहीं. ज्या गोष्टी त्याच्या पद्धतींत आहेत त्यांविषयीं हिंदूधर्म ख्रीस्ती धर्माविरुद्ध आणि मनुष्याच्या साधारणं बुद्धी विरुद्ध आहे त्यांचें प्रमाण मी सांगेन.

देवाच्या गुणाविषयींच्या गोष्टींचा विचार पहिल्याने करितों.

ख्रीस्ती शास्त्रांत ईश्वर कसा आहे याविषयीं जीं कथनें आहेत आणि जीं अनेक ठिकाणीं अनेक प्रकारचीं सांपडतील त्यांत ईश्वराचें विशेष व उत्तम रितीनें वर्णन केलें आहे. बहुत देव मानणाऱ्या लोकांच्या विच्याराविरुद्ध त्या ख्रीस्ती शास्त्रांत लिहिलें आहे कीं प्रभु असा जो आमचा देव तो एकच देव आहे आणि तो आदिअंतरहित व निरंतर सारखाच आहे व त्याला रूपांतर नाहीं. त्यांत वर्णनानें व उत्तम कृत्यें त्यानें केली असें सांगण्याने देवाच्या स्वभावांत त्या शास्त्रांनी सर्व पूर्णता आणिली आहे. "तो आत्मा आहे" असें त्यांत लिहिलें आहे आणि दुसऱ्या पुरातन पुस्तकांप्रमाणे त्याने जी केलेली सृष्टी तिच्या घोळांत त्यास घालणे व या सृष्टीमध्यें त्याचा अंश

आहे

आहे असें सांगणे व त्यास घर आहे असें ह्मणणे हें ख्रीस्ती शास्त्रांत कथन केलें नाहीं परंतु त्यांत लिहिलें आहे कीं तो आपल्या पराक्रमें करून व शब्देंकरून सर्व सृष्टि उत्पन्न करितो. ते पराक्रम व शब्द असे आहेत कीं त्यांस कांहीं अशक्य किंवा कठीण नाहीं. तो आकाशांत व पृथिवींत आहे व तो सर्व ठिकाणीं आहे. तो सर्वज्ञ आहे त्यास मनुष्याचे विचार व बेत ठाऊक आहेत व त्यांचे मार्ग त्यास पक्के माहीत आहेत व वस्तुमात्राची चवकसी ठेवीत आहे व त्यांस पाहत आहे. तो आपल्या स्वभावांत नामांत वचनांत व कृत्यांत पवित्र आहे तो पाप करीत नाहीं किंवा पाप करायास सांगत नाहीं किंवा तें पाप आपल्या पवित्रतेस विरुद्ध आहे असें दाखविल्याशिवाय तें जाऊं देत नाहीं. त्या शास्त्रांत लिहिलें आहे कीं "तो खडकासारि-
"खा विश्वासास्पद आहे त्याचें करणें पूर्ण आहे कांकी
"त्याचे सर्व मार्ग विचाराचे आहेत." सत्य दोषरहित न्यायी व यथार्थ असा जो देव तो हा आहे. त्यांत असें सांगितलें आहे कीं "तो चांगला आहे कांकीं तो सर्वांस चांगला
"आहे व त्याच्या उत्पन्न केलेल्या वस्तुमात्रावर त्याची करु-
"णा आहे." आणि त्या शास्त्रांत त्याची स्तुति केली आहे कीं "तो दयाभूत व कृपाळू बहुसोशिक परमोत्तम व पर-
म

“मसत्य आहे आणि अन्याय आज्ञाभंग व पाप यांतें क्ष-
“मा करणारा आहे.” तो सृष्टीचा राजा आहे व तो तीतें
चालवितो. तो ह्मणतो कीं “ मी ईश्वर आहें व मजपासीं
“दुसरा देव नाहीं मी मारितों व जीवंत करितो मी घाय
“करितों व मी तिचा परिहार करितों आणि माझ्या हाता-
“पासून जो चुकवील असा एक नाहीं.” त्यांच्या इच्छेप्र-
माणे आकाशलोकीं व भूलोकीं व्यवहार चालला आहे
व तो पवित्रतेकरून तेजस्वी आहे व त्याच्या शक्तीवरून
त्यास भितात व तो चमत्कार करितो. “तो सर्व सृष्टीच्या
“न्यायाधीश तो न्याय व सत्यरितीने सर्व प्रकरणांत चाल-
“तो व प्रत्येक माणसाच्या कर्तृत्वाप्रमाणे त्यास सुखदुःख
“देईल.” त्या शास्त्रांत त्याच्या गुणाचे सारांशांत कथन के-
लें आहे तें मानवी बुद्धीशीं मिळतें तरी त्या बुद्धीकरून त-
सें वर्णन होणार नाहीं असेंहि आहे. आणि देवाने केलेले
असे जे दुसरे ग्रंथ ह्मणतात त्यांत जसें आहे त्याप्रमाणे जीं
कृत्यें व ऐश्वर्य हीं ईश्वराचीं मानून त्याचे आंगाची पूर्ण-
ता कांहीं कमी नकरितां तिची त्या ख्रीस्ती शास्त्रांत वृद्धि
केली आहे. अशीं तीं शास्त्रें विशेष आहेत मनुष्यांची यो-
ग्यता पुर्ती वर्णनं करावयास व त्या वर्णनाची व त्याने के-
लेलीं मोठीं व अनेक अशीं जीं कृत्यें त्यांच्या कथनासीं

बरोबरी

बरोबरी करावयाकरितां किती अवघड असावे या गोष्टी-
चा विचार केल्यावरून आह्मास असें मान्य करावयास
अगत्य होतें कीं ज्यांनी ख्रीस्ती शास्त्रग्रंथ केले त्यांमध्यें
ईश्वर संचरला होता व तें शास्त्र ईश्वराचें वचन आहे.

जें वर्णन हिंदूशास्त्रांत देवाच्या गुणांविषयीं आ-
हे तें वर्णन मागील वर्णनासारखेंच नाहीं. ज्या गोष्टी ना-
रायणरावाने साम्य दाखवायासाठीं काढल्या त्या गोष्टीं-
विषयीं जें वर्णन हिंदूशास्त्रांत मिळतें त्यापासून देवा-
चा मात्र अपमान होतो ही गोष्ट स्पष्ट करण्यासाठीं कांहीं प्र-
माणें सांगतों.

१ पहिलें प्रमाण हिंदूधर्माप्रमाणे सर्व वस्तुमात्र
देवाचा अंश आहे.

हिंदूशास्त्रें जीं आहेत तीं अनेक ठिकाणीं असें सांग-
तात कीं एकच देव आहे परंतु सर्व वस्तू ज्या आहेत त्यांस
देव ह्मणतात. ही गोष्ट सर्वांस कळली आहे ह्मणून त्याचें प्र-
माण होण्यासाठीं फार लिहायाचें अगत्य नाहीं. जें उत्तर म्या
मोरभट्ट दांडेकरास दिल्हें आहे त्यांत त्याविषयीं कांहीं वा-
क्यें आहेत. पुढील वाक्यें उपनिषदांतून कांढितों. मुंडकोप-
निषदांत ह्या प्रमाणे लिहिलें आहे.

अग्नि-

अग्निर्मूर्धा चक्षुषी चंद्रसूर्यौ
दिशः श्रोत्रे वाग्निवृत्ताश्च वेदाः
वायुः प्राणो हृदयं विश्वस्य पद्भ्यां
पृथिवी ह्येष सर्व भूतां त रात्मा.

"त्यांत ईश्वराचा अग्नि मस्तक आहे आणि डोळे चंद्रसूर्य आ-
"हेत आणि दाहा दिशा ज्याचे कर्ण आहेत आणि संपूर्ण वे-
"द ज्याच्या मुखांतील श्वासोश्वास वायू आहेत आणि म-
"हावायू ज्याचे प्राण आहेत आणि विश्वाच्या हृदयस्थानीं
"राहणारा तोच आहे आणि विराटरूपांत ही पृथवी ज्याचे
"पाद सांगतले आहेत हाच सर्व भूतांचा अंतरात्मा आहे"

पुरुष एवेदं विश्वं
कर्म तपो ब्रंह्म परामृतं

"जो परमात्मा पुरुष तोच हें सपूर्ण विश्व आणि कर्म आणि त-
"पश्चर्या आणि वेद आणि उत्कृष्ट अमृत ह्मणजे मोक्ष हीं स-
"र्व तोच आहे."

प्राणो ह्येष सर्व भुजेर्विभाति
विजानन् विद्वान् भवते नातिवादी

"हा प्राण रूपी जो ईश्वर तो सर्वत्र आपल्या हस्तांनी शोभतो
"असें जांणणारा जो विद्वान् तो मिथ्या भाषण करणारा हो-
"त नाहीं (त्याला असा निश्चय आहे कीं ईश्वरा शिवाय कां-

हीं

हीं एक नाहीं)

कठकोपनिषदांत असें लिहिलें आहे कीं

हंसः शुचिषत् वसुरंतरिक्षसद्धोता वेदिषदतिथिर्दुरोण
सत् नृषद्वरसदृतसद्व्योमसदब्जा गोजा ऋतजा अ-
द्रिजा ऋतं बृहत् ॥

"जो अविद्या आणि तत्कार्यजात यांचा नाश करून स्वस्वरू-
"पाप्रत पावतो तो हंसरूपी जीवात्मा आणि तोच हृदयादिरूप
"जे शुचिप्रदेश यांच्याठायीं राहतो आणि तो सकल वस्तुभूत
"ह्मणजे सत्यस्वरूप आणि जो आदित्यादि रूपेंकरून आका-
"शांत राहणारा आणि जो यज्ञांतील होत्राख्य कर्मांचा कर्त्ता
"आणि जो त्रेताग्नि मध्यवर्त्ति वेदीच्याठायीं राहणारा आणि
"जो अतिथिस्वरूप आणि जो ग्रहांच्याठायीं सोमरूपें करून
"राहणारा आणि जो संपूर्ण मनुष्यांच्याठायीं राहणारा आ-
"णि जो स्थावर जंगमात्मक जे श्रेष्ठपदार्थ त्यांच्याठायीं राह-
"णारा आणि जो अवश्य होणारें जें पापपुण्याचें फल त्याचे-
"ठायीं राहणारा आणि ब्रंह्मांड गोलकाच्या अंतर्बहिर्वर्तमान
"जें जें आकाश त्याच्याठायीं राहणारा आणि पंचमहाभूतां-
"पासून विराट्स्वरूपें करून होणारा आणि अस्थि संचया-
"पासून जरायुजादि रूपेंकरून उत्पन्न होणारा तोच परमा-
"र्थतः सत्यस्वरूपी याचें कारण तो देशकालवस्तुपरिछेदर-

हित

“हित आहे.”

ईशोपनिषदांत असें सांगितलें आहे कीं

यस्तु सर्वाणि भूतांना त्मन्येवानुपश्यति

सर्वभूतेषु चात्मानं ततो न विजुगुप्सते

“जो कोणी सर्व भूतांस आपल्या आत्म्याच्याठायीं पाहतो आ-
“णि सर्व भूतांच्याठायीं आपल्या आत्म्यातें पाहतो तेणेंक-
“रून तो दुःखापासून सुटतो.”

छांदोग्य उपनिषदांत असें सांगितलें आहे कीं

सर्वं खल्विदं ब्रह्म

सत्यसंकल्प आकाशात्मा

सर्वकर्मा सर्वकामः सर्वगंधः सर्वरसः

“हें सर्व वस्तुमात्र निश्चयेंकरून ब्रह्मच आहे, जो सत्यसंकल्प
“आकाशात्मा तो सर्वकर्मस्वरूपी आणि सर्वकामस्वरूपी
“आणि सर्वगंधस्वरूपी आणि सर्वरसःस्वरूपी असा आहे.”

आणखी दुसऱ्या उपनिषदांत ह्याप्रमाणे उपदेश आ-
हे

“जें विश्वाचें सर्वशक्त सर्वज्ञ जीवदायक कारण तें आनंदम-
“य आहे. सूर्यामध्यें आणि नेत्रांमध्यें जो देदीप्यमान पुरुष
“तो तें आहे. आकाश ज्यापासून सर्व निघतात आणि ज्यांत
“सर्व प्रवेश करितात तो तें आहे. प्राण ज्यांत सर्व जातात आ-

... Oriental MSS. Library, ... P.O., ...

“णि सर्व ज्यापासून प्रगट होतात तो तें आहे. ज्योती जें वर्ती
“आकाशांत आणि खालीं पृथिवीवर सर्व ठिकाणीं राहतें तें
“तें आहे. अहंकारी अविनाशी आनंदमय जो प्राण तो मी
“आहें असें जें इंद्रानें प्रतर्दनाला सांगितलें तो तें आहे.”

सर्व वस्तुमात्र देव आहे ह्याविषयीं वेदांतील आणि शा-
स्त्रांतील आणि उपनिषदांतील मतें सारखींच आहेत. वेदां-
तांतील मत जे धरितात ते असें बोलत असतात कीं च्यार
जीं महा वाक्यें तीं वेदांत आहेत. तीं वाक्यें असीं आहेत. ऋग्वे-
दापासून ब्रह्मेति, सामवेदापासून तत्वमसी, यजुर्वेदापासून
अहं ब्रह्मास्मि, अथर्वणवेदापासून अयमात्मा ब्रह्मेति.

सर्व वस्तुमात्रांत देव आहे असें जें मत तें अशुचिभू-
त सृष्टिज्ञानविरुद्ध तसेंच श्रुतदृष्टपदार्थांच्या विरुद्ध आणि
ज्यांहींकरून ईश्वराचें महत्व आच्छादित होतें आणि मनु-
ष्याचें अतिशय अनहित होतें असें तें वाटतें त्या मताचा
स्पष्ट विच्चार केल्यानंतर जे सिद्धांत निश्चय होतात तेथें आ-
पण कांहीं लक्ष देऊं चला.

१ सर्व वस्तुमात्रांत देवाची व्याप्ति आहे अशा मतेंक-
रून ईश्वराचें आत्मत्व जें स्पष्ट वादावरून सिद्ध होतें त्या-
चें खंडण होतें अथवा सर्व वस्तू ज्या दृष्टीस पडतात त्या
मिथ्या असें दर्शवितें सर्व पदार्थमात्र ईश्वर प्रकृतीचे अं

श आहेत असें ह्मटलें असतां प्रत्यक्षेंकरून असा सिद्धांत होतो कीं ईश्वर द्विभागिला जातो त्याचे तुकडे व रक्षा होती व तो पृथ्वीवर प्रसृत होतो मिश्र होतो त्याचीं अनेक स्वरूपें होतात आणि तो असंख्य प्रकारें बदलला जातो. ह्या सर्व गोष्टी मायारूपी असें ह्मटलें असतां साधारण बुद्धीस आणि खऱ्या विद्येस अगदीं बिपरीत होतें. देव फसवलेला आणि फसवणारा आहे असें ह्या हिंदूमतावरून दिसतें वाहवा जी वाहवा.

२ कोणताहि पदार्थ गुणेंकरून किंवा संबंधेंकरून आणि परतंत्रतेकरून यद्यपि विरुद्ध आहे तथापि त्या वेदांतमताप्रमाणे वस्तुमात्रांस देवाचें नाम द्यावें असें त्या मताप्रमाणें निश्चित होतें. तेणेकरून मनुष्यांस बुद्धीचे व नीतिज्ञानाचे विरुद्ध आपणच ईश्वर व ईश्वराची भक्ति आदिकरून सन्मान आपणांसच योग्य असें ह्मणायास आश्रय मिळतो. त्या मताच्या एक्या वाद्याने असें लिहिलें आहे कीं "स्व-
"र्गांतील कित्येक देव अनेक वेळां बोलिले कीं आह्मी स्व-
"तंत्र देव आणि भजनीय हि आहों, परंतु ह्या ह्मणण्यास
"त्यांची स्वतांचीच कल्पना आणि ईश्वरध्यानीं तल्लीनता,
"कारण होय. वेदांतांत असें ह्मटलें आहे कीं इंद्र आपणा-
"स देव ह्मणविनो त्यास वेदाचा आधार आहे जे कोणी ई-

ईश्वर

"श्वरध्यानीं निमग्न झाल्यामुळें मीपण विसरतात त्यांनी आप-
"णास परमेश्वर असें खुशाल ह्मणावें. वामदेवाने अहंपणा
"विसरल्यामुळें ह्मटलें कीं म्यां सूर्यचंद्रातें निर्माण केलें त्या
"सारखे पुरुष भतिब्रह्मदेव आहेत यास्तव स्वर्गवासी सर्व दे-
"वानी तसेंच सर्व मनुष्यानी ईश्वरध्यानीं निमग्न झाल्यामुळें
"आपणास परमेश्वर ह्मटलें आहे कारण कीं वेदवाक्य असें
"आहे कीं जेव्हां तुह्मी अहंपणा विसरतां तेव्हां तुह्मी वास्तवीक
"तो देव आहां आणि हे देवा मी तुजवांचून कांहींच नाहीं टीका
"ग्रंथकारानी हि तसेंच ह्मटलें आहे कीं मी खऱ्या देवाशिवाय
"कांहींच नाहीं आणि मी पवित्र ज्ञान अक्षय गुणेंकरून शु-
"आहें आणि स्वभावेंकरून मी जगविकारापासून मुक्त आहें"
(राममोहनराय) हे जे सिद्धांत ज्या मताचा विस्तार करितो त्यापासून निश्चित होतात किंवा त्यांतच आहेत तेहि बुद्धीच्या विरुद्ध आणि अधर्मी आहेत आणि जेव्हां आपणास ईश्वराचे अंश असें मानितात आणि जेव्हां ते सरळ किंवा चांगल्या रीतीनें ईश्वराचीं मोठीं कामें आपण केलीं असें समजतात आणि जेव्हां ते परात्पर जो भगवान त्याची स्तुति करण्याच्याठिकाणीं कांहीं स्तुति करितात तेव्हां त्यांच्या कल्पना साधारण बुद्धीपासून उद्भवल्या हें निश्चित आहे.

३. अशा मतास अनुसरून लोकानी जसा ईश्वरी गुणा-

चा

चा मानभंग केला आहे त्याचप्रमाणें मनुष्यास अयोग्यपदास चढविलें आहे त्यांत संशय नाहीं. मनुष्य जर अज्ञानी आहे तर देवंहि अज्ञानी आहे मनुष्याचा अशक्तपणा देवासहि लागतो मनुष्याचें मूर्खपण देवाकडे येतें मनुष्याचे विकार देवाकडे येतात मनुष्याचें पाप देवास लागतें आणि मनुष्याचें दुःख देवाकडे येतें. पशुजातींतहि देवाचे गुण येतात तर नीती ज्ञानाचें अगत्य आणि विश्वास नाहींत. जें कांहीं घडतें तें मग देवच करितो जो सर्व एकच आहे.

एथें जो दोष त्यामतावर आणिला आहे तो आच्छादित [illegible] प्रकरणीं ज्यानी ग्रंथ केले त्यानी व्यर्थंच सूक्ष्म भावांतील भेद धरिले आहेत त्याविषयीं दृष्टांतास्तव असें प्रतिपादन केलें आहे कीं त्यांत जीव बुद्धि आणि परमात्मा आहे आणि अज्ञान अशक्तपणा मूर्खपणा विकार पाप आणि दुःख इत्यादिक जीव आणि बुद्धि इत्यादिक त्याच्या प्रकृत्यांशास लागतात ह्या वादाने संशय फिटत नाहीं. ईश्वर सर्व वस्तुमात्रांत आहे अशा मतावरून जीव आणि बुद्धि हेहि ईश्वराचे अंश आहेत. आणि जसें जसें त्यांचें रूपांतर आणि भिन्नता होतात त्याप्रमाणे ईश्वरी गुणहि बदलतात असें होतें. मनुष्याचें भ्रम मिश्रित आहे असें जें मत त्याशीं त्याचा बोधक अहंकार आणि मनन इत्यादिक ज्ञानामुळें मिळत नाहीं.

ईश्वर

ईश्वर सर्व वस्तुमात्रांत आहे अशा मतावरून जो ईश्वरी गुणाचा अपमान होतो तेणेकरून त्याच्या नीति मत्वाचाहि अपमान होतो ह्या ठिकाणीं त्या मताचा विचार केला असतां त्याचा स्वत्र कंटाळा येतो. त्या मताप्रमाणे मनुष्य हें देवाचा सेवक आहे असें होत नाहीं कांकीं ब्रह्मसूत्र आणि दुसऱ्या वेदांताच्या ग्रंथांत असें सांगितलें आहे कीं "जीव तो ब्रह्माचा अंश आहे आणि जो संबंध जीव ब्रह्मांशीं आहे तो संबंध धनी आणि सेवक यांचा नाहीं परंतु महत् आणि अंश यांचा आहे." आणि जी शिक्षा होती ती ईश्वराच्या स्वतःसिद्ध पवित्रतेचा आणि त्याच्या पापद्वेषाचा प्रत्यय आहे असें मानूनये परंतु अनियमित अरिष्टाची गोष्ट आहे असें समजावें.

२. दुसरें प्रमाण ब्रह्म सर्व वस्तूंत आपणाला कोणत्या रीतीने प्रगट करितें ह्याविषयीं जें वर्णन हिंदूशास्त्रांत आहे तें फार उपहासास्पद आहे.

हिंदू धर्मांप्रमाणे ब्रह्म निर्गुण आहे. कल्पाच्या प्रारंभीं तें आकुंचित होऊन इतकें लाहन होतें कीं त्यामध्यें सुईचें अग्रहि शिरत नाहीं आणि त्यास संकल्प इच्छा किंवा आभ्यंतर विचार नाहीं. जें नियमित आहे परंतु जें बुद्धीस विरुद्ध आहे तें व्हावयास चुकत नाहीं असी जी रीती तीवरून माया

जी

जी ब्रह्मांत असती ती चलन पावती. नंतर ब्रह्माला अहंकार होतो. आणि मायेचे जे सत्व रज तम हे तीनहि गुण क्षोभ पावतात. तेणेंकरून ब्रंह्म फुगूं लागतें नंतर सत्वगुणापासून उदक उत्पन्न होतें आणि ब्रह्माचें तें प्रथमचें अयन ह्मणून तें नारायण होतें. ब्रह्म उदकांत बीजारोपण करितें त्यापासून कांचनासारिखें अंड उत्पन्न होतें. विश्वकर्म्याच्या एक वर्षपर्यंत तें अंड डबेंत राहतें नंतर त्यांपासून ब्रंह्म्याच्या रूपानें ब्रह्म उत्पन्न होतें. त्या अंडाचे जेव्हां भाग होतात तेव्हां वरचा भाग आकाश होतो आणि खालचा भाग पृथ्वी होतो. हें सर्व होतें किंवा यानंतर काय होतें तें कोणास समजत नाहीं कांकीं शास्त्रांची भिन्न भिन्न मतें आहेत परंतु ईश्वरापासून सर्व पदार्थ उत्पन्न झाले आहेत ते असे कीं सुतेज्यापासून जसें जाळें उत्पन्न होतें तसे. परंतु ही सर्व माया आहे जंवपर्यंत ईश्वर जागृत आहे तंवपर्यंत ते पदार्थ आहेत. जेव्हां त्याची रात्र होती आणि त्यास आपली विस्मृति होती आणि आकुंचित होतो आणि जेव्हां त्याचा अभाव होतो तेव्हां सर्व पदार्थ त्यांत मिळतात. मग तो निद्रा घेतो तों इतका वेळ कीं वर संक्षिप्त जें कथन केलें आहे त्या प्रमाणे पुनः करावयाचें त्याला अगत्य पडे तेथपर्यंत.

जें वर्णन देवपणाविषयीं हिंदूशास्त्रांत केलेलें आहे

तें फार क्लेशदायक आहे. "ईश्वर" असें नाम ज्याला नारायणराव देतो त्याचें चलन निर्बुद्ध आणि भ्रांत देवाप्रमाणें होतें आणि त्या देवाविरुद्ध कांहीं करावयास त्याला इच्छा नाहीं आणि शक्तिहि नाहीं. ज्याला "नित्य" असें सांगितलें आहे तो हिंदूधर्माप्रमाणें आपल्या सर्व कर्माविषयीं आणि गुणाविषयीं फारच चंचल आहे. ज्याला "आदिमध्यांतरहित" असें सांगितलें आहे त्याला त्या धर्माप्रमाणें सर्व वर्णनांत आदि मध्य अंत आहेत. ज्याविषयीं असें सांगितलें आहे कीं "त्याचा आकार अगोचर "व अनिर्वाच्य" आहे तो त्या धर्माप्रमाणें सर्वरूपी आहे. ज्याला "सर्वज्ञ" असें सांगितलें आहे तो त्या धर्माप्रमाणें बहुधा कांहीं जाणत नाहीं कांहीं समजत नाहीं आणि मी आहें असें देखील मनांत घेत नाहीं. ज्याला "अनंत शक्तियुक्त" असें सांगितलें आहे त्याला त्या धर्माप्रमाणें साह्येवांचून स्वतः कांहींचं पराक्रम नाहीं. ज्याला "सत्वगुणी" असें सांगितलें आहे तो त्या धर्माप्रमाणें राजसी आणि तामसी आहे. ज्याला "करुणाकर" असें सांगितलें आहे त्याला त्या धर्माप्रमाणें आपणाशिवायं दुसरें करुणापात्र नाहीं. ज्याला "सर्वकर्ता" असें सांगितलें आहे तो त्या धर्माप्रमाणे निद्रा मात्र घेतो जागृत होतो फुगतो आणि आकुंचित होतो. ह्या रीतीने देवाचा अपमान हिंदूधर्माप्रमाणें केला आहे. ही गोष्ट त्रास पावल्यावांचून कोण पाहूं सकतो? जें पा-

प त्यांत आहे त्याची संख्या कोण करील.

३ तिसरें प्रमाण देवांचा सामर्थ्याविषयीं जें
वर्णन हिंदूशास्त्रांत केलेलें आहे तें केवळ
असत्य आहे.

ब्रह्मा विष्णु शिव इत्यादि देव ब्रह्माचे अंशभूत अवता-
र आणि स्वतंत्र राहणारे असे कधीं हिंदूधर्माप्रमाणें मानले जा-
तात. वेदांतमताप्रमाणें ते देव ब्रह्माच्या गुणाचे दृष्टांत सांगि-
तले आहेत ते असें कीं उत्पत्तिसमयीं ब्रह्मा आणि स्थितिसमयीं
विष्णु आणि संहारसमयीं शिव. या दोहों मतांतील पहिलें म-
त पुष्कळ पुराणाच्या वाक्याप्रमाणे आहे आणि जें उत्तर म्या
मोरभट्टास दिल्हें होतें त्यांत असें दर्शविलें आहे कीं जें वर्णन
पुराणांत त्या देवांच्या उत्पत्ति पदवी सेवा आणि गुण यांविष-
यीं केलेलें आहे तें बुद्धिविरुद्ध लज्जाकारक विपरीत अप-
मानदायक मात्र आहे. दुसऱ्या मताप्रमाणें मी आतां सर्वांस
श्रुत करितों कीं जो कोणी त्या वर्णनावर विश्वास ठेवील त्याला
त्यापासून बहुत अनहित होईल. तें वर्णन इतकें असंभावि-
त आहे कीं जो कोणी त्याजवर लक्ष्य लावील तो मात्र भ्रां-
तींत पडेल. वेदांताच्या मताचा अभिमान धरणारा जो राम-
मोहनराय तो ह्या गोष्टीच्या विचाराने मात्र भ्रांतासारिखा दि-

सतो

सतो. त्याने जे संवादरूप ग्रंथ केले आहेत त्यांतील बहुतेकां-
त तो असें लिहितो कीं "देव हे ईश्वरी गुणापासून कल्पित दृ-
ष्टांत उत्पन्न झाले आहेत." परंतु तो अणखी असें लिहितो कीं
"वेदाने प्रथमतः ईश्वरी गुण शक्ति ज्योति आणि महत्तत्वें यां-
"स देवाचे कल्पित अवतार मानिले आहेत त्यांस जन्म मरण
"इच्छा इत्यादिक आहेत असें वर्णन वेदहि करितो." खालीं-
लिहिलेलें वाक्य तो त्यांतून काढून लिहितो त्यावरून मला दि-
सतें कीं त्याच्या मताप्रमाणे देव भिन्न भिन्न आहेत. वेदांतांत
असें वाक्य लिहिलें आहे (पर्व १.५.३.२६." वेदव्यास ह्मणतो
"कीं ब्रह्माचें ज्ञान प्राप्त करून घ्यावें असें देवांनिं त्यांसहि सां-
"गितलें आहे कारण त्या ब्रह्मास जाऊन मिळावयाची इच्छा
"त्यांसहि आहे." मुंडकोपनिषदांत असें वेदवाक्य आहे "जा-
"स सर्व वस्तु सामान्य आणि विशेषें करून माहीत आहेत आ-
"णि ज्याने आपल्या अनंत शक्तीकरून ब्रह्मा आणि ज्यास ना-
"म किंवा आकार आहेत अशा सर्व वस्तू आणि अन्न इत्या-
"दिक सर्व उत्पन्न केलें त्या ईश्वरापासून सर्व उत्पन्न झाले आ-
"हेत."

कल्पीत देव सत्य मानण्यापासून आणि त्यांविषयीं
भाषण करण्यापासून बहुत उपद्रव होतो ह्याविषयीं संश-
य नाहीं. ज्या कथा किंवा दृष्टांत त्यांविषयीं आहेत त्यांतून

कांय

काय उपदेश होतो असें आह्मास पुसायास योग्य आहे. त्यांत
जर कांहीं अर्थ आहे तर त्यांत ईश्वरी गुण दाखविण्याविषयीं
असावा तर त्यांतून काय दिसून येतें? आणि तीं कशाचा
विस्तार करितात? सर्व जें नीच आणि बुद्धिविरुद्ध तसेंच अ-
मंगल तें सर्व तीं दाखवितात. लोकांच्या साधारण कुधर्माचा-
रापासून जें वाईट होतें तें छेदावयाकरितां राममोहनरायाने
भाषण करायाच्यासमयीं देवांच्या अपराधाविषयीं पुढील
वर्त्तमान लिहिलें आहे कीं "शंकरशास्त्री मद्रासेंतील एक विवाद
"करणारा याच्या विचारांस (१४७. १४८. आणि १९०व्या पत्रांत)
"जें मी उत्तर दिल्हें आहे त्यांत कृष्णाच्या व्यभिचाराविषयीं आ-
"णि शिव ब्रह्मा आदिकरून अणखीहि देवांचीं इंद्रियें तृप्त कर-
"ण्याची इच्छा इत्यादिक विषयावरून म्या लिहिलें आहे यास्त-
"व ते विषय पुनः एथे लिहीत नाहीं परंतु तें माझें उत्तर आ-
"णि भागवताचा दशमस्कंद हरिवंश किंवा महाभारताच्या
"समाप्तीचें पर्व तसेंच आगम निगम ज्यांत त्यांचे व्यभिचा-
"राचा आणि कामविकाराचा वृत्तांत विस्तारें करून निवेदन
"केला आहे ते ग्रंथ वाचावे. असत्य भाषणाविषयीं तर त्यां-
"चा लाडका कृष्ण इतरांपेक्षां फार स्पष्ट लबाड आहे. विहार
"नगरांतील जरासंधनामक पराक्रमी राजाने कृष्णाने आपल्या
"जांवयास मारिलें असें ऐकून त्यास बहुत युद्धें करून दम-
विलें

"विलें आणि मथुरा जी त्याची जन्मभूमि तींतून शेवटीं हा-
"कून काढिलें त्या राजाचा सूड घ्यायास कृष्णाने कपटें करू-
"न आणि केवळ अप्रपाद्य कर्में करून त्या राजाचा प्राण घ्या-
"याचा संकल्प केला. तो अर्थ साधायाकरितां कृष्ण आणि
"भीमार्जुन जे त्याचे दोघे आतेबंधू ते मिळून तिघानी ब्राह्म-
"णाचा वेष धरून त्याच्या गृहांत शिरले आणि तो उपवासें-
"करून अशक्त झाला आहे आणि त्याच्या जवळ कुटुंबाचीं म-
"नुष्यें आणि उपाध्ये मात्र आहेत असें पाहून त्यास झोंबी खे-
"ळायास बोलाविलें. तेव्हां भीम जो त्या तिघांतील उत्कृष्ट बलि-
"ष्ठ त्या बरोबर तो झोंबी खेळला भीमाने त्यास जिंकून त्याचा
"प्राण घेतला. (सभापर्व ह्मणजे महाभारतांतील दुसरें पर्व त्यां-
"त). गुरु द्रोणास मारायास कृष्णाने युधिष्ठिर जो त्याचा आ-
"तेभाऊ त्यास खोटी साक्ष द्यायास चिडिवलें. (द्रोणपर्व ह्मण-
"जे महाभारताचें सातवें पर्व त्यांत). बळी नामक जो फार प-
"राक्रमी राजा त्यास मारायास विष्णु आदिकरून देव एक-
"त्र मिळाले परंतु तो अजिंक असें पाहून विष्णूने त्यास काप-
"ट्यें करून मारावयाचा संकेत केला आणि तो अर्थ साधाया-
"करितां तो वामनाचें रूप धरून त्याच्या द्वारीं भिक्षा मागाया-
"स गेला विष्णुचा कापट्य बेत बळीस समजला. अस्तांहि औ-
"दार्याच्या अभिमानें करून भिकार्यास धर्म करायास तो
मागें

“मागें हटला नाहीं तेव्हां त्या कृतघ्न विष्णूने बळीपासून वर
“मागून त्याचें सर्व राज्य घेतलें आणि त्यास पाताळांत घालू-
“न बंदिवान केला.(महाभारताच्या शेवटच्या पर्वांत.) कुरु-
“क्षेत्रांतील युद्धांत दुर्योधन मेला अस्तां युधिष्ठिराचें सैन्य म-
“हादेवाच्या स्वाधीन करून सर्व रात्रौ विश्रांति घ्यायास डेऱ्यां-
“त गेले तेव्हां दुर्योधनाचा मित्र जो अश्वत्थामा त्याने महादेवा-
“ची स्तुति केली तेणेंकरून महादेव प्रसन्न होऊन आपणाव-
“र विश्वासलेलें जें सैन्य तें निद्रस्थ अस्तांहि त्यास मारूं दि-
“ल्हें.आणि आपणहि त्याजबरोबर त्यांस तरवारीने मारा-
“यास सहाय झाला.(सौप्तिक पर्व ह्मणजे महाभारताचें अ-
“करावें पर्व त्यांत.) समुद्रमंथनसमयीं असुरानी अमृताचा क-
“लश जेव्हां विष्णूच्या स्वाधीन केला तेव्हां त्याने तो कलश अ-
“सुरांचा सापत्न बंधू किंवा शत्रू जे स्वर्गवासी देव त्यांच्या स्वा-
“धीन केला याप्रमाणें विश्वास घात केला.(आदिपर्व ह्मण-
“जे महाभारताचें पहिलें पर्व त्यांत.) ईश्वराचे अवतार ह्म-
“टलेले त्यांस लोक पापाचा दोष लावितात हें पाहून राजा
राममोहनराय त्या कथा खोट्या आहेत असें ह्मणतो.तो ई-
श्वरी गुणांस कल्पित दृष्टांत देऊन त्यांस पापाचा दोष लावि-
तो तेव्हां हें हि तो कां टाकून देत नाहीं ? जेव्हां मूळाचा अर्थ
करून पाहावा तेव्हां त्या मान्य केलेल्या मतापेक्षां त्याच्या

मतापासून नीतीसंबंधीं अधिक वाईटपणा दिसून येतो.मा-
झा निश्चय असा आहे.कीं राममोहनरायासहि आपल्या स्व-
कीय गुणांस तसे दृष्टांत दिल्हे अस्तां आवडणार नाहींत.त-
शा गुणांचा विचार मनांत करूनच त्यास अप्रतिष्ठा वाटून क्रो-
ध आला असता तो आणि दुसरे वेदांतास अनुसरणारे आ-
पणासच अशा गुणांचे दृष्टांत द्यायाचें अगत्य नाहीं असें ह्म-
णोत.सत्याचा मात्र प्रकाश केला असतां अज्ञानरूपी जो अं-
धकार तो लयास जातो.असें असतां साधारण लोकांकरि-
तां शास्त्रांत कां अशा कथा सांगितल्या आहेत हें मी पुसतों.
ज्या महाभारतांत अतिशय वाईट कथा आहेत त्याचाच
एक विभाग गीता अस्तां वेदांती लोक गीतेस एवढें कां ध-
रून असतात ? आह्मी ज्ञानी आहों असें ते समजतात पर-
तु त्या मताला ते अनुसरणारे आहेत त्यांत मात्र मूर्खत्व आ-
हे असें समजावें

उपासनेचे पर्यायाचा विचार दुसऱ्याने करितों.

उपासनेचे पर्याय यांविषयीं नारायणरावाने कांहीं
गोष्टी लिहिलेल्या आहेत.भिन्न भिन्न धर्मांत जे उपासनेचे
पर्याय आहेत त्यांत कांहीं साम्यता आहे असें सांगतो.या

गोष्टीचें प्रदर्शन करायासाठीं पुढील पद्धति लिहितो.

"हिंदूमध्यें	मुसलमानांत ;	ख्रीस्ती लोकांत
"संस्कार	सुंतावगैरे	बाप्तिस्मा
"उपदेश	कलमा पढविणें.	तसेंच
"श्रवण पठन मनन	तसेंच	तसेंच
"निदिध्यास	तसेंच	तसेंच
"धर्मांतील मतें	शियावसुनी	रोमन क्याथलिकप्रीजबिटरियन प्रोटेस्टंट, वगैरे.
"उपोषणें	रोजे	लेंट, वगैरे
"धूपदीप नैवेद्य ईश्वरार्पण.	फात्या	जेवणाचे आदीं ईश्वरार्पण करणे वगैरे.
"गीतवाद्य	तसेंच	तसेंच
"स्तोत्र	तसेंच	तसेंच
"भजन	तसेंच	तसेंच
"पश्चात्ताप	तसेंच	तसेंच
"शरण होऊन क्षमा मागणें	तसेंच	तसेंच
"व्रताचे वार वगैरे	जुमेरात	रविवार शाबाथ दिवस.

इत्यादि

"इत्यादि अनेक साम्यताही आहेत. यांत अन्यदेशांतील लोक "पाद्री वगैरे यानी ईश्वरी निर्मित धर्मांचे लोकांस कांहीं नवें "घावयाजोगें नाहीं."

हे सर्व पाहून लोक कदाचित् भुलथापेंत पडितील परंतु त्याचा शोध केला असतां तसेंच होणार नाहीं. जर उपासनेच्या पर्यायांस चांगला उद्देश नसेल आणि ते जर देवाने लावून दिल्हेले नसतील आणि ते जर ठीक रीतीप्रमाणें केलेले जाणार नसतील तर ते उचीत आणि मान्य होणारच नाहींत. जे पर्याय हिंदूधर्मांत सांगितले आहेत ते सगळे मागील विचाराप्रमाणे अमान्य आहेत.

जें उत्तर म्या मोरभट्टाला केलें त्यांत असें स्थापित आहे कीं भगवानाशिवाय कोणी एकाचें भजन नाहीं करावें. असें असतांना हिंदूलोक परमात्म्याचें भजन टाकून किंवा परमात्म्याचें भजन मात्र नकरून फार पातकी आहेत. जे साधारण लोक कर्ममार्गादर चालतात त्यांजवर दोष येतो. पुष्कळ शास्त्रांतील वाक्याप्रमाणें परमात्मा निर्गुण आहे असें सांगून त्याचें भजन ते करीत नाहींत परंतु त्याच्या ठिकाणीं ब्रह्मा विष्णु शिव इत्यादि लावून आणि आपली बुद्धि टाकून आणि मोठें पाप करून त्यांचें भजन करितात यास्तव जें जें भजनसमयीं करितात तें तें अगदी अयोग्य आहे. त्यांचें श्रवण पठन

मनन निदिध्यास स्तोत्र शरण होऊन क्षमा मागणें व्रत करणें
तीं सर्व स्वकल्पित किंवा अयोग्य जनाविषयीं आहेत जी सेवा
ते करीत असतात तींत खऱ्या देवाचा अपमान फार आहे जी
सेवा अशुद्ध कथनापासून स्थापित झाली आणि ती जाविष-
यीं खोटी वचनें दिल्हीं आहेत ह्मणून तिजपासून त्या हिंदू-
लोकाचीं मनें अशुद्ध होतात आणि त्यांचा उपद्रव बहुत हो-
तो. जे पर्याय ते करितात ते पुष्कळ किंवा थोडे असोत तरीं त्यां-
जपासून देवाविषयींचें ज्ञान किंवा यथार्थ मन किंवा किंचि-
त लाभ प्राप्त होणार नाहीं. जें जें त्यांविषयीं होतें त्या त्यांत पा-
प्त आहे.

ज्ञानमार्गाला अनुसरणारे ह्मणजे वेदांती जे ते त्यां-
जसारखे आहेत. त्यांचें मत आपल्या भावाच्या मताप्रमाणें
असें आहे कीं मनुष्याचा आत्मा देवाचा अंश आहे. मुंडको-
पनिषत् त्यांचा एक ग्रंथ आहे त्यांत असें सांगितलें आहे कीं
“जसें अत्यंत प्रदीप्त अग्नीच्या ठिणग्या अग्नीसारखीं रू-
“पें ज्याची अशा सहस्रावधी उत्पन्न होत आहेत तसें नाश-
“रहित परमात्मा जो त्यापासून बहुत आत्मे उत्पन्न होत आ-
“हेत नंतर त्याच्या ठायीं नाश पावत आहेत.” कथकोपनि-
षद् ह्मणून त्यांचा दुसरा एक ग्रंथ आहे त्यांत असें सांगित-
लें आहे कीं “आत्मा जन्ममरणाधीन नाहीं तो बुद्धिच आहे

आणि

“आणि त्याचें मूळ आपल्यांत किंवा दुसऱ्यांत आहे असें
“नाहीं तो जन्मरहित अविनाशी अचंचल असें आहे.” अ-
सें असतांना वेदांती जे आहेत ते भजनसमयीं कोणाचें भ-
जन करितात? ज्याचा अंश ते आहेत किंवा देवाचे जे भा-
ग त्यांत मिळत आहेत त्यांचें भजन ते करितात. अशा री-
तीने आपणाला जर भजतील किंवा ज्या सर्व वस्तु त्यांच्या
दृष्टीस पडतात ते देवाचे कांहीं विभाग आहेत असें समजू-
न त्यांस जर भजतील तर काय भेद होईल? सायुज्यता ना-
शासारखी आहे आणि मनुष्याची जन्मेच्छा आणि अंतःक-
रणीय ज्ञान ज्याप्रमाणें कांहीं भोगायाची इच्छा [illegible] अ-
सती त्यांच्या विरुद्ध आहे आणि मनुष्याच्या कर्मास जे कां-
हीं अत्यंत बळी हेतु आहेत त्या सर्वांचा नाश आणि पुढल्या
जगांत कर्मांचा झाडा द्यावा लागेल असी जी प्रेरणा लोकांच्या
मनांत असती तिचा नाश सायुज्यतेच्या आशेपासून होतो.
तरी सायुज्यता परमार्थ आहे असें वेदांती सांगतात! वेदां-
ती असें सांगतात कीं सायुज्यतेने ब्रह्मरूप होऊन जायास
याप्रमाणें केलें पाहिजे निरंतर ब्रह्माचें चिंतन करावें देहा-
भिमान सोडावा कर्मांच्या फलांची इच्छा सोडावी आणि कां-
हीं जणांच्या मताप्रमाणें कर्मांचाहि त्याग करावा. कितेक वे-
दांती सांगतात कीं आचार सोडावे कारण तेणेंकरून स्व-

त्प

त्य जें स्वर्गसुख तें मात्र प्राप्त होतें आणि त्या सुखाची अव-
धि सरल्या नंतर तेणेंकरून दुसरे जन्म प्राप्त होतात. वेदांती-
ल भ्रांतीचें मत पुढील वाक्यांत प्रगट केलेलें आहे.

रामोहनराय याप्रमाणें लिहितो कीं "वेदांतांत असें
"सांगितलें आहे कीं व्यास असें लिहितो कीं देवानी आणि म-
"नुष्यानी परमात्म्याचें भजन करावें लागतें कांकीं उभयतांस
"त्या भजनापासून शांति होईल वेदांतहि असें आहे कीं स्वर्गां-
"तील देवांमधून व भक्तिमान् ब्राह्मणांमधून व साधारण म-
"नुष्यांमधून जो कोणी परमात्म्याचें ज्ञान करील तो त्यांत प्र-
"वेश करून मिळवील."

मंडुकोपनिषदांत असें लिहिलें आहे कीं "जे पुरुष य-
"ज्ञकर्म करणाऱ्याचें जें कर्म तें चांगलें नव्हे असें जे जाणत
"नाहींत त्या कारणेंकरून ते पुरुष पीडायुक्त होतात अण-
"खीं नष्ट लोक होत्साते खालीं पडतात यज्ञकर्म आणि धर्मा-
"र्थ केलेलीं कर्में विहीर किंवा आड किंवा तळें अथवा देवा-
"चें देऊळ किंवा अन्नछत्र अथवा पुष्पादिक झाडांचा बाग
"ही केलीं असतां हें चांगलें जे मानितात अणखीं यावांचून
"दुसरें कल्याणकारक कांहींएक नाहीं असें जे जाणतात ते
"पुरुष प्रकर्मकरून मूर्ख होत- आणि ते पुरुष स्वर्गामध्यें
"पुण्याचा थोडकाच अनुभव करून अत्यंत नीच तर त्या
लोका-

"लोकाप्रत निश्चयेंकरून प्रवेश करीतआहेत- अणखीं तपश्च-
"र्येविषयींच भक्ती धरून जे अरण्यांत राहतात शांतवृत्ती आ-
"णि विद्वान् आणखीं भिक्षा मागत आहेत ते पुरुष रजोगुण-
"रहित होत्साते सूर्यद्वारेंकरून गमन करीत आहेत यालो-
"कीं मेलेला पुरुष नाशरहित आत्मस्वरूपी होतो हे- कर्मेंक-
"रून प्राप्त होतात जे लोक त्यांतें परिक्षा करून जो ब्राह्मण खे-
"द पावतो कांकीं कर्मेंकरून कांहीं सुख होत नाहीं याविषयीं
"ज्ञान प्राप्त व्हावयाकरितां तो ब्राह्मण समिधा आहेत हाताम-
"ध्यें ज्याच्या आणि शास्त्रसंपन्न अणखीं ब्रह्मनिष्ठ अशा गुरु-
"प्रत सर्वकाल जावो.

"हें नाशरहित ब्रह्मस्वरूप आहे आणि प्राणहि तेंच आ-
"हे अणखीं बोलणारी वाणि आणि सर्वत्र गमनकरणारें म-
"न हेंहि तेंच आहे असें सर्व योगी ह्मणतात तेंहें ईश्वरस्वरू-
"प सत्य आणि तेंच अमृत ह्मणजे मोक्षरूप अणखीं तेंच जा-
"णावयाकरितां योग्य असें सौम्य शिष्य तूं जाण ह्मणजे त्या-
"विषयींचें जें ज्ञान तें तुला होईल- याचा उपाय मंडुकनामक
"ऋषि हे गुरु सांगतात कीं उपनिषत् हेंच कोणी एक धनुष्य
"हस्तामध्यें घेऊन आणि त्यांतील वेदांत विचार हाच कोणी
"एक महाअस्त्ररूप बाण त्यानें समीप योजून ईश्वरस्वरूप
"जें हेंच कोणी एक तीक्ष्ण लक्ष्य यातें संधान कर- ह्मणजे भ-
गवत्

“गवत् भक्तीयुक्त अंतःकरण जें तेणेंकरून तें प्राप्त होतें जें
“लक्ष्य तेंच नाशरहित आहे असें सौम्य शिष्यां तूं निश्चयें-
“करून आण- अणखीं दुसरा उपाय सांगतात ओंकार हें ध-
“नु आणि मन हें बाण अणखीं ब्रह्मस्वरूप तेंच लक्ष्य असें
“बोलतात ह्मणून त्याच ब्रह्मस्वरूपातें सावध चित्तेंकरून वे-
“ध करावा आणि बाणासारिखा त्यांच लक्ष्याचेठायीं मग यु-
“क्त होताहे- तें पूर्वोक्त लक्ष्य कसें आहे कीं सर्वगत आहे ह्म-
“णून माझा मनरूप बाण जो तोहि सर्वत्र गमन करणारा अ-
“सा आहे- कांकीं वेध करणारा सर्वत्र गमन करणारा असला
“ह्मणजे लक्ष्य जें आहे तें लवकर वेधलें जातें याविषयीं संश-
“य नाहीं अणखीं उपायांतर सांगतात कीं ऋग्वेद हेंच धनुष्य
“आणि यजुर्वेद हाच बाण. अणखी सामवेद हा धनुष्याचे दो-
“रीचा शब्द या साहित्येंकरून विचारवंत पुरुष वेधितात अ-
“णखीं ब्रह्म जें आहे तें वेदमय आहे आणि शुद्ध आहे ह्मणून ज्ञा-
“नी पुरुष वेदांत विचार करून नित्य वेधित आहेत- ज्या ब्र-
“ह्मस्वरूपाच्याठायीं स्वर्ग आणि पृथ्वि अणखीं अंतरिक्ष हे
“लोक ओंविले आहेत तसेंच मनहि आहे अणखीं संपूर्ण
“प्राणासहवर्तमान राहत आहे- तोच एक ईश्वर जो त्यातें तुं-
“ह्मी जाणा अणखीं आत्मा जो त्यातें ज्ञानावांचून इतर वाणी
“कहीं नाहींत कांकीं मोक्षाचा हाच मर्यादाभूत सेतु आहे ह्म-
णून

“णून- जसें लोखंडाच्या पट्या व खिळे रथाच्या मध्यभागीं
“जशा युक्त असतात तशा ह्या शरिराच्याठायीं नाडी सर्वत्र
“व्याप्त आहेत त्यामध्यें तोच हा जीवात्मा प्रतिबिंब स्वरूपें-
“करून अभ्यंतराच्याठायीं संचार करीत आहे आणि बहुत-
“प्रकारें करून उत्पन्नहि होत आहे ह्मणून ओंकाररूप परमे-
“श्वर जो त्यातें याप्रकारेंकरून ध्यान करा अणखीं आपल्या-
“तें कल्याण तुह्मी त्यापासून इच्छा कांकीं तो श्रेष्ठ आहे आणि
“अज्ञाना पलीकडे राहत आहे ह्मणून-

“नंतर हा प्राणरूप ईश्वर जो तो सर्वत्र स्थलाच्याठा-
“यीं आपल्या हस्तेंकरून शोभत आहे विचार करणारा पु-
“रुष असें जो जाणतो तो ज्ञानी होत आहे आणि उगाच खो-
“टा वाद घालणारा होत नाहीं- पुर्वी मोटे मोटे ऋषि जे ते ह्या
“परमात्म्याने अत्यंत प्राप्त करून ज्ञानेंकरून तृप्त आणि कृत
“कृत्य आहेत अंतःकरणें ज्यांचीं अणखीं विशेषेंकरून गेले
“आहेत विषय ज्यांपासून प्रीति ज्यांची आणि प्रकर्षेंकरून शां-
“त असें होते झाले- तेच ऋषि सर्वत्र गमन करणारा परमा-
“त्मा जो त्यातें सर्वत्र स्थलाचेठायीं प्राप्त होऊन बुद्धीकरून धी-
“र आणि योगयुक्त आहे अंतःकरण ज्याचें असें सर्व स्वरू-
“प परमात्मा जो त्याजप्रतच प्रवेश करिते झाले- अणखीं
“वेदांत शास्त्राविषयीं विशेष ज्ञानेंकरून अत्यंत निश्चय-
युक्त

“मुक्त आहेत अर्थ ज्याचे आणि सन्यास योगेंकरून ज्ञाननि-
“ष्ठ संन्यासी आणि शुद्ध आहेत अंतःकरणें ज्यांचीं असे होते झा-
“ले-तेच संन्यासी ब्रह्मलोकाच्याठायीं राहावयाविषयीं योग्य
“होतात आणि जे केवळ अंतकाळाच्याठायीं केवळ मोक्षरू-
“प जो परमेश्वर त्याचेंच चिंतन करीत आहेत ते सर्वत्र मुक्त
“होत आहेत आणि त्यांच्या संपूर्ण आशा पाशरहित जात-
“आहेत आणि त्यांचा शरिरांतील संपूर्ण कळा अणखीं पंच
“ज्ञानेंद्रियें आणि पंच कर्मेंद्रियें अणखी पंच तन्मात्रा ह्या पं-
“धरा प्रकारच्या प्रतिष्टा हे संपूर्ण आपल्या लयकालाच्याप्र-
“तिदेवता ज्या त्याच्याठायीं लीन होत आहेत-मग त्याकालीं सं-
“पूर्ण कर्में हीं लीन होत आहेत नंतर विशेषेंकरून ज्ञानस्वरू-
“प परमात्मा जो तोहि केवळ नाशरहित ब्रह्मस्वरूप जे त्या-
“च्याठायीं सर्व भावेंकरून ऐक्य भाव पावत आहे-जशा संपू-
“र्ण नद्या पृथ्वीवर चहुंकडे वाहत असतां आपलीं नामें रूपें वे-
“गळीं वेगळीं आहेत तीं टाकून समुद्राच्याठायीं लय पावता-
“त तसें-अणखीं जसा तत्व ज्ञानेंकरून विचार करणारा वि-
“द्वान् पुरुष नामरूपापासून मुक्त होत्सातां प्रकृतीहून परश-
“हाणारा तेजस्वी पुरुष जो त्याजप्रत पावतो अणखीं तो जो
“स्पष्ट निश्चयेंकरून तें श्रेष्ठ ब्रह्म जाणतो तो ब्रह्मस्वरूपच हो-
“तो अणखीं त्याचा कुलामध्यें ब्रह्मजाणणारा होत नाहीं अ-
सें

“सें होत नाहीं आणि तो सर्व शोकांतें तरतो अणखीं सर्व पा-
“पातें तरतों आणि संपूर्ण हृदय गुहासंबंधी संशयाच्या गांठीं
“ज्या त्यापासून फार मुक्त होत्सातां मोक्षरूप होतो तें हें संपूर्ण
“वर्तमान वेदानें सांगितलें ह्मणून कर्म करणारे अग्निहोत्री
“ब्रह्मनिष्ठ आपण अद्वितीय श्रेष्ठ भगवान् जो त्यातें भक्तिक-
“रीत होत्साते सकाळीं आणि संध्याकाळीं होम देत आहेत-
“त्याऋषीचीचहि ब्रह्मविद्या जे तिला [illegible] जाणतात आणि तेंच मु-
“ख्य व्रत यथाशास्त्र ज्यानीं आचरण केलें तेच ब्रह्मभाव पा-
“वते झाले॥”

स्कंदपुराणांत असें आहे कीं “शिव विष्णूस बोलता-
“झाला कीं मोक्ष साधण्याच्या उपायांविषयीं मी आतां तुला
“संक्षेपेंकरून सांगतों तें भक्तिभावें करून श्रवण कर. आ-
“त्मस्वरूपाचें खरें ज्ञान झालें ह्मणजे मोक्ष प्राप्त होतो प-
“रंतु कर्मेंकरून होत नाहीं आणि तें ज्ञान वेदांताचा मुख्य
“अर्थ समजण्याकरितां प्राप्त होईल. याप्रकारें आत्म्याला
“ज्ञान झाल्यावर त्याला मी ब्रह्म आहें असें स्पष्ट दिसेल.
“ह्या ज्ञानापासून आपल्या आत्म्याचा जो अहंपणा आहे तो
“लयास जाईल मग द्वैतपणाविषयीं जो विश्वास तोहि ना-
“श पावेल त्याचा नाश झाल्यावर कधींहि प्रिय किंवा अ-
“प्रिय कांहींच दिसणार नाहीं. तसाच प्रेम व द्वेष यांचा
नाश

“नाश होईल नंतर त्यांच्या नाशापासून पुण्यांत व पापांत जो
“भेद आहे तोहि दिसणार नाहीं मग शेवटीं इंद्रियें व इंद्रियां-
“चे जे विषय आहेत ते नाश पावतील. ह्याप्रकारें आत्म्याच्या ख-
“र्‍या स्वभावाच्या समजण्यापासून जो विश्वास त्याच्या अहं-
“पणाविषयीं आहे तो नाहींसा होतो आणि ह्या प्रकारें अ-
“ज्ञान जें मायारूपी सृष्टीचें मूळकारण आहे तेंही नाहींसें
“होतें. ह्या ज्ञानापासून ब्रह्म जो त्याच्या खर्‍या स्वभावाचें ज्ञा-
“नहि प्राप्त होतें जसा निश्चय असतो कीं रज्जू सर्प नाहीं व
“खांब माणूस नाहीं तसें लोकांचे ध्यानांत येतें कीं कार्य आ-
“णि कारण सृष्टि आणि सृष्टिकर्ता यांजविषयीं जो विश्वा-
“स आहे तो अज्ञानापासून होतो व ब्रह्म वांचून कांहींच
“नाहीं असें लोकांस कळूं. येतें.”

या सगळ्या गोष्टी भ्रांतीच्या आहेत ईश्वरज्ञान प्राप्ती-
करून घेण्यास दोन मात्र रीती आहेत असें मी समजतों
त्या ह्या कीं त्याच्या कृत्यांचे विचार आणि त्याच्या शब्दां-
चा विचार वेदांतांत जो विचार सांगितला आहे तो ह्या
दोन्ही रीतीहून निराळा आहे तो केवळ दुर्बोध गुह्या प्रमा-
णे आहे आणि असें दिसतें कीं त्यांत जो अति उत्तम मार्ग सां-
गितला आहे तो असा कीं अहंपणास विसरावें कल्पना
आणि इंद्रियादिक ज्ञानाचा नाश करावा आणि असा नि-
ग्रह

ग्रह जर करील तरच भगवद्भक्ति घडती असें आहे. हा वि-
चार जेव्हां करावा तेव्हां असें स्पष्ट होतें कीं वेदांत लेखांत त-
शा कर्मांस ज्ञानाचें विशेषण जें वारंवार दिल्हें आहे तें त्यास
योग्य नाहीं तें अतिशयच मूर्खपण आहे.

ज्या गोष्टी नारायणरावाने आपल्या पद्धतीवरून काढि-
ल्या त्याचें उत्तर पुरतेपणीं मागें सांगितल्या अनुमानावरून
मिळेल परंतु हिंदूधर्म कुत्सित आहे आणि एतद्देशीय लो-
कानी त्यागावा याजकरितां विस्तारेंकरून नारायणरावाने
सांगितले पर्याय यांचा शोध करितों.

१ जे संस्कार हिंदूलोकांत सांगितले आहेत ते कोठें अ-
ठरा कोठें सोळा व कोठें बारा. गर्भाधान पुंसवन सीमंतोन्नय-
न जातकर्म नामकरण निष्क्रमण अन्नप्राशन चूडाकार्य सा-
वित्री समावर्त्तन विवाह स्वर्गारोहण असे बारा सांगितलेले
आहेत.

नीतिसंबंधी या संस्कारांत काय आहे हें एतद्देशीय
सुज्ञ लोकांस ठाऊक नाहीं त्याविषयीं भ्रांतीचीं वचनें सांगि-
तलीं आहेत हीं मात्र त्यांस ठाऊक आहेत. ते संस्कार लज्जोत्पा-
दक आहेत म्हणून त्यांविषयीं मी फार बोलत नाहीं. परंतु
लिंग देहाचा आकार आत्म्याचे गुण, सफल किंवा निष्फल
जन्म, प्रकृति, द्रव्य, पराक्रम, सुख किंवा दुःख, अल्प किंवा
दीर्घ

दीर्घ आयुष्य, उद्योग, परलोकस्थिति, तीं सर्व थोडे उपहास्पाद मंत्र तंत्र मित्रानी विचारावांचून सांगितलेली त्याप्रमाणें होत जातात असें हिंदूलोकांचें मत आहे. सावित्री जी यांमध्यें विशेष आहे तिचा विचार लज्जेवांचून करावा लागेल.

सावित्रींत दोन गोष्टी आहेत मुंजलावणें आणि गायत्री समजावणे. जीं फळें त्याजपासून होतात तीं बहुत चमत्कारिक आणि फार भ्रांतीचे आहेत. त्याच्या योगाने ब्राह्मणाचा पोर अकस्मात् द्विज होतो. ज्या शब्दापासून हें चमत्कारिक काम होतें तें पुढें सांगतों.—

ॐ भूर्भुवः स्वः
तत्सवितुर्वरेण्यं भर्गोदेवस्य धीमहि
धियोयोनः प्रचोदयात्

ह्मणजे "ॐ भूमि अंतरिक्ष स्वर्ग. त्या द्योतमान सूर्याच्या श्रेष्ठ प्र-
"भावाचें ध्यान आह्मी करितों तो आमचे बुद्धीला प्रेरणा करो."
ॐ भूर्भुवः स्वः याखेरीज दुसरे शब्द ऋग्वेदाच्या तिसऱ्या अष्टकांत दुसऱ्या अध्यायांत मिळतात. ॐ याजपासून अकार उकार मकार हे तीन वर्ण उत्पन्न होतात त्यास प्रणव ह्मणतात. भूर्भुवः स्वः यांस व्याहृती ह्मणतात. हे शब्द लावल्यावर गायत्री पूर्ण होती. या मंत्रापासून हिंदूधर्माप्रमाणे काय ला-

भ

भ होतो तो आतां सांगतों. मनुसंहितेंत असें सांगितलें आहे कीं

"वेदवेत्ता जो ब्राह्मण तो हें ओंकाररूप आणि तीन व्या-
"हृती जिन्हांपूर्वीं लावलेल्या असी ही जी गायत्री ह्यांचा प्रा-
"तःकालीनआणि सायंकाळच्या संध्येच्याठायीं जप करीत
"होत्साता वेदपठनाच्या पुण्येंकरून युक्त होतो. आणि जो ब्रा-
"ह्मण ओंकार गायत्री आणि व्याहृतित्रय ह्या तिघांचा गावां-
"बाहेर जाऊन नदीच्या तिरीं प्रत्यहीं सहस्रवार जप करि-
"तो तो एका महिन्यांतच मेगेंतून जसा सर्प तसा मोठ्याहि पा-
"पापासून मुक्त होतो. आणि जो ब्राह्मण क्षत्रिय वैश्य ह्या ति-
"हीं वर्णांत झालेला उक्तकाळीं गायत्रीच्या जपाचा त्याग क-
"रितो आणि आपआपल्या वर्णास विहित जें होमादिक
"कर्म तें सोडितो तो सज्जनांमध्यें फार निंदा पावतो.
"   "ह्या ओंकार व्याहृतियुक्त गायत्रीचें प्रतिदिवसीं
"तीन वर्षांपर्यंत आलस्य सोडून जो पठन करितो तो वा-
"यूसारिखा स्वेच्छाचारी आणि आकाशरूप होत्साता मा-
"यातीत ब्रह्मास जाऊन मिळतो. ओंकाराख्य जें एक अ-
"क्षर तें साक्षात् परब्रह्मच होय आणि डाव्या नाकपुडींतू-
"न वायु वर घेणें आणि कोंडणे व पुनः उजव्या नाकपुडींतू-
"न बाहेर सोडणें याचें नाम प्राणायाम ते तीन प्राणायाम

इतर

"इतर अवघ्या चांद्रायणादिक तपाहून श्रेष्ठ तप होय. गाय-
"त्रीहून दुसरें कांहीं श्रेष्ठ नाहीं आणि मौनापेक्षां सत्यभा-
"षण हें विशिष्ट आहे. आणि सर्व वेदविहित ज्या होमयागा-
"गादिक क्रिया त्या नाश पावतात परंतु हें ओंकाररूप जें
"अक्षर तें अविनाशी आहे असें जाणावें. जे विधियज्ञासुद्धां चा-
"र पाकयज्ञ सांगितले आहेत त्या सर्वांस एका जपयज्ञाच्या सो-
"ळाव्या अंशाचीहि योग्यता नाहीं. ह्या गायत्रीमंत्राच्या जपेंक-
"रून ब्राह्मण सिद्धि पावतो ह्याविषयीं संशय नाहीं आणि तो
"ह्या मंत्राच्या जपावांचून दुसरें कांहीं कर्म करो अथवा नक-
"रो तथापि त्यास ब्रह्मसंबंधी मैत्र असें ह्मणतात अध्याय २-
७९-८७

"ओंकार सर्व वेदांच्या अगोधरचा आणि जो अक्षरत्र-
"येंकरून युक्त असा, साक्षात् ब्रह्मच होय ज्यामध्यें तीन वेद
"राहिले आहेत तो प्रणवाख्य वेद गुप्त ठेवावा. अध्याय ११-
२६५

स्कंद पुराणांत असें लिहिलें आहे कीं "
"ओंकार गायत्री जिची प्राप्ति कठीण आहे जी सगळ्या वि-
"द्येमध्यें श्रेष्ठ. वेदांत गायत्रीपेक्षां कांहीं उत्कृष्ट नाहीं. जसी का-
"शी सारखी दुसरी नगरी नाहीं तसा गायत्री सारखा दुस-
"रा मंत्र नाहीं. गायत्रीच्या तपापासून मनुष्यें "गायंतं त्रा-
यतें"

"यते" ह्मणजे गायत्री पठण केल्याने तारली जातात यास्तव ह्या
"मंत्राला गायत्री असें नाम प्राप्त झालें आहे. गायत्रीच्या ज-
"पापासून विश्वामित्र जो राजर्षि तो ब्रह्मर्षि झाला आणि
"सृष्टि करण्यास सामर्थ्य प्राप्त झालें. जें गायत्रीपासून घड-
"णार नाहीं तें काय आहे ब्रह्मा विष्णु शिव आणि तीन वेद हे
"गायत्रीपासून झाले आहेत."

सूर्य नारायणोपनिषदांत असें लिहिलें आहे कीं "जो
"सूर्याच्या संमुख बसून गायत्रीचा जप करितो तो भय आ-
"णि रोग ह्यांपासून मुक्त होतो आणि त्याचे सर्व अनर्थ दूर
"होतात आणि अनुचित खाणें पिणें बहिष्कार संबंधी हे स-
"र्व पवित्र आणि उचित होतात. जो मंत्र दुसऱ्यास सांगावया-
"चा नव्हे त्याचा प्रातःकाळीं जो जप करितो तो भाग्यवान् होतो
"आणि ऐहिक व पारलौकिक सुख संपादितो आणि जो प्रा-
"तःकाळीं माध्यान्हकाळीं आणि सायंकाळीं व रात्रीस निरं-
"तर जप करितो त्यास शंभर यज्ञांचें फळ मिळतें आणि तो
"या भवसागरांतून मुक्त होतो."

त्याप्रमाणें पुष्कळ गोष्टी शास्त्रांत सांगितलेल्या आहे-
त परंतु ज्या म्या काढिल्या आहेत त्या आमच्या कार्यास पुरे-
त. ज्या एक दोन शब्दानी सूर्याची किंवा ब्रह्माची स्तुति आहे
त्याच्या उच्चाराने घोर पातकाचें प्रायश्चित होईल आणि इ-
ह

इहलोकांतील सुखें प्राप्त होतील सत्यता व नीतिमत्व यां-
त विपर्यास पडतो आणि अखंड उद्धार प्राप्त होईल या
उपदेशापेक्षां काय वाईट मिळेल ? ह्या मंत्राच्या उत्पन्न
करणाऱ्याने हा मंत्र शूद्रलोकांपासून कां गुप्त ठेविला आ-
णि हा मंत्र तुह्मी ऐकूंनये व ह्मणूं नये नाहीं तर तुह्मास नर-
क प्राप्त होईल असें शूद्रांस कां सांगतात. मंत्र गुप्त ठेवण्यां-
त कांहीं चांगलें दिसत नाहीं परंतु जशा आमच्या ब्राह्म-
णांतील भावास गायत्रीपासून भ्रांति पडली तसी आह्मा-
स पडत नाहीं ह्मणून शूद्र लोकानी उपकार मानावा. गायत्री
काढण्यासाठीं आणि त्याचें भाषांतर करण्यासाठीं मला त्या-
नी क्षमा करावी त्यांस पाशांत घालावें ह्मणूंन मी काढिली
नाहीं त्यानी विचार करावा ह्मणून काढिली.

"जो उपदेश श्रवण मनन" हिंदूधर्माविषयीं आहेत
ते बहुत उपद्रवदायक आहेत. लज्जादायक कथनें ज्या आ-
ज्ञा दृष्टांत आणि सिद्धांत नीति संबंधी अव्हेरिलें पाहिजे
ती त्याविषयीं आहेत.

"जें उत्तर म्या मोरभट्टाला दिल्हें त्यांत हिंदूशास्त्रां-
तील अमंगळ कथनाविषयीं पुष्कळ गोष्टी सांगितल्या
आहेत. आणि पुढेंहि त्याजविषयीं कदाचित् सांगूं. क-
र्माविषयीं फार वाईट नीति शास्त्रांत सांगितली आहे त्या-
ची

चा विचार सांप्रत करितों. मागें असें लिहिलेलें आहे कीं जो स्त्रुयी-
चा संमुख गायत्री ह्मणेल त्याचें अनुचित खाणें पिणें वहिवाट
संबंधी हे सर्व पवित्र आणि उचित होतात. सतीविषयीं जीं वचनें
शास्त्रांत लिहिलेलीं आहेत. आणि परीक्षेंतून उतरण्यासाठीं
आणि दुःखाचें निवारण होण्यासाठीं व देव प्रसन्न होण्यासाठीं
जीं वचनें शास्त्रांत लिहिलीं आहेत तीं स्वहत्येस सहाय होतात.
पुढील मनुसंहितेंत निर्लज्जता खोटें आणि चोरी हीं प्रकट होता-
त.

तद्वदन् धर्मतोऽर्थेषु जानन्नप्यन्यथानरः
न स्वर्गाच्च्यवते लोकाद्दैवीं वाचं वदंति तां

याचा अर्थ "जें कृत्य धर्मेंकरून अर्थाविषयीं जाणत असतांहि
"जो पुरूष खोटेंच तें कृत्य आहे असें बोलतो तो स्वर्गलोकापा-
"सून भ्रष्ट होत नाहीं असी जी वाणी तिला देवांची वाणी असें
"बोलतात."

कामिनीषु विवाहेषु गवांभक्ष्ये तथेंधने
ब्राह्मणाभ्युपपत्तौच शपथेनास्तिपातकं

याचा अर्थ "स्त्रिया ज्या त्यांच्याठायीं आणि मुलगा किंवा मुल-
"गी यांच्या लग्नाविषयीं किंवा गाईनी जो पदार्थ भक्षण के-
"ला त्याविषयीं तसेंच कोणी एक मनुष्याने लांकडें चोरून ने-
"लीं असतां त्यांविषयीं अगरवी ब्राह्मणास विपत्ती प्राप्त झाली
असतां

“असतां तीविषयीं खोटी शपथ केली असतां पाप घडत नाहीं.”

ऋतामृभ्यां जीवेत्तु ऋतेन प्रमृतेन वा
सत्यानृताभ्यामपि वा न श्ववृत्त्या कदाचन

याचा अर्थ “कोणी एक मनुष्याने खरें बोलून अथवा गोड बोलू-
“न किंवा थोडीसी भिक्षा मागून किंवा पुष्कळ भिक्षा मागून अथ-
“वा खरें आणि खोटें हीं दोन्ही मिळून जीं वाक्यें तीहिंकरूनही
“आपलें पोट भरावें परंतु जो नीच आहे त्याची चाकरी कधींहि
“करूं नये”

विस्रब्धं ब्राह्मणः शूद्रात् द्रव्योपादानमाचरेत्
नहि तस्यास्ति किंचित्स्वं भर्तृहार्यधनो हि सः॥

याचा अर्थ “निःसंशय ब्राह्मण जो त्याने शूद्रापासून द्रव्यग्रह-
“ण करावें कांकीं त्या शूद्राचें स्वकीय द्रव्य कांहीं एक नाहीं त्या-
“ने चाकरी करून धन्यापासून द्रव्य संपादन केलें आहे ह्मणून
“त्याचें कांहींच नाहीं.”

फाल्गून महात्म्य व पुराणें यांत असें सांगितलें आहे कीं होळी-
च्या सणांत अत्यंत घाणेरें कंटाळवाणें आणि बीभत्स भाषण
आणि केवळ निंद्य आचरण स्तुतीस योग्य व उचित आहेत.
दिवाळीच्या तीन दिवस द्यूत खेळणें आणि मस्ती करणें आ-
णि खोडी काढणें ह्यांविषयीं त्याची आज्ञा आहे. ह्या विषया-
वर पुराणें जे सांगतात त्याविषयीं कांहीं एतद्देशीय लोक

खचित

खचित लज्जायमान झाले आहेत. पुराणें व तंत्रें हीं दोन्ही कित्ये-
क ज्ञातींस तीं योग्य ह्मणून मानिलीं आहेत तीं सांगतात कीं जगं-
नाथासारिखें कांहीं विख्यात मूर्तींच्या दर्शनाने प्रकृतीचें व जा-
तीचें सर्व भेद नाहींसे होतात आणि ह्या ठिकाणीं मनुष्यानी ब-
लात्काराने आपले दुष्ट विकारांची तृप्ति करावी आणि इंद्रियद-
मन करण्याच्या मिषाने शुद्ध राहाण्याविषयीं जो विधि आहे तो
मोडण्यास आज्ञा देतात. कलार्णवामध्यें निर्बंध आचार सांगि-
तला आहे.

अंतर्यागं शश्वद्भजतां अंते मोक्षः स्त्रीसंगाच्च
हिंसा धर्मः पानं सुकृतं गुप्तो मुक्तः प्रकटो भ्रष्टः

याचा अर्थ “जे अंतर्ध्यानाचा यज्ञ करितात त्यांस स्त्रीसंगें करू-
“नच मोक्ष होतो हिंसा पुण्य आहे मद्यपान चांगलें कर्म आहे
“जो बाह्यात्कारें करून भ्रष्ट आहे तो अभ्यंतराने तरलेला आहे.”
श्यामरहस्यामध्यें मागील नीतीप्रमाणें द्वेषयोग्य गोष्ट मिळती

मद्यं मांसं च मत्स्यश्च मुद्रा मैथुनमेव च
मकारपंचकं चैव महापातकनाशनं॥

याचा अर्थ “मद्य मांस मत्स्य मुद्रा मैथुन पांच मकार आहे-
“त तेणें करून पापाचा नाश होतो.” शक्तीचे पूजक ह्या आचारां-
त समाधान मानितात आणि तशा बहुत प्रकारां विषयीं आप-
ल्या धर्मशास्त्राच्या पुस्तकाचा आधार दाखवितात. इतर हिंदू

आपले

आपले शास्त्राच्या आधारावरून ह्मणतात कीं हीं जीं आचरणें शक्तिपूजकांस लावून दिल्हेलीं आहेत तीं अनुचित आहींत. साधारण धर्म शास्त्रांत असें लिहिलें आहे कीं स्त्रियानी भर्त्याची आज्ञा देवाचा विचार होण्यावांचून पाळावी.

स्त्रीभिर्भर्तृवचः कार्यमेषधर्मः परःस्त्रियः

याचा अर्थ "स्त्रीचा मुख्य धर्म [illegible] तिने आपल्या प- "तीची आज्ञा मान्य करावी." त्याप्रमाणेंच मुलांविषयींहि आज्ञा दिल्हेल्या आहेत. लोभ व बलात्काराने हरण करणें यांस वित्तविषयाच्या न्यायेंकरून आधार मिळालेला आहे तेव्हां त्याप्रमाणें जे कोणी व्यथा वव्याधी याचे श्रमांत असतात त्यांचा वारसा तुटतो आणि उदरनिर्वाहा पुरतें मात्र त्यांस दिल्हें जातें. नीचजातीविषयीं कठोरपणाचें आचरण व ब्राह्मणाकडे अनुचित नम्रता हीं दोन्ही धर्मशास्त्रांत दर्शिवलीं आहेत. "ब्राह्मणाने कोणी "एक क्षत्रियाकडे पाहून याने अमूक वाईट काम केलें असें प- "गट व्हावयासाठीं लोकांपाशीं सांगितलें असतां त्याने ९०रु- "पये दंड द्यावा तसेंच वैश्याविषयीं सांगितलें असतां २९रुप- "ये द्यावे किंवा शूद्राविषयीं असेंच सांगितलें असतां १२रु- "पये त्या ब्राह्मणाने अशा क्रमाने दंड द्यावा." मनु ८अ. २६८ "ब्रा- "ह्मणाच्या समान जाती विषयीं यथाशास्त्र खरी निंदा केली "असतां १२ रुपये दंड द्यावा मग कोणीएकाने तोंडाने बोला

यासं

"यास योग्य नाहीं असी निंदा केली असतां किंवा वाद घातले अ- "सतां त्याचें प्रायश्चित्त पूर्वी जें सांगितलें आहे त्याच्या दुप्पट "दंड द्यावा" (२६९). "मुख्य जाति असे ब्राह्मण जे त्यांजप्रत पा- "तकरूप असी कठोर वाणी जे तीकरून ओरडून वाईट शब्द "बोलतोहे त्याची जीभच कापूनटाकावी कांकिं तो मुळींच मस्त- "कादिक संपूर्ण अवयवामध्यें नीच अवयव जो पाय त्यापासू- "नच तो उत्पन्न झाला ह्मणून त्याचें बोलणेंहि नीचच" (२७०). "जो शूद्र उन्मत्त होत्साता अरे तूं यज्ञदत्त नामक ब्राह्मणाम- "ध्यें अधमा असी ह्या ब्राह्मणाची नाम जाती मोठ्याने ओरडू- "न आपल्या तोंडाने उच्चार करितो त्याच्या तोंडामध्यें लोखं- "डाचा खिळा तापवून दाहा बोटें लांब अशा प्रमाणाचा ठो- "कावा" (२७१). "कोणी एक शूद्र जो तो मोठ्या श्रमाने धर्मा- "चा एक लेश त्यातें जाणत होत्साता अहो ब्राह्मणं हो तूह्मी हा "असाच धर्म आचरण करा अशा अहंकारें करून ब्राह्मणा- "स उपदेश करणारा जो शूद्र आहे त्याच्या तोंडामध्यें आणि "दोन्हीं कानामध्यें तेल कडकडीत तापवून ओतावें कोणी ह्मणा- "ल तर राजाने (२७२). "शूद्र जो तो ब्राह्मणासहवर्तमान ए- "क आसनाच्याठायीं बसला असतां त्याच्या कंबरेच्याठायीं "लोखंडाचा त्रिशूळ तापवून डाग द्यावा अणखी आपल्या "देशापासून घालवून द्यावा अथवा जिवें मरणार नाहीं अ-

शा

"शा योगाने त्याची एक टीर कापावी" (२९१). "जो शूद्र ब्राह्मणा-
"कडे पाहून पृथ्वीचाठायीं गर्वं करून थुंकतो त्याचे दोन्हीं ओं-
"ठ राजाने कापावे अणखी त्याजकडे पाहून आणि त्याचा अ-
"पमान करून जो मुततो त्याचें लिंग छेदन करावें अणखी
"जो गर्वेकरून अन्नाच्या प्रमादास्तव अपमान करीत होत्सा-
"तां ब्राह्मणाकडे पाहून जो वारंवार पादतो त्याची गांडच का-
"पून टाकावी" (२९२). "जो शूद्र ब्राह्मणाच्या डोकीचे केश आ-
"पल्या हातानी धरितो त्याचे दोन्ही हात राजाने नविचार करि-
"तां तोडून टाकावे अणखी ब्राह्मणाला जिवें मारावें अशा बुद्धीने
"जो शूद्र पाय धरून भूमीवर आपटतो किंवा त्याच्या शिश्न ध-
"रून उपडितो किंवा त्याचे आंड धरून ओढितो अथवा त्याची-
"मान धरितो असें वाईट काम जो करितो त्याचे हातच तोडून
"टाकावे" (२९३). "जो कोणी एक श्रीमंत ब्राह्मण त्याने आ-
"पल्या जवळ सेवा कराया करितां मुंजी संस्कार झालेले अ-
"से ब्राह्मण ठेवून ज्या अयोग्य कामाला ते नइच्छीत असतां
"त्याजकडून धन्याच्या संबंधाने किंवा लोभाने पाय धुणें इत्या-
"दिक वाईट काम करवितोहे तो राजास ६०० रुपये दंड देण्या-
"करितां योग्य आहे" (४१२). "शूद्राने आपला पुत्र ब्राह्मणा-
"ला विकला किंवा नविकला असतां त्याजवळ ठेवून त्याजक-
"डून सेवा कर्म करवावें कारण कीं पूर्वी ब्रह्मदेवाने शूद्राला

ब्राह्मणांची

"ब्राह्मणाचीसेवा करावयाकरितांच उत्पन्न केलें आहे" (४१३).
"कोणीएक शूद्र ब्राह्मणाजवळ सेवा करावया करितां राहिल्या-
"नंतर कांहीएका दिवसानी त्याला धन्याने दूर केलें असतां-
"हि तो त्या दास्यत्वरूप कर्मापासून मुक्त होत नाहीं कारण
"कीं त्या शूद्राचें तें दास्यत्व कर्म जें आहे तें स्वाभाविकच आ-
"हे ह्मणून कोणता शूद्र त्या दास्यत्वापासून मुक्त होऊन तें आ-
"पलें सेवारूप कर्म टाकील असा तर कोणी एकहि नाहीं" (४१४).
"ब्राह्मणाचा प्राणांतिक दंड जो करणें हें अत्यंत मूर्खत्व आहे
"याजकरितां त्याची शेंडी सुद्धां हजामत करावी ह्मणजे प्राणां-
"त दंड केल्यासारिखेंच झालें इतर वर्ण क्षत्रिय वैश्य शूद्र जे
"त्यांचा प्राणांतच दंड करावा" (३७९). "संपूर्ण पापाच्याठायीं-
"ही सर्वकाळ वर्तणारा ब्राह्मण जो आहे त्याला कधीं जिवें मा-
"रूनये त्याला आपल्या राज्याच्या बाहेर घालवून मात्र द्या-
"वा आणि त्याच्या संपूर्ण द्रव्याचाहि नाश करूनये" (३८०).
"ब्राह्मणाच्या वधापेक्षां मोठा अधर्म पृथ्वीमध्यें दुसरा को-
"णताहि नाहीं ह्मणून त्याच्या वधाविषयीं राजाने मनामध्यें-
"हि चिंतन करूनये" (३८१). "या आज्ञापेक्षां अणखी वा-
"ईट काय आहे? जीं अल्प प्रायश्चित्तें सांगितलेलीं आहेत तीं-
हिं फार उपद्रवकारक आहेत.

ह्मणं

क्षणं ब्रह्माहमस्मीति यः कुमारात्म चिंतन
तत्सर्वं पातकं हन्यात् तमः सूर्योदयो यथा

“जो पुरुष एक क्षणभर मी ब्रह्म आहें असें चिंतन करील त्या-
“चें सर्व पाप नाश पावत जसा सूर्योदय झाला असतां अंधः
“कार नाश पावतो तसेंच.” “ज्या पुरुषानी अपराध करून रा-
“जापासून योग्य शासन घेतलें आहे ते स्वर्गास जातील.”
“(मनु०८अ०) श्राद्ध आणि क्रिया पुत्रादिकरितील असें समज-
जून पापी लोक शासनाचें भय धरीत नाहींत. मनूने असें
सांगितलें आहे कीं “जो ब्राह्मण वेदाभ्यास करीत असतो
“तो आपल्या पंक्तीला आणि आपल्या वंशांतील सात पाठी-
“मागले आणि सात पुढल्यांला आणि हीजीं सर्व पृथ्वी तिला-
“हि पवित्र करण्यास योग्य होतो.” मनु०१॥१०९)“जे शा-
“स्त्राचा अर्थ समजत नाहींत त्यांसहि तो आश्रय आहे.”
मनु०६॥(४)

आह्मी ज्या आज्ञा कळविल्या त्यापाहून वाचणारांस ल-
ज्जा आणि खेद वाटणार नाहीं हें अशक्य आहे. त्या आज्ञा अ-
तिशय वाईट आहेत. त्या नीतीचा नाश करणाऱ्या आहेत. ज-
र त्या ख्रीस्ती शास्त्रांतील वचनासीं ताडून पाहिल्या तर आ-
काशांतील प्रकाश आणि नरकांतील अंधःकार यांत जित-
कें अंतर तितकें त्यांत दिसून येईल. ख्रीस्ती धर्मांत असेंस

ष्ट

ष्ट सांगितलेलें आहे कीं कोणत्याहि प्रकारची हिंसा करूं नये आ-
णि दुर्वासना अवश्य मोडून टाकाव्या आणि नम्रता धरून ई-
श्वराच्या इच्छेस अनुसरून आणि सर्व दुःखांत अधिक बरेप-
णा धरावा. सत्यवचन निष्कपटपणा आणि परस्त्रीचा लोभर-
हीत राहणें यांचा कधींहि भंग करूं नये. जरीं चांगला हेतु धरू-
न वाईट कर्म घडलें तर त्याचें पातक लागत नाहीं असें ख्री-
स्ती शास्त्रांत सांगितलें नाहीं परंतु त्यांत असें ह्मटलेलें आहे
कीं “बरें व्हावें ह्मणून जे कोणी वाईट कर्म करितात ते अन्या-
“यी ठरविले जातील.” भक्ती करून दोष दूर होतात असें ह्मणत
नाहीं परंतु असें सांगतो कीं अन्यायी गोष्ट मनांतहि आणली
असतां ईश्वर आपलें कांहींच ऐकत नाहीं. ईश्वराच्या देवळां-
त असतां नीतीविषयीं कांहींच भेद राहत नाहीं असें ह्मणत
नाहीं परंतु त्यांत असें सांगितलें आहे. कीं “ज्याने दुष्कर्में के-
“लीं नाहींत आणि ज्याचें अंतःकरण शुद्ध आहे ज्याने दांभि-
“कपणा केलाच नाहीं अथवा खोटी शपथ वाहिली नाहीं.
“त्या वांचून इतर ईश्वरासंन्निध जाऊन त्याच्या पवित्र स्थानीं
“उभे राहूं नये.” जे इतरांपेक्षां ज्ञाते आहेत त्यानी दोष केले
असतां दुसऱ्यांपेक्षां त्यांस कमी पाप लागतें आणि दुसऱ्यांपे-
क्षां दयेस अधिक पात्र आहेत असें त्यांत सांगितलें नाहीं,
परंतु त्यांत असें योग्य वचन आहे कीं “ज्या सेवकास आ-

पल्या

"पल्या धन्याची इच्छा माहीत असतां तसें करायास तो जर
"सिद्ध झाला नाहीं तर त्याला बहुत फटके बसतील परंतु ज्या-
"ला धन्याची इच्छा माहीत नाहीं त्याने जर फटके खाया-
"जोगें काम केलें तर त्याला थोडे फटके बसतील. कारण
"कीं ज्यास बहुत दिल्हें आहे त्यापासून बहुत मागितलें
"जाईल आणि लोकानी ज्यांपासीं बहुत दिल्हें असेल त्यांपा-
"सून ते अधिक मागतील" दुःखी लोकांचें वित्त हरण करूं
नये परंतु त्याची काकळून जाणावी असें त्यांत सांगितलें
आहे. मनुष्यानी आपल्या कुवासनांची अगदीं परिपूर्ती करा-
वी आणि जोंपर्यंत इंद्रियांस पाप करण्याची शक्ति असेल
तोंपर्यंत त्यानी खुशाल पाप करावें असें ह्मटलें नाहीं परंतु
असें सांगितलेलें आहे कीं "जो स्त्रीला पाहून त्याच्याठायीं दु-
"र्वासना धरितो त्याने आपल्या अंतःकरणांत तीशीं व्यभिचार
"केला आहे" स्त्रियानी व मुलानी आपल्याहून थोर असती-
ल त्यांच्या आज्ञा मान्य कराव्या मग त्यांत न्याय असो किं-
वा अन्याय असो असें त्या शास्त्रांत सांगितलें नाहीं परंतु
त्यांत असें आहे कीं "ईश्वराच्या आज्ञांप्रमाणें त्यांस मात्र
"मान्य करावें" पाप इतकी लाहन गोष्ट आहे कीं न्यायाधीशा-
ने शिक्षा केल्यानें जातें असें त्यांत ह्मटलें नाहीं परंतु असें सा-
गितलेलें आहे कीं पाप इतकें वाईट आहे कीं त्याला चिरका-

ळ दंड योग्य आहे. पापी मनुष्यें स्वतां पुण्य करायास समर्थ
आहेत किंवां त्याच्या मरणानंतर त्याचे इष्ट मित्र त्यांस दुः-
खापासून मुक्त करायास समर्थ आहेत असें त्यांत सांगित-
लें नाहीं परंतु असें ह्मटलें आहे कीं मनुष्याचें सर्व पुण्य म-
ळीन चिंध्या सारिखें आहे आणि मरणसमयीं तरलेली अ-
थवा बुडलेली जसी मनुष्याची स्थिति असेल तसीच अक्ष-
य राहील. आणि त्या संबंधी त्यांत असें भयास्पद वचन आ-
हे कीं "जो अन्यायी असेल त्याला अन्यायीच असूं दे; जो
मळीन असेल त्याला मळीनच असूं दे; आणि जो नीतिमा-
न् त्याला नीतिमान् असूं दे आणि जो पवित्र त्याला पवित्र-
च असूं दे" सारांश त्या शास्त्राने सर्व प्रकारचें पाप दोषी ठर-
विलें आहे. मनुष्यें आपल्या बुद्धीने जी अपूर्ण नीती सांगता-
त तसी त्यांतील नाहीं परंतु त्यांतील नीती सर्व चांगली आ-
हे. जीं उदाहरणें त्यांत सांगितलीं आहेत तीं चांगलीं आहेत;
ज्या आज्ञा आणि वचनें त्यांत आहेत तीं चांगलीं आहेत;
आणि जे हेतू आणि आधार त्यांतून मिळतात तेहि चांगले
आहेत. तें शास्त्र ईश्वराच्या पवित्र आणि शुद्ध गुणाची प्र-
तिमा जसी असावी तसेंच केवळ देवाने दिल्हेलें शास्त्र
दिसतें.

३ नारायणरावाने जी पद्धती लिहिलेली आहे त्यांत
"निदिध्या-

"निदिध्यास" लिहिला आहे. तो तर म्या अगोदरच खोडला आहे. ख्रीस्ती धर्मांत तसें कांहींच ह्मटलें नाहीं.

५. अनेक धर्मांत वेगवेगळीं "मतें" आहेत तर "अनेकधर्मांतील मूळतत्व आणि सिद्धांत एकच आहेत" असें कसें होईल? मी एथें सुचना करितों कीं वास्तविक ख्रीस्ती लोकांत जीं मतें आहेत तीं लाहन गोष्टीविषयीं आहेत; आणि त्यांत जे भेद आहेत ते धर्म पुस्तकास जसजसें लक्ष आणि सन्मान देतात त्या त्याप्रमाणें फार करून ते भेद नाहींसे होतात. परंतु हिंदुलोकांतील गोष्ट तर अगदीं वेगळी आहे. शास्त्रें एकाच आधारावरून झालेलीं ह्मणवतात तथापि तीं परस्परांस आणि आपणासहि खोडतात. यास उदाहरण मनुष्याची बुद्धी गुंग करावी असाच वास्तवीक देवाचा बेत होता आणि सत्व रज आणि तम ह्या देवाच्या वेगवेगळ्या गुणांपासून पुराणें निर्माण झालीं असें कधीं सांगतात.

६. कित्येक प्रसंगीं "उपोषणें" करावीं हें खरें आहे. कधींतरीं आपल्या अथवा दुसऱ्यांच्या पापाविषयीं इतका खेद करावा कीं आपणास अन्नोदकाची रुचीच राहणार नाहीं. अनेक प्रसंगीं आपणास देवाच्या भक्तींत इतकें तत्पर राहानें लागेल कीं नित्यासारखा अन्न घ्यायास आपणास वेळहि मिळणार नाहीं. आणि दुर्वासनाचा नाश

करायासाठीं

करायासाठीं आपला आहार तोडावा लागेल अथवा कांहीं कालपर्यंत निराहारहि राहावें लागेल. हिंदू धर्मांत असीं उपोषणें सांगितलीं आहेत ह्यासाठीं मात्र मी त्याजवर दोष ठेवितों असें नाहीं किंवा उपोषणें सांगितलीं आहेत ह्मणून तो धर्म चांगला आहे असेंहि मी ह्मणत नाहीं. उपोषणें करून पुण्य मिळतें असें हिंदूशास्त्रांत आहे. ह्या ग्रंथाच्या दुसऱ्या भागीं असें दिसून येईल कीं मनुष्याच्या हाताने किंवा मनुष्याच्या सुकर्माने पुण्य घडत नाहीं. ख्रीस्ती शास्त्रांत उपोषणें योग्य आहेत असें सांगितलें आहे परंतु त्यांत पुण्य आहे किंवा तीं अमुकच काळीं करावीं असें त्यांत ह्मटलें नाहीं. लेंट नामें उपवास मूर्तिपूजकांच्या रीतीप्रमाणें आहे असें नारायणराव ह्मणतो तो सर्वत्र ख्रीस्ती लोक करीत नाहींत. "रोमन क्याथोलिक" मतानुसारी लोक धर्माचें पालन नीट करीत नाहींत त्यां खेरीज सर्व ख्रीस्तीलोक ह्मणतात कीं उपवास करणें हें अनुकुळते प्रमाणें आहे. तो उपवास करावा असी ख्रीस्ती शास्त्रांत एकतरीं आज्ञा आहे असें ते ह्मणत नाहींत.

६. "धूप दीप नैवेद्य ईश्वरार्पण करणें आणि गीत वाद्य "स्तोत्र" ज्याविषयीं नारायणरावाने ह्मटलें आहे तीं सर्व एकाच प्रकारचीं आहेत त्याविषयीं एथें मला फार बोलणें नलगे. मोरभटदांडेकरास म्या उत्तर दिल्हेलें आहे त्यांत त्यांविषयीं

हिंदू

हिंदू आणि ख्रीस्ती लोकांच्या भक्तीचें बहूत ताडन केलें आहे आणि हिंदू लोकांच्या भक्तीचा वाईटपणा आणि ख्रीस्ती लोकांच्या भक्तीचा उत्तमपणा दाखिवलेला आहे. नारायणरावानें "व्रताचे वार वगैरे" यांविषयीं आपल्या पद्धतीच्या शेवटीं लिहिलें आहे. यांविषयीं संक्षेपानें एथें लिहितों. देवाच्या आज्ञेप्रमाणे ख्रीस्ती लोक शाब्बाथ ह्मणजे आदितवाराचें पालन करितात त्यांचें स्वस्थपण मर्यादा आणि पवित्र आचरणें ती हिंदू लोकांच्या उत्साहांतील आणि यात्रेंतील धामधुम गलबला आदाआट मस्ती आणि मूर्खत्व आणि केवळ पापकर्में यांच्यामध्यें जें अंतर आहे तें ज्या ज्या लोकांस माहीत होईल त्यांस फार आश्चर्य वाटेल. ख्रीस्ती लोक आदित्यवारीं पवित्र विसांवा घेतात आणि आत्मनिष्ठेने आणि सत्यत्वाने ईश्वराची भक्ती करितात. हिंदू लोकांचें सण यथाशास्त्र जरीं केले तरीं त्यांत केवळ खेवळलकेपणा आणि ख्याली खुशाली मात्र होते आणि पाप तर इतकें करितात कीं कोणत्याहि विचारीक मनुष्याला तें अतिशय त्रासदायक व्हावें. होळीच्या आणि दिवाळीच्या दिवसीं पाप करावयास ज्या आज्ञा दिल्या आहेत त्यांविषयीं आह्मी अगोदरच कळविलेंच आहे.

७. नारायणरावानें "उपासनेचे पर्याय" लिहिले आहेत त्यांत "पश्चात्ताप" आणि "शरण होऊन क्षमा मागणें" हे-

हि

हि दोन पर्याय आहेत, त्याहींकरून उद्धार मिळतो असें हिंदूलोक फारकरून समजतात. दोन्हीपासून कसी देवाची भक्ती घडती आणि त्यांपासून काय फळ प्राप्त होतें त्या विषयाचा विचार करावा.

पश्चात्ताप हा नीती संबंधी धर्म आहे. ज्यानी पाप केलें आहे आणि ईश्वराच्या आज्ञा भंग केल्या आहेत त्यांस पश्चात्ताप करणें आवश्यक आहे. त्यांस योग्यच आहे कीं त्यानी आपल्या पापाचा खेद मानावा आपल्या अपराधाविषयीं दुःखीत असावें पापाचा तिरस्कार करावा देवाकडे मन फिरवावें, आणि देवाच्या सेवेस अनुसरावें. पश्चात्ताप होण्याविषयीं आणि त्याच्या परिणामाविषयीं हिंदूशास्त्रांत फार प्रसिद्ध दोष आहेत.

हिंदूशास्त्रावरून पश्चात्ताप होण्यास योग्य हेतु मिळत नाहीं याविषयीं शुद्ध विचार केला असतां सर्व मान्य करितील. वास्तविक पश्चात्ताप होऊन मन अगदीं पालटलें जातें. तो देवाचे गूण आणि देवाच्या आज्ञा यथास्थीत समजल्यावांचून घडत नाहीं. काम क्रोध लोभ मोह मद आणि मत्सर याहींकरून मनुष्यमात्र लिप्त होत्साता त्यांस वास्तविक पश्चात्ताप याच्या स्वाधीन नाहीं. हिंदूशास्त्र पश्चात्ताप होण्यास साहाय्य करीत नाहीं. त्या शास्त्रावरून उलटें असें होतें कीं पश्चात्ताप नि-

र्माण

र्माण होण्यास आणि त्याची वृद्धि होण्यास फार प्रतिबंध होतो.
पाप्यास जर यथास्थीत नीति कळत नाहीं आणि ईश्वराच्या शा-
स्त्राचा भंग झाल्याने जो परिणाम होतो तोहि माहीत नाही तर
पापाविषयीं त्याच्याठायीं पूर्ण अनुमान होत नाहीं. अंतःकर-
णांत जर स्वाभाविक विकल्प उठले तर हिंदू तेव्हांच त्यांस मोडूं
सकतो त्याने खुशाल ह्मणावें कीं "ज्या धर्माप्रमाणें मी आचरतों
"त्याच्या आज्ञेचा विचार केला असतां मला पापाविषयीं दुःखी-
"त व्हावयास काय प्रयोजन आहे? मी कसाहि वाईट असलों
"तथापि ज्या देवाची आराधना करितों त्याजपेक्षां मी अधिक
"वाईट नाहीं. त्या देवापेक्षां मी चांगला आहें. बहुतेक देवांचे
"गूण फारच वाईट आहेत. अद्यापि मी शिवाच्या नीच आणि
"कंटाळवाणें आचरणांत लिप्त झालों नाहीं आणि माझ्या दु-
"ष्टमित्राच्या मंडळींतून काढला गेलों नाहीं. ब्रह्म्यासारिखा मी
"सर्व नीतीचा प्रतिबंध सोडून दिल्हा नाहीं आणि लज्जास्पद
"पापें करून भ्रष्टगूण शक्तिहीन आणि योग्य सन्मानविरही-
"त झालों नाहीं. कृष्ण जो विष्णूचा अवतार त्यासारिखा मी
"दुष्कर्मे आणि दुर्वासना यांत अगदीं बुडालों नाहीं आणि त्या-
"सारिखा मी पक्का लबाड क्रूर हिंसक आणि बिलंद चोर अ-
"सें कोणी ह्मणूं सकणार नाहींत रामासारिखा मी वचनाचा
"भंग केला नाहीं आणि निरपराधी आणि निरांश्रीत जी मा-
ज्ञी

"ज्ञी स्त्री तिचा त्याग केला नाहीं. गणेशासारिखा मी पापीविचा-
"रांत शिरलों नाहीं आणि ज्या पृथ्वीवर मी आहें तिच्या सर्वभा-
"गीं नास्तीकपणा व्हावा अशास मी प्रवृत्त झालों नाहीं. स्वर्ग-
"वासी गंधर्वासारिखी युद्ध व्यस्ताव्यस्तता आणि नाश म्या के-
"ला नाहीं. म्या जीं पापें केलीं त्यांतील बहुतेक स्वल्प आहेत आ-
"णि त्यांस आपल्या शास्त्राचा आधारहि आहेच. माझ्या खो-
"ट्या साक्षीची काय चिंता आहे? कारण कीं म्या गोब्राह्मणा-
"च्या हितार्थ आणि माझ्या सुखासाठीं त्या दिल्ह्या. म्या कुक-
"र्मीने जें द्रव्य मिळविलें त्यांतून एक दशमांश देवास अर्पण
"करून त्यास प्रसन्न केला. म्या व्यभिचार केला तर तो देवा-
"च्या समक्ष घडला आणि त्यास देवाचा आधार आहे आ-
"णि त्यापासून ब्रह्मचर्याचें काहीं फळ आहे. ज्या दोषांच्या
"आचरणें करून मी अपराधी असाच ठरतों त्यांस माझे स्वा-
"धीन बहुत उपाय आहेत. जीं प्रायश्चित्तें माझ्याने करवती-
"ल तेणें करून ईश्वराची तृप्ति होईल. त्या तेथील तळ्यावर
"किंवा नदीवर मी आपलीं सर्व पापें धुवून टाकीन. देवाने म-
"ला जें द्रव्य दिल्हें आहे त्याच्या एका अंशाने मी पुण्याची
"रास मिळवायास समर्थ आहें. जर कदाचित् मी कोणास
"उपद्रव केल्याने दोषी ठरलों तर लोकानीं मला शासन के-
"ल्याने ईश्वर मला दंड करणार नाहीं. जर मी पापांत म-
रण

“रण पावलों तर पुढें अनेक जन्म घेऊन पापांतून मुक्त होईन
“माझा स्वभाव आणि ईश्वराचा स्वभाव एकच आहे. त्याने
“मला जर चिरकाल टाकून दिल्हें तर त्यासहि तेणेंकरून दु:
“ख आणि अपेक्षा आहे. तर म्या पापाचा खेद काय ह्मणून
“मानावा ? त्यास मी कशासाठीं फार भ्यावें ? त्यांतून मुक्त व्हा-
“यास आणि तें सोडून द्यायास म्या कशासाठीं दुःख भोगावें”.
याप्रमाणें धर्मनिष्ठ हिंदूचें ह्मणणें आहे. त्यास वेदांचा आणि
पुरांणाचा आधार असतां मग त्याने पापांचा काय ह्मणून प-
श्चात्ताप करावा ? त्याच्या मनांत जे विकल्प उठताततेत्याच्या
धर्मामुळें उठत नाहींत. परंतु साहजीक सत्याच्या भयाने
विकल्प उठतात. त्यांस पश्चात्ताप ह्मणतात. संस्कृत भाषेंत
त्यांस दुसरा शब्द नाहीं. त्या मागील संतापांत वास्तविक म-
न पालटणें एक लेशहि नसेल. तो मागील संताप मनुष्याच्या
भयामुळें अथवा स्वाभाविक लज्जेमुळें निर्माण होतो. इत-
केंच.

हिंदू शास्त्रावरून ज्याप्रमाणें पश्चात्ताप होतो त्या-
प्रमाणें म्या निवेदन केला आहे परंतु प्रस्तुत तो विचार मी
आणखी करीत नाहीं. त्या शास्त्रावरून पश्चात्ताप झाला
असें क्षणभर कल्पितों. ईश्वरास आपली स्थिति मान्य व्हा-
यास यद्यपि जरीं पश्चात्ताप आवश्यक आहे तथापि तेणें
करून

[illegible] Oriental MSS. Library, [illegible] P.O., [illegible]

करून पापाची क्षमा असी मिळेल ? देवाच्या आज्ञा भंग क-
रून परात्पर आणि अत्यंत चांगला भगवान त्याजपुढें जें पा-
प करणें तें अति वाईट असतां पश्चात्तापाने जाणार नाहीं.
देवाच्या आज्ञा भंग केल्याने त्याचा अपमान होतो अथवा
फार किंवा थोडी अवमान्यता इत्यादिक जे परिणाम होता-
त ते पश्चात्तापाने टळत नाहींत. मनुष्य जातींतच पश्चात्ता-
पाने काहींच साध्य होत नाहीं. जो मनुष्य दुष्कर्में करून आ-
पलें शरीर क्षीण करितो आणि आपली प्रकृत बिघडतो त्या-
ला पश्चात्तापेंकरून तीं पुनः साध्य होत नाहींत. जो मनुष्य
आपली अबरू गमावतो तो जरीं आपला अपराध कबूल क-
रितो आणि त्याचा खेद मानितो तथापि लोकांची प्रीति आणि
विश्वास संपादन करूं सकत नाहीं. न्यायाधीश ज्या अपरा-
ध्यास मारून टाकण्याचा निर्णय सांगतो तो अपराधी जरीं
रडला आणि पश्चात्ताप पावला आणि प्रार्थना करूं लाग-
ला तथापि बहुधां ठारच मारला जातो. आणखी एक दृष्टां-
त पाहा कीं पृथ्वीवरील राजाचा आज्ञा भंग केला असतां
त्याकरितां दुःखीत मात्र व्हा ह्मणजे मी तुह्मास क्षमा करी-
न असें तो ह्मणेल कीं काय ? तो जर पश्चात्तापासाठीं अप-
राध क्षमा करील तर त्याची सत्ता मान्य केली जाणार ना-
हीं तसा ईश्वर जर पश्चात्तापासाठीं पापक्षमा करील तर
त्याचें

त्याचें सामर्थ्य आणि सत्ता मान्य केली जाणार नाहीं. मनुष्या-
ला पाप करण्याची आणि पाहिजे तेव्हां तें घालिवण्याची
जर शक्ति आहे तर तो कधीं आज्ञा मान्य करणार नाहीं. आ-
णि देवदूत आणि दुसरे वरील बुद्धिमान प्राणी त्याची वर्त-
णूक आणि विजय पाहून देवाची सत्ता अवमान्य करायास
आणि देवाच्या आज्ञा मोडायास उद्युक्त होतील.

खरा पश्चात्ताप केला असतां देवाच्या आज्ञा मान्य
कराव्या. ही खरी गोष्ट आहे परंतु आज्ञा मान्य केल्याने ईश्व-
र पांपापासून क्षमा करणार नाहीं. आज्ञा मान्य केल्याने मा-
गील कर्मांसीं संबंध घडत नाहीं. "ईश्वर जो आपला देव त्या-
"ची प्रीति तूं आपल्या सर्व अंतःकरणाने सर्व आत्म्याने सर्व
"शक्तीने आणि सर्व मानाने कर". ही देवाची आज्ञा आपण
प्रतिक्षण मान्य करावी असी देवाची आज्ञा आहे. आणि
देवाने असें कळविलेलें आहे कीं आपण एकाद्या स्थितीं-
त त्याप्रमाणें आचरलों तर त्याचा आपले मागील स्थिती-
सीं कांहींच संबंध नाहीं. परंतु त्याक्षणीं जें पाहिजे तें मात्र
घडतें. देव आपल्या अंतःकरणाच्या द्वाराने अणखींहि
असें कळवितों कीं आपण कितीहि चांगलें आचरलों तरीं
लाभ संपादक नव्होत. आपल्या जन्मांत एक वेळहि आप-
ण देवाची आज्ञा संपूर्ण मान्य करीत नाहीं. आणि आपलें

सर्व

सर्व पुण्य त्याच्या पुढें मळीन चिंध्या सारिखें आहे त्याप्रमाणें
आपण स्वतांच्या पुण्याची आशा सोडून द्यावी असें तो जाणव-
तो आणि असें सांगतो कीं जर आपण तारले जायास इच्छितों
तर आपणास देवाच्याच केवळ दयेने आणि कृपेने तारलें गे-
लें पाहिजे.

मनुष्यें स्वभावेंकरून जरीं मदोन्मत्त आहेत आणि पा-
पांतून सुटायाची अनेक कल्पना करून पाहतात तथापि त्यां-
चीं अनुमाने म्या विचार सांगितले त्याप्रमाणे होतात. नारा-
यणरावाची पद्धती जी म्यापूर्वींच लिहिली आहे तिजमध्यें
"शरण होऊन क्षमा मागणें" त्यानेहि लिहिलें आहे. हिंदू-
लोकांच्या पुजेच्या पोथ्यांत पुढले श्लोक लिहिलेले आहेत.

पापोहं पापकर्माहं पापात्मा पापसंभवः
त्राहिमां पुंडरीकाक्ष सर्वपापहरोहरिः

याचा अर्थ "मी पापी आहे मी पापकर्मी आहे माझा आत्मा
"पापी आहे पापापासून उत्पन्न असा जो मी माझें सर्व पा-
"प हरण करणाऱ्या कमलपत्राक्षा हरि पालन कर."

अन्यथा शरणं नास्ति त्वमेव शरणं मम
तस्मात् कारुण्यभावेन रक्षस्व परमेश्वर

याचा अर्थ "मला दुसरा रक्षणारा नाहीं तूंच मला रक्षणा-
"रा यास्तव दयाभावेंकरून हे परमेश्वरा माझें रक्षण कर."

मत्समो

मत्समो नास्तिपापिष्ठः त्वत्समो नास्तिपापहा
इतिसंचित्यमनसा प्राणान् संधारयाम्यहं॥

याचा अर्थ "माझ्या सारिखा पापी नाहीं तुझ्या सारिखा पाप "नाश करणारा नाहीं असें मनाने चिंतन करून मी प्राण धा"रण करितों."

पापिना महमेवाग्र्यो दयालूनां त्वमग्रणीः
दयनीयो मदन्योस्ति तवकोत्र जगत्रये॥

याचा अर्थ "पाप्यामध्यें मीच मुख्य आहें दया करणाऱ्यांत तूं "मुख्य आहेस तुला ह्या जगत्रयाचाठायीं माझ्यावांचून दया "करण्यास पात्र दुसरा कोण आहे?"

अपराध सहस्राणि क्रियंते हर्निशंमया
दासोहमितिमांमत्वा क्षमस्व परमेश्वर

याचा अर्थ "मी रात्रंदिवस हजारों अपराध करितों मी दास "आहें असें मानून हे परमेश्वरा क्षमा कर."

ह्यावरूनहि सिद्ध होतें कीं पापाची क्षमा झाली पाहिजे. ह्याविषयीं ज्या प्रश्नांचा विचार करावा ते हे आहेत कीं क्षमा करायास कोण समर्थ आहे? आणि कोणत्या करारानी क्षमा केली जाईल?

ईश्वर जो परात्पर देव तो मात्र क्षमा करायास सकतो. पापें करून ज्या शास्त्राचा भंग झाला तें त्याचें शास्त्र आहे.

पापी

पापी लोक ज्या राज्याच्या आणि ज्या सत्तेच्या विरुद्ध आचरतात तें त्याचें राज्य आणि त्याची सत्ता आहे. जर तो क्षमा करणार नाहीं तर कोणी मध्यस्थ होऊं सकत नाहीं आणि कोणाच्याने क्षमा करवणार नाहीं. परंतु हिंदूलोक त्याची प्रार्थना करीत नाहींत. पूर्वी सांगितलेल्या प्रार्थना विष्णु आणि शिकजे पुराणांतरीं पाप्यांचे शिरोमणी असे वर्णिलेले आहेत त्या कल्पित देवांस करितात. हिंदू लोक दुसऱ्या ज्या प्रार्थना करितात त्याहि भलत्याच देवांस करितात. कितीएक प्रार्थना दगडांधोंड्यास करितात आणि कितीएक प्रार्थना जे देव नव्हेत त्यांस करितात.

विचार करा देवाचा स्वभावांत जो न्याय साहजिक आहे तो आणि पवित्रपणा जो पापाचा अगदीं द्वेष करितो तो आणि देवाचें वचन कीं मी पापामुळें दंड करीन ह्या तिन्ही गोष्टींस बाध आला असतां त्याच्याने अपराध्यांस क्षमा करवत नाहीं. जी समजूत केली पाहिजे ती मनुष्यांचा पश्चात्ताप किंवा चांगलें आचरण करूं सकत नाहीं. आपणच आपल्या बुद्धीने उद्धार होण्याचा उपाय सांगायास असमर्थ आहों. ह्मणून त्याविषयीं देवाने प्रगट केलेलें शास्त्र आपणास अवश्य पाहिजे. हिंदूधर्म बहुत कारणास्तव खोडला जातो त्यांत उद्धार होण्याविषयीं जो उपाय सांगितला

आहे

आहे तो खोटा आहे असें ठरविलें आहे. ख्रीस्ती धर्म निर्बा-
ध चिन्हांवरून देवाने प्रगट केलेला आहे असें दाखिवलें
जाईल त्यांत उद्धार होण्याविषयीं जो उपाय कल्पिला आ-
हे त्यांत जें जें अवश्य पाहिजे तें तें आहे.

मोरभट दांडेकरास म्या जें उत्तर दिल्हें आहे त्यांत
म्या असें लिहिलें आहे कीं "ख्रीस्ती धर्माच्या सिद्धांताप्रमा-
"णें असें स्पष्ट दिसतें कीं देवाने जगावर एवढी प्रीति केली
"कीं आपला एकुलता एक पुत्र पाठवून दिल्हा कीं त्यावर जो
"कोणी विश्वास ठेवील त्याने नाशास नजावें परंतु त्याला स-
"र्वकाळचें जीवन व्हावें. ज्यांस तारावयाचें देवाच्या मनां-
"त होतें त्यांविषयीं येशू ख्रीस्त स्वप्रीतीने मानलेला जामी-
"न व प्रतिनिधी होऊन त्यांच्या पापाचा दंड भोगण्यासा-
"ठीं मनुष्यांचा प्राण व शरीर धारण केलें. ज्यावेळेस ये-
"शू ख्रीस्ताच्या पुण्यार्थ लोकांच्या पापाची देव क्षमा क-
"रितो त्याच वेळेस पापाचें वाईटपण प्रगट करितो. गोष्ट
"असी आहे कीं जसें येशू ख्रीस्त लोकांच्याठायीं स्वप्रीती-
"ने असतां बापाने त्यास रक्षिलें नाहीं तसें पापिष्ठ लोक आ-
"पल्याठायीं असतां त्यांस तो रक्षणार नाहीं. देवाने आप-
"ल्या पुत्राविषयीं जें केलें तेणेंकरून जर सर्व सृष्टीमध्यें
"पापाचें नियमन होणार नाहीं तर स्पष्ट दिसतें कीं यानंत-

र

"र सर्व लोक आपल्या पापास योग्य असा दंड भोगावा ला-
"गेल!"

ह्याप्रमाणें ख्रीस्ती धर्मांत उद्धार होण्याविषयीं जो
उपाय सांगितला आहे तो देवाच्या गौरवाची आणि मनु-
ष्याच्या हिताची फार वृद्धि कराया जोगा आहे.

पाहा कीं देवाची कृपा तेणेंकरून कसी स्पष्ट होती आ-
णि देवाचें चांगुलपण कसें मोठें दिसून येतें. ख्रीस्त जो देवाचा
पुत्र तो बापाची अत्यंत मोठें आणि परमप्रिय वस्तू आणि बा-
पाची फार मोठी देणगी आहे. तो अनिर्वाच्य देणगी आहे आ-
णि निर्माण करणाऱ्या शक्तीने जी असंख्य आणि अगणीत
उत्तम जगें उत्पन्न केलीं त्यांजपेक्षां ती देणगी फार फार अमो-
लीक आहे. तो मनुष्यासाठीं दंड भोगायास आणि मराया-
स दिल्हा होता. आपणास तारायाठीं तो दिल्हा जावा असा
आपणास अधिकार नव्हता. त्याविषयीं पाउलस नामें ख्री-
स्ताच्या एका प्रेषिताने असें ह्मटलेलें आहे कीं "जेव्हां आह्मी
"निर्बळ झालों होतों तेव्हां ख्रीस्त पापी लोकांसाठीं योग्यका-
"ळीं मरण पावला. कारण कीं न्यायी मनुष्यासाठीं बहुधां
"कोणी मरणार नाहीं परंतु कदाचित् चांगल्या मनुष्याक-
"रितां कोणी तरीं मरायास सिद्ध होईल. परंतु आह्मी पा-
"पी असतां ईश्वराने आह्मावर प्रीति केली असतां ख्रीस्त

आह्मा

"आह्मासाठीं मरण पावला." जेव्हां देवास मनुष्याकरितां मध्यस्थपणा करावा असें वाटलें तेव्हां मनुष्यावर त्याने दया आणि कृपा करावी इतकी त्यांची योग्यता नव्हती. ते त्याच्या कृपेपासून वेगळे झाले होते आणि त्यानी त्याच्या सत्तेची अवगणना केली होती. त्यांचा स्वभाव बिघडला होता आणि कुत्सित झाला होता. आणि ते अनिवार कर्मे करीत होते; देवाच्या आज्ञा त्यांस दुःखदायक वाटत होत्या आणि त्या सर्व आज्ञा त्यानी पायां खालीं तुडवल्या होत्या. तें शासन आणि नरकभोगाचीस योग्य झाले होते. त्याच्या कंगालीमुळें देवाला दया आणि कृपा उपजल्या आणि त्याच्या अपार चांगुलपणामुळें त्याने असा उपाय योजिला कीं मनुष्यानी पापांतून मुक्त व्हावें आणि पापाच्या स्वाधीन राहूं नये आणि मरणानंतर सुखाच्या आणि आनंदाच्या स्थितींत असावें.

पाहा ख्रीस्ती धर्मेंकरून ईश्वराची पवित्रता आणि न्याय कसा मोठा दिसून येतो. पापी लोकांस देवाने कसें तारावें हें आणि पापाचा परिणाम किती अत्यंत वाईट आणि संकटकारक आहे हें त्या शास्त्रावरून फार स्पष्ट होतें. देवाचा न्याय अचूक आहे ह्याविषयीं त्या शास्त्रांतील प्रमाण फारच आश्चर्यकारक आहे. ईश्वर सर्वजगांतील नीतीचा रक्षिता याला बाध न येऊं देतां मनुष्याला

तारणें अशक्य ह्मणून त्यास पापी मनुष्याकरितां पुत्राच्या स्वसंतोषाप्रमाणें आपला पुत्र द्यावा लागला. देवानें त्यास अमुक कार्यास पाठविला त्यापासून अमुक काम करून घेतलें आणि त्यास अमुक दंड भोगायास लाविलें असें केवळ नाहीं परंतु देवाने त्यापासून असें करविलें कीं कोणी ह्मणेल त्यास सोडून दिल्हें. जो देवाचा फार प्रियपुत्र होता त्याला त्याने असी आज्ञा केली कीं त्याने आपल्या बापाच्या वक्षस्थलांतून वेगळें व्हावें त्या मनुष्याचा नीचस्वभाव सर्व आणि असमर्थत्व याहींकरून युक्त असा धारण करावा त्याने सेवकाचें रूप धरून तेंच कार्य करावें त्याने आदामाच्या पापी संततींत देह धारण करावा त्याने त्यासाठीं उद्धार मिळवीत असतां त्यांची निंदा धिःकार आणि छलना भोगावी त्याला सैतानापासून नीचपणाने प्रतिबंध आणि दुर्वासना व्हाव्या आणि त्यांतून आणि सर्व संकटांतून त्याने सरळ संपूर्ण धर्मिष्ठपणाने असावें त्याने मनुष्याचा उद्धार मिळवायाकरितां श्रम पावावे मेहनत घ्यावी आणि अति दुःख भोगावें ज्यास पाप माहीत नाहीं त्याने पापरूपी व्हावें किंवा पापाचा दंडाला पात्र गणलें जावें आणि सर्वप्रकारें पाप्यासारिखें मानलें जावें कांकीं त्याच्या योगाने आ-

पणास देवाने पुण्यवान् समजावें त्याने मनुष्यासाठीं शापि-
लें जावें आणि सर्व पृथ्वींतील दोषांचा भार आपणावर घ्या-
वा त्याने मनुष्याचा प्रतिभु आणि जामीन असें असावें कीं
आपल्या सर्व पापास योग्य दंड तो त्यापासून भरून घ्या-
वा देवाचा राग मिश्रीत केल्यावांचून त्याच्या डोकीवर
पडलेला आहे तो त्याने सहन करावा त्याला इतकें दुःख
व्हावें कीं त्यानें त्या वेधनेने असें ओरडावें कीं "माझ्या दे-
"वा माझ्या देवा त्वां माझा कशासाठीं त्याग केला?" आणि
त्याने प्राण सोडावा आणि त्याची बळ द्यावी ह्याप्रमाणें
देवाने आपल्या पुत्राला नेमलें आणि त्यास अगदीं सोडू
न दिल्हें त्यांत "पवित्रत्वाचें मोठें मर्म आहे" देवाचा न्याय
आणि पवित्रपणा त्याच्या शास्त्राचें माहात्म्य आणि तो
नीतीचा रक्षिता असें तेज हीं पूर्ण आणि अभंग आहेत
ह्मणून क्षमा करण्याच्या पूर्वी देवाच्या गुणांस बाध येऊं
नये आणि जगांत उत्तम बंदोबस्त राहावा ह्मणजे पापा-
चा द्वेष व्हावा आणि पापाला आणि त्याच्या अत्यंत भयं-
कर परिणामास भ्यावें यासाठीं देवाने त्याप्रकारचा ब-
ळी मागितला. कोणीहि निर्मित जन मनुष्याचा मध्यस्थ-
पणा करूं सकत नाहीं कारण कीं कोणत्याहि उत्पन्न के-
लेल्या प्राण्याने कितीहि सत्कर्में केलीं तथापि त्याच्या
उत्पन्न

उत्पन्न करणारासाठीं तीं सर्व त्याला अवश्य केलीं पाहिजेत तीं
त्याच्या स्वतांच्या रक्षणापेक्षां अधिक नाहींत. आपल्या उ-
द्धारासाठीं इतका फार उत्तम बळी देवाने मागितला असें जे-
व्हां मनुष्यास कळतें तेव्हां त्यांस समजतें कीं पाप फार फा-
र वाईट आहे. आपला पुत्र अपराध्यांकरितां जेव्हां उभा रा-
हिला तेव्हां त्यापासून जितका दंड घेणें तितका संपूर्ण घेतला
तेणेंकरून पापाचा दंड देव खचित करील असा त्याचा नि-
श्चय मनुष्यांस दिसून येतो. देवाने धर्मपुस्तकांत उद्धार हो-
ण्याविषयीं जो उपाय लिहिला आहे तोच केवळ आहे आ-
णि त्याविषयीं जर उदासीनपणा केला तर मग अणखी कां-
हीं आशाच नाहीं असें त्यास दिसतें. ह्याप्रमाणें ईश्वर न्या-
यसंपन्न आहे तसाच पाप्यांचा रक्षिणारा आहे आणि त्या-
ची सत्ता आणि शास्त्र भंग केलें असतां शासन होईल अ-
सें ह्मटलेलें आहे त्यापासून मनुष्यें पार पडलीं तथापि त्या-
च्या सत्तेचें आणि शास्त्राचें रक्षण होतें आणि तीं सन्मा-
नीय होतात असें त्यांच्या लक्षांत येतें.

ख्रीस्तीधर्म असा आहे कीं मनुष्याचें कल्याण कराया-
जोगा आहे. आपण नेमलेला तारणारा देव त्यांस देतो आ-
णि सर्व जे त्याच्या नामाने धर्म आचरतात आणि त्याच्या
अपार पुण्यावर विश्वास ठेवितात त्यांची सर्व पापें अग-
दीं

दीं तो क्षमा करायास तो सिद्ध आहे. ज्यांस नरक आणि अ-
क्षय दंड योग्य आहे ते त्यांतून सुटायासाठीं जर ख्रीस्ता-
च्या कृपेचा आधार धरितात तर तो त्यांस पार पाडतो. दे-
व त्यांस पुण्यवान समजतो तो त्याजवर कृपा करितो आ-
णि त्यांस आपल्या कुटुंबांत घेतो तो त्यांस आत्ममय उप-
भोग देतो तो त्यांचे आत्मे पवित्र करितो आणि त्यांस आ-
काशांत राहायास योग्य असें करितो. आणि तो त्यांस ते-
जोमय स्थानीं अनिर्वाच्य आणि अनंत सुख देतो. ज्या
सद्भावेंकरून देवाने उद्धार होण्याविषयीं जो उपाय नेम-
ला आहे तो सरळ रीतीने अंतःकरणापासून मान्य क-
रितां येतो आणि नम्रता धरून ख्रीस्तावर विश्वास ठे-
वितां येतो आणि जेणेंकरून पवित्र पश्चात्ताप होतो आ-
णि तत्परतेने पवित्र राहण्यास यत्न करितो असा स-
द्भाव उत्पन्न होण्यासाठीं जे देवाची प्रार्थना करितात त्यां-
स तो आपला पवित्र आत्मा देण्यास सिद्ध आहे. हा आ-
काशांतील शिक्षक आणि मार्ग दाखविणारा त्यांचीं अं-
तःकरणें पालटवितो त्यांचीं मनें प्रकाशमान आणि
पुनर्नव करितो ख्रीस्तासारिखें त्यानी सदाचरण क-
रावें असें दाखवितो आणि ते आकाशांत जायाला यो-
ग्य असें त्यांस करितो. त्याच्या सामर्थ्याने ख्रीस्ताव-

र

र विश्वास धरणारे ईश्वरांत आनंद आणि सुख पावतात. दे-
वाने त्याजसाठीं आपला एकुलता प्रियपुत्र दिल्हा त्यावरू-
न देवाच्या अभंग वचनाचा ते विश्वास धरितात कीं ख्री-
स्ताबराबर त्यांस इहलोकीं आणि परलोकीं जें जें सुख पा-
हिजे तें ईश्वर त्यांस संपूर्ण देईल. ते ह्मणतात कीं "जे देवा-
"चे निवडलेले त्यांजवर कोण अपराध ठेवील? जो पुण्यवान
"ठरवितो तो देव आहे जो अन्यायी ठरवितो तो कोण? जो
"मेला आणि पुनः उठलाहि तो ख्रीस्त आहे आणि तो देवा-
"च्या उजव्याकडे आहे तो आह्माकरितां विनंतीहि करितो.
"ख्रीस्ताच्या प्रीतीपासून आह्मास कोण सोडवील? संक-
"ट अथवा संकोचन अथवा पाठलाग अथवा दुकाळ अथ-
"वा नागवेपण अथवा भयगती अथवा तरवार हीं सोडवि-
"तील कीं काय? ज्याने आह्मावर प्रीति केली त्याकडून
"ह्यां सर्वांमध्यें आह्मी जिंकणाऱ्यांपेक्षां अधिक आहों कां
"कीं तर म्या विश्वासविलों आहें कीं मरण किंवा जगणें
"किंवा जे दूत ते किंवा अधिकारपणें किंवा सामर्थ्यें किंवा
"सांप्रत ज्या गोष्टी अथवा व्हायाच्या ज्या गोष्टी किंवा उंच-
"पण किंवा खोलपण किंवा कोणीहि दुसरा उत्पन्न केलेला
"पदार्थ आह्मास देवाची प्रीति जी ख्रीस्त येशू आमचा प्र-
"भु याजकडून आहे तिजपासून सोडवूं शकणार नाहीं."

आह्मी

आह्मी आतां संक्षेपें करून उद्धार होण्याचा उपाय सांगितला तो ज्या धर्मांत आहे तो ईश्वरनिर्मित आहे. त्या उपायाची योजना मनुष्याच्या शक्तीपलीकडे आहे. जर त्या उपायाचा अव्हेर केला तर संचीत पाप्यास उद्धार होण्यासाठीं उपाय मिळणार नाहीं. त्यास योग्य आहे कीं त्यानें या उपायाचा गंभीरपणानें आणि भय धरून विचार करावा.

उपासनेचा पर्याय आणि उद्धार होण्याचा उपाय यांविषयीं नारायणरावाची जी पद्धती तिचा विचार म्या आतां त्याचा शोध केला आहे. माझ्या विचारावरून त्यास समजेल कीं हिंदू धर्मांत आणि ख्रीस्ती धर्मांत उपासनेचे आणि उद्धार होण्याचे जे उपाय लिहिले आहेत त्यांत फार मोठा भेद आहे इतकेंच नाहीं परंतु हिंदूधर्मांत जे उपासनेचे पर्याय आणि उद्धार होण्याचे उपाय सांगितले आहेत त्यांचा यथास्थितविचार केला असतां ते खोटे आहेत असें ठरेल परंतु ख्रीस्ती धर्मांतील उपासनेचे पर्याय आणि उद्धार होण्याचा उपाय यांविषयीं जितका जितका विचार करावा तितके तितके ते अधिक सतेज दिसतात. मी इच्छितों कीं त्यांविषयीं नारायणराव जे जे शोध करील ते सर्व त्याच्या आत्म्याच्या हितार्थ होतील. तो जर यथास्थित विचार करील तर हिंदू धर्म पवित्र आणि ज्ञानप्रकाश आहे

हे

हे असें तो मानणार नाहीं. त्याच्या लक्षांत येईल कीं तो धर्म ईश्वरविरोधक आहे. तो त्याचा त्याग करील आणि देवानें येशू ख्रीस्त आपला पुत्र त्याच्या द्वारानें दया प्रगट केली आहे तिला तो शरण जाईल.

तिसऱ्यानें नारायणरावानें ख्रीस्ती शास्त्रावर जे दोष ठेविले आहेत त्यांचा विचार आतां मी करितो.

त्यांस असें वाटतें कीं ते दोष प्रखर आहेत आणि त्यांचें निवारण झालें असतां हिंदू शास्त्रांवर जे दोष येतात त्यांचेंहि निवारण होईल. त्याविषयीं जी कल्पना तो करितो ती अगदीं खोटी आहे. ख्रीस्ती शास्त्रावर जे आरोप आणिले आहेत त्यांचा विचार केल्यानें ते निष्कारण आहेत इतकेंच दिसणार नाहीं परंतु हिंदूशास्त्रावर जे दोष येतात ते अधिक स्पष्ट दिसतील आणि ते यथान्याय आणि यथायोग्य आहेत असेंहि सिद्ध होईल.

नारायणरावानें ख्रीस्ती धर्मपुस्तकांत मोशेचीं पुस्तकें प्रथम आहेत त्यापासून आरंभ केला आहे.

त्यांजवर त्याचें पहिलें दूषण असें आहे कीं "जुने बैबल "करारांत प्रारंभींच लिहिलें आहे कीं ईश्वरानें आकाश पृ-

थ्वी

"थ्वी आदिकरून सृष्टि साहा दिवसपर्यंत केली रविवारीं स-
"माप्त करून विसावा घेतला असें लिहिलें आहे. त्यास अनंत
"ब्रह्मांडें एके समयींच अर्थात् झालीं नाहींत पुढें मागें झा-
"लीं तेव्हां अनंत ब्रह्मांडांस अनंत वेळा विसावा घेतला अ-
"सेल. यावरून ईश्वरास आळस सिद्ध होतो. सृष्टी करून
"दमला असें होतें तेव्हां अर्थात् त्याचा अनंत शक्तीस व
"सर्वज्ञतेस बाध आला." ईश्वरनिर्मित ग्रंथावर असें निष्फ-
ळ दूषण कोणी आणलें नाहीं. आणि हिंदूलोकांसहि तें दूष-
ण असल्यायासें निष्फल वाटेल.

आपल्या सभोंवती जी सृष्टी तिजमध्यें आपण ईश्व-
राचीं कृत्यें पाहतो आणि जरीं तीं एकदांच संपूर्ण नहोतां उ-
त्तरोत्तर सिद्ध होतात तथापि तीं कृत्यें ईश्वर करितो हें सर्व-
दां आपणास मान्य आहे. आपण मान्य करितों कीं देवाच्या
सत्तेने वृक्ष फलतात आणि मनुष्यें वाढतात परंतु ज्याक्ष-
णीं देव त्यास प्रथम करूं लागतो त्या क्षणीं तीं एकदांच
मोठीं होतात असें आपण पाहत नाहीं. जगांत जीं जीं कृत्यें
आपणास माहीत आहेत त्याची उत्तरोत्तर वृद्धि होती त्या-
चें कारण ईश्वराची इच्छा असें आपण नेहेमी ह्मणतों. त्यां-
त ईश्वराच्या अपार ज्ञानाचे प्रत्यय दिसून येतात. आपलें
गौरव प्रगट व्हावें ह्मणून ईश्वर कर्म करितो आणि आ-

काश

काशवासी जे बुद्धिमान लोक त्यांस योग्य वाटावें आणि आप-
ल्या कृत्यांचा चमत्कार दिसावा आणि त्याविषयीं विचार के-
ला जावा अशाप्रकारचीं कृत्यें ईश्वर करितो. त्यानें ही पृ-
थ्वी करण्याचा अगोदर महान देवदूत निर्माण केले. ते ति-
च्या उत्पत्तीचें अवलोकन करीत होते आणि ती संपूर्ण सि-
द्ध झाली तेव्हां ते ईश्वराची स्तुति करिते झाले. देवाने विशे-
ष मनुष्याकरितां पृथ्वी निर्माण केली. ती करीत असतां त्या-
ची शक्ती प्रगट झाली आहे तिचा विचार केल्याने आपणा-
स जसा चमत्कार वाटतो तसा देवाने एकानिमिषांत आप-
लें कार्य साधलें असें आपणास समजल्याने वाटत नाहीं.
देवाला शक्ति नव्हती ह्मणून त्याला सृष्टि निर्माण कराया-
स साहा दिवस लागले असें आपणास क्षणभरहि वाट-
त नाहीं. आह्मी मोशेच्या इतिहासांतच देवाच्या परात्पर-
तेचें चमत्कारीक वर्णन पाहतों देवाने ह्मटलें कीं "उजेड
"होवो आणि उजेड झाला" आणि सर्वदां देवाने आज्ञा
करितांच सर्व वस्तु सिद्ध झाल्या असें आह्मी पाहतों. ईश्व-
राने सातव्या दिवसीं "विसावा घेतला" असें जेव्हां आह्मी
वाचतों तेव्हा आह्मी असें मात्र समजतों कीं देव कृत्यें कर्ता
उगा राहिला त्यास्थितीस आंह्मी विसावा ह्मणतों कां कीं दे-
व कामांत उद्युक्त होता. नारायणरावाने विसावा असें ह्म-

टलें

टलें आहे त्याचा अर्थ मुळच्या अर्थासीं मिळत नाहीं. येथें येहुदी शब्दाचा अर्थ असा होता कीं कामापासून स्वस्थ राहिला ह्मणजे काम पुरें होऊन जी स्थिति होती ती कर्त्यास श्रम झाले असा कांहीं अर्थ नाहीं. निःसंशय देवाने आपलें समर्थ काम संपूर्ण झालें असें पाहून फार बरें ह्मटलें तें योग्यच आहे त्यांत देवाला आनंद झाला असें प्रगट करणें योग्य होतें. तो थकला असें समजायास पहिल्या पुस्तकांत कांहींच आधार नाहीं. पुराणांतरीं तर देवाने सृष्टी निर्माण केली त्याविषयीं देवाच्या शक्तीची फार निंदा केली आहे. त्यांत असें निवेदन केलें आहे कीं ब्रह्मा सृष्टी निर्माण करी त्यासमयीं अत्यंत क्लेशांत पडला आणि फारच श्रमी झाला. त्याविषयीं पुढील वर्णन केलेलें आहे त्यास कांहींच करण्याचे पूर्वी तपादि कर्में करावीं लागलीं. वेद नव्हेत ह्मणून त्यास काहीं सुचेनासें झालें. लैंग इत्यादिक पुराणांत असें ह्मटलें आहे कीं सृष्टी निर्माण करण्याचें कार्य चालवायास शक्ती नाहीं ह्मणून रुदन करिता झाला. आणि शिव जो तो रुद्र रूपें करून त्यांच्या जाघांपासून उत्पन्न झाला. त्यानेहि त्या कार्याकरितां यत्न करून पाहिला परंतु निष्फल झाला ह्मणून त्याने आपल्या बापाकडून बलात्काराने तें काम पुनः करायास घेविलें. ब्रह्म्याने स्वकन्येसीं भोग केला यासाठींहि त्याची शक्ति

क्तिहरण झाली त्याने आपल्या दाहा पुत्रांस आपआपल्या सामर्थ्यानुरूप चालवायास सांगितलें आणि आपण देवांचीं शंभर वर्षें पर्यंत लज्जास्पद रीतीने रतला होता. मी ह्या देशांतील सर्व हिंदूसीं प्रतिज्ञा करितों कीं त्या वर्णनाचे आणि कल्पाच्या अंतीं ईश्वर आकुंचित आणि विस्तृत होतो यांचें त्यानी समर्पक उत्तर द्यावें.

२. मोशेच्या पुस्तकांवर दुसरें दूषण आणलें आहे. तें असें कीं "ईश्वराने आदाम नामें प्रथम मनुष्य केला. तो "आपले स्वरूपा प्रमाणें मातीचा पुतळा करून त्यांत आप"ण फुंकून जीव आणिला. यांत ईश्वराचाहि आकार मनु"ष्या सारिखां झाला. यामुळें ईश्वराच्या अगोचर स्वरू"पास बाध आला."

वर जो विचार केलेला आहे तो खोटा आहे. "स्वरूप" मनांतील अथवा देहांतील असावें. ईश्वराच्या ज्या स्वरूपाप्रमाणें आदामास निर्माण केलें मनांतील आहे. आह्मी पाउलसाच्या पत्रावरून असें समजतों कीं तो स्वरूप ज्ञानाचें न्यायाचें आणि खऱ्या पवित्रतेचें होतें. त्यावरून असा सिद्धांत व्हावा कीं देवाने पूर्वी मनुष्याला निर्दोष किंवा निष्कलंक नीती आणि उत्तम स्वभाव आणि धर्म यांहीं करून युक्त असें केलें होतें:

३. मोशेच्या पुस्तकांस तिसरें दूषण असें लाविलें आ-
हे कीं "आदामास स्त्री असावी ह्मणून ईश्वराने मांगून विचा-
"र करून त्या आदामाचें बरकडीचें हाड त्यास मोठी झोंप ला-
"वून तोडून घेऊन त्यास बायको करून दिली. यामुळें ईश्व-
"राचे सर्वज्ञत्वास बाध आला कारण आदामाचा पुतळा वि-
"नवला तेव्हां त्यास बायको करून द्यावी असें अगोदर सु-
"चून त्याच माती पैकीं अंश राखून बायको करून द्याव-
"याची होती. असें नसुचतां एकदां पुतळा पुरा निर्माण झा-
"ला त्याचें हाड मोडतो. व त्या आदामास फसवून चोरून
"तें हाड घेतो. पुसून तरी सावपणाने घ्यावयाचें होतें. या-
"वरून केलेल्या करणीस बट्टा आला.

हा विचार पूर्वीच्या विचाराप्रमाणें आहे. ईश्वराने आ-
दामास उत्पन्न केल्यानंतर हवेस उत्पन्न केलें त्यास निः-
संशय उत्तम कारणें होतीं. त्याविषयीं विचार केला अस-
तां आपणहि कितीएक कारणें कळायास अवघड नाहीं
ही कल्पना योग्यच आहे कीं मला कोणीएक साह्य कर-
णारी असावी असें अनुमान आदामाने करावें हें योग्य हो-
तें. देवाने आदामास जेव्हां गाढ निद्रा लाविली तेव्हां त्या-
ने त्याला फसविलें असें नाहीं. त्याने त्याला अशा स्थितींत
मात्र घातलें कीं निजमध्यें असतां त्यांचें एक हाड काढून
घेतां

घेतां त्यास अगदीं दुःख होऊं नये. ईश्वर आपल्या आणि प-
वित्र स्वच्छेप्रमाणें करायास अधिकारी आहे असें समजून-
च आदाम आपल्या सर्व वस्तूंचा उपभोग करीत होता. देवाने
त्यांचें हाड चोरिलें असें नाहीं परंतु देवाने त्याच्या हाडाची
असी स्थिती केली कीं त्याला पूर्वीच्या स्थितीपेक्षां अधिक
लाभदायक व्हावी. देवाने त्याला एक स्त्री दिल्ही. ती त्याच्या
हाडांतील हाड आणि मांसांतील मांस होती ह्मणून त्याने
तिची प्रीति करावी आणि ममता धरावी असें देवाने त्या-
ला उपदेशिलें. ह्या सर्व कामांत देवाने अज्ञान व अन्याय
दाखविला असें नाहीं परंतु परम ज्ञान व चांगुलपण प्र-
गट केलें होतें. आह्मास असें अनुमान होतें कीं देव कदा-
चित् तें कार्य करण्याच्या अगोदर आदामास तें विदित
केलें असेल आणि त्या उपकारासाठीं आदामाने देवाची
स्तुति आणि भजन केलें असेल.

हिंदू लोकांच्या पुराणांतरीं देवाने सृष्टी निर्माण के-
ली त्यासंबंधी त्याची निंदा केली आहे त्यांचें पुनःमी ए-
क उदाहरण सांगतों. ब्रह्मदेवाविषयीं म्या पूर्वी कळिव-
लेलें आहे. त्याने दाहा मनुष्यांची दैवी सृष्टी जेव्हां नि-
र्माण केली तेव्हां त्याजपासून प्रजोत्पत्ति होत नाहीं अ-
सें पाहून त्यास फार क्लेश झाले असें मत्स्यपुराणांत
ह्मटलेलें

मटलेलें आहे. तेव्हां तो फार क्रोध आणि निराशा यांहीं करू
र युक्त होत्साता आपलीं दोन खंडें केलीं. त्यांतून एक खं-
ाची एक स्त्री करून तिला शतरूपा असें नाम ठेविलें. आ-
णि त्याप्रमाणेंच मनुष्यें आणि पशू आदिकरून जीव उ-
त्पन्न केले! नारायणरावास ह्या गोष्टी सारखी किंवा तसीच
णखी कांहीं गोष्ट मोशेच्या पुस्तकांत जर सांपडती मग
ाने त्यां पुस्तकांस दूषण लाविलें असतें तर ठीकच होतें.
रभट दांडेकराला ह्याजें उत्तर दिल्हेलें आहे त्यांत ईश्व-
ी सृष्टी करित्यावेळेस आणि अवतार धरिले त्यांत
ाकें केलीं असें हिंदूच्या शास्त्रांत वर्णिलें आहे त्याचा
ा विचार केला आहे त्याविषयीं नारायणराव काय उ-
र देतो तें, तो आह्मास कळवील कीं काय? माझे त्यावि-
ावरील विचार जर तो पुनः वाचील तर त्यास कळेल
कीं त्याच्या दूषणेंकरून हिंदूशास्त्रावरील ते दोष टळत ना-
हींत. त्या विचारावरून असें स्पष्ट होतें कीं इश्वराचे पवि-
त्रभावाला बाध यावा असी आणि हिंदूलोकहि मान्य
करितात कीं मानवी अवतार धरून फारच चांगली वर्त्त-
करून दाखवावी तशा वर्त्तणुकीसहि बाध यावा अ-
सी हिंदूशास्त्रांत ईश्वराची वर्त्तणूक वर्णिली आहे.

४. मोशेच्या पुस्तकावर जें चवथें दूषण आलें आ
हे

हे तें, असें कीं "ईश्वरी आज्ञा मोडावयाजोगा कोणी समर्थ
"नाहीं, असें असतां आदाम पुण्य पाप ज्ञानाचे झाडांची फ-
"ळें खाऊं नको, खाल्यास मरशील असी ईश्वर आज्ञा देऊन
"गेला, ती आज्ञा भंग करावयाजोगा एक सर्प येऊन त्या आ-
"दाम व हवेस तीं फळें खाल्यास तुह्मी मरणार नाहीं, असें ह्म-
"णाला, त्यांत ईश्वराचे अनंत शक्तीला व सर्वज्ञत्वाला बाध
"आला. हें ईश्वराला अगोदर सुचून पुढला बेत ठेविला अ-
"सतां तरी ईश्वर ह्मणण्यास शोभा येती व हा सर्प ईश्वरा-
"चा प्रतिस्पर्धी सिद्ध होतो किंवा ईश्वराचे वचनापेक्षां त्याचे
"वचनांत खरेपणा येऊन ईश्वराचे शापाने कांहीं एक हो-
"त नाहीं हेंही ठरतें." मागील विचारांत कितीएक अंगचींच
आणि निरर्थक भाषणें आहेत. ईश्वराचा नियम ह्मणजे
संकेत त्याचा भंग होत नाहीं परंतु देवाच्यां आज्ञेचा भंग
होतो आणि पापी लोक तर याचा नित्य भंग करितात सैता-
न जो आपल्या पवित्र पूर्व स्थितीपासून च्युत झाला तो य-
द्यपीं जरीं पवित्रतेची स्पर्धा करितो तथापि त्याजवर ई-
श्वराचा धनीपणा आहे त्याने खचीत लबाडी सांगून आ-
मच्या प्रथम पूर्वजांस ठकिवलें. त्यानी त्याचें ऐकिलें. आ-
णि त्याच्या सुचिवल्याप्रमाणें केलें ह्मणून त्यानी फार मो-
ठें पाप केलें. त्यानी पाप करितांच ईश्वराच्या ह्मणण्याप्र
माणें

माणें त्यांस उपद्रव झाला. त्यानीं निषिद्ध फळ खाल्यावर त्याचक्षणीं मरणास पात्र झाले. ते आत्म्यासंबंधी मरण तर खचीत पावले आह्मास माहित आहे कीं त्यांचे आत्मे देवाच्या स्वरूपासारिखे पवित्र केलेले होते ते कुत्सित झाले आणि ते तर नरकास योग्य झाले. हें मरण तर त्याच्या शरीरांपासून नुसता आत्मा वेगळा झाला त्यापेक्षां अतिशय भयास्पद आहे.

५. मोशेच्या पुस्तकांवर पांचवें दूषण असें आणलें आहे कीं त्याप्रमाणें "ईश्वर आमच्या पहिल्या आ
"ईबापां बरोबर बोलला एदेन नामें बागांत चालला आ-
"णि त्यांच्या आणि नोहाच्या दृष्टीस पडला. त्यावरून
"त्याच्या सर्व व्यापकतेला आणि आत्मरूपाला बाध
"येतो आणि तो साकार सावधीक आणि नाशवंत आ-
"हे असें ठरतें."

हें दूषणहि निष्कारण आहे. जरीं ईश्वर सर्वव्यापक आत्मा आहे आणि जरीं त्यास स्वाभावीक रूप नाहीं तथापि त्याच्या पवित्र कार्यास योग्य असल्यास तो शारीरक आणि मूर्तिमंत किंवा अणखी कोणतें रूप धारण करूं सकतो आणि आपला नाश झाल्यावांचून तें रूप सोडायास समर्थ आहे. त्याने अमुक ठिकाणीं प्रगट

झाल्याने

Oriental MSS. Library, P.O., Madras

झाल्याने त्याच्या सर्वव्यापकतेला बाध येतो असें नाहीं. नारायणरावांने हें दूषण लिहित्यावेळेस कदाचित असी आशा धरिली असेल कीं हिंदू शास्त्रांत देवानी रूपें धारण केलेली आहेत असें ह्मटलें आहे त्याविषयीं आमचीं दूषणें न्यून होतील. असें तो जर समजत असेल तर तो अगदीं चुकून गेला. हिंदूशास्त्रांस आह्मी दूषणें देतों त्याचें कारण असें आहे कीं हिंदू देवानी अवतार धरून मूर्ख आणि पापी कार्यें केलीं अणखीं त्यांस ते ते अवतार धरणें भाग झाले आणि त्यांस त्या रूपांतच राहावें लागलें असें त्याच्या शास्त्रांत निवेदन केलें आहे. ब्रह्म्याने रूप धरल्यावांचून त्याच्याने खचीत काहींच करवत नाहीं. ब्रह्मा विष्णु आणि शिव ह्यांस स्वाभावीक स्थानें आहेत आणि वेगवेगळीं निवास करायाचीं स्थलें आहेत. कधीं असें निवेदिलें आहे कीं जीं स्थानें ते आटोपायास इच्छित होते तेथून त्यांस हाकून काढिले आहेत. स्कंद पुराणांत शिवाविषयीं असें ह्मटलेलें आहे कीं दिवोदासाच्या भक्तीकरून शिवाला काशी सोडून जाणें भाग झालें तेव्हां त्याने मरणापर्यंत आक्रंद केला. आणि विष्णु तर क्षीरसमुद्रांतच अडकून राहिला आणि दिवोदासाचें पुण्य सरें तों पर्यंत तेथून हालूं सकला नाहीं.

६ मोशेच्या

६. मोशेच्या पुस्तकांवर साहावें दूषण असें आणलें आहे कीं "ईश्वराने आदामास व हव्वेला फळें खाऊं नयेत "ह्मणून सांगितलें व सर्प येऊन तुह्मास फसवील तुह्मी सा-"वध असावें हें नसुचवितां पुनः आपण तियांस शाप दे-"तो यांत ईश्वर अन्यायी व रिकामा खटला निर्माण करणा-"रा सिद्ध होतो."

त्याचें उत्तर ज्या कारणास्तव मनुष्याची उत्पत्ती आणि महान् स्थिती केली तें निःसंशय असें होतें कीं ईश्वराचें ऐश्वर्य प्रगट व्हावें. देवाचे उत्तम गूण प्रगट व्हावे देवास आपल्या कृत्यापासून समाधान आणि आनंद व्हावा आणि प्राणिमात्रांस सूख मिळावें ह्या कारणास्तव मात्र देव सर्व व्यवहार करितो असेंच समजलें पाहिजे. त्या हेतूसाठीं देवाच्या अंतर्क्य ज्ञानाप्रमाणें याच्या परात्पर इच्छेस असें वाटलें कीं मनुष्याला मात्र नीतिसंबधीं स्थितींत घालावें त्याला त्यांप्रमाणें करायास संपूर्ण अधिकार होता आणि त्याने आपलीं कार्यें साधायास जो जो बंदोबस्त केलेला आहे तो फार चांगला आणि स्तुतियोग्य आहे असें आह्मास कळून येतें. त्याने आमच्या प्रथम पूर्वज्यांस जो स्वभाव दिल्हा होता तो यत्किंचित् बदलला नाहीं. त्या स्वभावास जे जे सुखाचे उपभोग त्याने नेमिले ते परत घेतले नाहीं

त.

त. आणि त्या स्वभावास त्रास होई अशा आज्ञा त्याने दिल्ह्या नाहींत. त्याने आमच्या प्रथम पूर्वजांस जें जें आवडे तें तें दिल्हेलें होतें. त्याने त्यांस बागाच्या मध्यें एक झाड होतें त्याचें फळ खाण्यास मात्र निषेधिलें होतें त्याने त्याची स्वतंत्र इच्छा आणि स्वतंत्र स्थिती मोडली नाहीं. त्यानी अवमान्यता नकरावी ह्मणून त्याने त्यांस पूर्वींच असें ह्मटलें कीं ज्या दिवसीं तुह्मी तें निषिद्ध फळ खाल तेव्हांच तुह्मी खचीत मराल. ह्या सर्व व्यवहारांत आह्मास देवाचें ज्ञान आणि चांगुलपण दिसून येतें. हे गूण आदामाच्या संकट समयींहि प्रगट झाले आहेत असें आह्मास दिसतें तें संकट त्याच्या स्थितीला समर्पक आणि ईश्वराचा निष्कलंक पवित्रपणा आणि पापाचें भयंकर फळ ह्यांचा प्रत्यय दाखवायाजोगें होतें. आह्मास वाटतें कीं निषधलेली वस्तु जसजसी क्षुल्लक तसतसी आदामाने अधिक मान्यता दाखवावी आणि त्यांत नीती तर इतकी दिसून येती कीं देवाच्या आज्ञा किंचित भंग केल्या असतांहि शासन झाल्यावांचून राहणार नाहीं. नारायणरावाने ह्या सर्व गोष्टी विसरल्या. आदामाने आज्ञा उलंघन करूनये ह्मणून देवाने त्याला पूर्वींच सुचविलें होतें. हें नारायणरावाने एकदां मान्य केलें असतांहि तो विसरला आहे. बळीहि-

वीदास

वोरास द्रोण इत्यादिकांच्या कथेंत हिंदूंच्या देवानी जीं अ-
नेक कापट्यें केलीं आहेत त्याचें उत्तर त्याच्याने देववणा-
र नाहीं.

७. मोशेच्या पुस्तकांस सातवें दूषण असें लाविलें
आहे कीं "यापुढें आदामाचा पुत्र हाबेल हा धनगर व का-
"इन हा कुणबी यां उभयत्तानीं आपलें खिल्लार व शेतांती-
"ल पहिलें उत्पन्न यांचा ईश्वरास नैवेद्य दाखविला अस-
"तां ईश्वर हाबेलावर मात्र लोभ करितो काइन यावर त्या-
"ने तितका लोभ केला नाहीं यांत पक्षपात दिसतो."

नारायणरावाने काइन आणि हाबेल यांच्याविषयीं
नीट सिद्धांत केला नाहीं. इब्री लोकांस जें पत्र लिहिलेलें
आहे त्यांतून आह्मास असें कळलें आहे कीं हाबेलाने स-
द्भावाने आणि नम्र आत्म्याने आपली वस्तु देवाला अ-
र्पण केली ह्मणून देवाने त्याचा सन्मान केला. देवाने त्याला
जर काइनासारिखेंच मानिलें असतें तर देवाच्या पवि-
त्रतेस बाध आला असतां. मोशेच्या पुस्तकांचे आणि ख-
ऱ्या धर्मपुस्तकांतील अणखीहि पुस्तकांचें विशेष भूषण
तेंच आहे कीं त्यांत इश्वर अंतःकरणाचा शोधक असें
निवेदिलें आहे. आणि देवाच्या आज्ञेप्रमाणें आणि वि-
श्वासाने आणि देव सर्व भक्तांपासून जसा सद्भाव इच्छि-
तो

तो तशा विश्वासाने ज्या वस्तु देवाला अर्पण होत नाहींत
त्याहीं करून तो संतुष्ट होत नाहीं. देवाने हाबेलाला योग्य
याहून अधिक मान दिल्हा असें नाहीं. जेव्हां "काइन दुः
"खीत झाला आणि त्याचा चेहरा उतरला. तेव्हां देवा-
"ने काइनाला ह्मटलें तूं कशासाठीं दुःखीत झाला आहे-
"स? आणि तुझा चेहरा कां उतरला आहे? जर तूं चां-
"गलें करितोस तर तूं मान्य केला जाणार नाहींस? आ-
"णि जर तूं चांगलें करीत नाहींस तर पाप दारासीं आ-
"हे. आणि तुला भावाची इच्छा होईल आणि तूं त्याजव-
"र सत्ता करसील."

हिंदूशास्त्राप्रमाणें असें आहे कीं मनुष्यांस भाव आ-
णि सद्विचार नसतांहि त्यानी देवाला कांहीं अर्पिलें असतां
तेणेंकरून देवाच्या आशीर्वाद मिळतो: त्याप्रमाणें नाराय-
णरावाला ख्रीस्ती धर्मपुस्तकांत कांहींच विचार मिळणा-
र नाहीं. यास उदाहरण शिवरात्री कथेंतील. कैवर्तक झाडा-
वर बसून पक्षी मारायाकरितां अवलोकन करीत असतां
त्या झाडाखालीं एक लिंग होतें त्याजवर नकळतां झाड
हालण्याने पाने पडलीं तेणेंकरून त्यांचा उद्धार झाला अ-
सें त्यास ख्रीस्ती शास्त्रांत सापडणार नाहीं.

८. मोशेच्या पुस्तकांवर आठवें दूषण आलें आहे
तें

तें नोहाच्या पापासंबंधीं आहे.

नारायणराव ह्मणतो तें खरें आहे कीं नोह्याने जितकें
पाप केलें तितकी देवाच्या चांगुलपणाची त्याने निंदा केली
आणि ती दोषास योग्य आहे. असो परंतु ख्रीस्ती शास्त्रां-
त नोहाचें पाप अन्यायी ठरविलें आहे. त्या शास्त्रांत तें पाप
लिहिलें आहे ह्मणून त्यांवर दोष ठेऊंनये त्यांच्या प्रमाणी-
कपणाचें उलटें गौरव मानावें. त्याचें कार्य असें आहे कीं दे-
वाचें गौरव व्हावें आणि मनुष्याला नम्र बुद्धी समजावी फा-
र चांगल्या स्थितींतहि संभाळून असावें आणि पापाच्या
शक्तीपासून आणि श्रापापासून मुक्त व्हावयासाठीं देवा-
च्या कृपेवर विश्वास ठेवावा. त्या शास्त्रांत हिंदूच्या शा-
स्त्राप्रमाणें वाइटास चांगलें आणि चांगल्यास वाईट अ-
सें ह्मटलें नाहीं. अथवा महत्पापांचें प्रतिपादन केलें नाहीं.

नारायणरावाने मोशेची पुस्तकें सोडून नव्या करा-
राचा विचार केला आहे.

१ नव्या करारावर पहिलें दूषण असें आहे कीं "ये-
"शूचा जन्म असा झाला कीं योसेफ जो नीतिमान् होता. त्या-
"ची स्त्री पुरुषाचे समागमाचे अगोदर गर्भिणी झाली ते
"वेळेस योसेफाने ती गोष्ट प्रगट नकरितां इच्छिलें कीं इ-
"जला मुकाट्याने सोडून द्यावें. तो या विचारांत होता तेव्हां

"ईश्वराचा दूत येऊन त्याचे स्वप्नांत बोलला कीं तुझी स्त्री
"मारया इजला तूं आपल्यापासीं ठेवायास भिऊं नको कार-
"ण जो तिच्या पोटांत गर्भ आहे तो ईश्वरापासून आहे अ-
"सें सांगून तो दूत गेला. याजवर दोष हें मोठें विपरीत कीं
"ईश्वराने असे नीतिमान् पुरुषाची बायको हरण केली प-
"रस्त्री हरणासमान दोष नाहीं व ईश्वराने पूर्वींच्या आप-
"ल्या आज्ञेवर बाध आणिला तो असा कीं गतकालीं व व-
"र्तमानकालीं कुमारीस गर्भ धारण होऊं सकत नाहीं. या
"अनुक्रमावरून ईश्वराने आपल्याच आज्ञेस बाध आ-
"णिल्यामुळें लबाड बोलण्याचा गूण ईश्वरास लागतो. अ-
"सु जर ती स्त्री ईश्वराला पाहिजे असेंच असतें तर ख्री-
"स्त धर्माप्रमाणें तिजला योसेफाकडून मुक्तता देऊन नंत-
"र आपला गर्भ ठेवायाचा होता तें नकरितां चोरून हें क-
"र्म केलें ह्मणून ईश्वराने चोरून व्यभिचार केला असें
"होतें. यावरून जार, लबाड, चोर, असे आरोप प्रत्यक्ष
"ईश्वरावर होतात ह्मणून ख्रीस्ती धर्मांत ईश्वराचें गौ-
"रव वर्णितां त्याची निंदा केली आहे व ख्रीस्ती शास्त्र
"त्यास संतापविण्याजोगें आहे असें बुद्धीस येतें."

जो भार एथें मिळतो त्याचा भार दोन चुका यांज-
वर आहे. त्या अशा कीं देवाने माग्येला बायको केली आ-

णि देव सर्वशक्त नाहीं. त्या चुका मात्र नारायणराव याजवर
भासतात. देव पुरुषरूप होऊन त्यापासून माय्येने गर्भ धारि-
ला ती गोष्ट खोटी. हें मात्थीने लिहिलेलें शुभवर्तमानांत दू-
ताच्या भाषणावरून दिसतें. त्याने असें ह्मटलें कीं "तिज-
"मध्यें जें जन्मविलें तें पवित्र आत्म्यापासून आहे." त्याप्र-
माणेहि लूकाचें वर्णन आहे कीं "गालीलांतील नगर ज्या-
चें नाम नाजोरेथ तेथें गाब्रीयेल दूत देवाकडून कुंवारी-
"च्या जवळ पाठविला होता ती दावीदाच्या घराण्यांतील
"पुरुष ज्याचें नाम योसेफ याला मागणीने दिल्ही होती
"आणि कुंवारीचें नाम मारया होतें तेव्हां दूत तिच्याजव-
"ळ आंत जाऊन बोलला कृपा पावलेल्ये सुखी ऐस प्रभु
"तुजसहीत आहे स्त्रियांमध्यें तूं धन्य ह्मटलेली आहेस
"तेव्हां ती पाहतां त्याच्या गोष्टीवरून फार घाबरली आ-
"णि तिने विचार केला कीं ही क्षेम गोष्ट कशाची असेल?
"तेव्हां दूताने तिला ह्मटलें हे मारये भिऊं नको कांकीं दे-
"वाजवळ तुला कृपा मिळाली आहे आणि पाहा तूं पोटीं
"गर्भ धरिसील. पुत्रालाहि प्रसवसील आणि त्याचें ना-
"म येशू ठेविसील तो महान होईल आणि परात्परा-
"चा पुत्र ह्मटला जाईल आणि प्रभु जो देव तो त्याला त्या-
"चा पितर जो दावीद त्याचें राजासन देईल मग तो

"याकोबाच्या घराण्यावर सर्वकाळापर्यंत राज्य करील ह्म-
"णजे त्याच्या राज्याचा शेवट होणार नाहीं. तेव्हां मारयेने
"दूताला ह्मटलें मी पुरुषाला जाणत नाहीं मग हें कसें घडे-
"ल? मग दूत उत्तर देऊन तिला बोलिला पवित्र आत्मा तु-
"जवर येईल आणि परात्पराची शक्ती तुजवर सावली करी-
"ल याकरितांहि जें पवित्र तुजकडून जन्म पावेल तें देवा-
"चा पुत्र ह्मटला जाईल." कुवारीने गर्भ धारण केला ती गो-
ष्ट चमत्कारिक आहे परंतु देवाच्या सर्व शक्तीचें अनुमा-
न करून कांहीं अडचण दिसत नाहीं. देवाला कांहीं अशा-
क्य नाहीं. असाधारण रीतीने गर्भ धरावा याचें कारण हो-
तें. लोकाचा तारणारा पापरहित आणि पाप करायाजोगा
नाहीं ह्मणून असाधारण रीतीने आईने गर्भ धरावा परं-
तु पवित्र आत्म्यापासून गर्भ धरावा असें अगत्य होतें. ग-
र्भधारण करण्याच्या अगोधर योसेफाकडून तिची मुक्तता
करावी असें अगत्य नव्हतें. ती विश्वासी असें योसेफाला
ह्मणणें पुरें होतें. तूं दुष्टकर्म कर असें देवाने तिला सांगित-
लें नाहीं आणि दुष्टकर्म देवाने तिजसीं केलें नाहीं. आप-
ल्या सरळ इच्छेप्रमाणें तिच्या पोटांत उत्पन्न करायास त्या-
ला सामर्थ्य होतें. जें त्याचें होतें तें कांहीं वचन. मोडण्या-
वांचून व कोणी एकाचा उपद्रव करण्यावांचून त्याने आप-

त्या कामावर लावलें.

नारायणरावाच्या मतें असें असेल कीं ख्रीस्ती धर्मी-
तील जो वृत्तांत म्या कळविला तो पुराणांतरीं देवाच्या कल्पित
कथा ज्या सांगितल्या आहेत त्यांजवरहि दोष येणार नाहीं-
त. असा जर त्याचा अर्थ असेल तर त्याला तो अगदीं असा-
ध्य आहे. हिंदूच्या देवांच्या पापाविषयीं मला जीं उत्तरें दि-
ल्हीं आहेत त्यांत त्याला असें समजेल कीं देवाच्या पवि-
त्र स्वभावाच्या केवळ विरुद्ध असीं कर्मै हिंदूच्या देवांनी
केलेलीं आहेत ह्मणून म्या तीं दूषणें त्यांजवर आणि-
लीं होतीं माझे अगोधरचे विचार यांत लिहिण्याचें प्रयो-
जन नाहीं असें मला वाटतें. मी इतका मात्र विचार लि-
हितों कीं कृष्णाने स्त्रियांबरोबर जीं कर्मै केलीं तीं केवळ
व्यभिचार संबंधीं होतीं त्यांत त्याने चोरून आणि कृत्रिम
करून नाशकारक बलात्कारें करून व्यभिचार केलेला
होता आणि कृष्णाने ज्यां ज्यां बरोबर समागम केलेला हो-
ता त्याच्या वस्तू त्याने अन्यारीतीने हरण केल्या कीं ती ध-
डधडीत चोरीच होय. त्यास प्रमाणिकपणाची आज्ञा त-
र तुच्छवत वाटत असे ती तर त्याने देवाचा अवतार ह्म-
णवीत असतां मनुष्यांच्या उपदेशार्थ अवश्यमेव रक्षि-
ली पाहिजे होती त्याची सामान्य वर्त्तणूक असी नीच

होती

होती. कीं ज्यास किंचित नीति मान्य असेल तोहि त्याच्या
वर्त्तणुकीविषयीं गंभीर उत्तर देण्यास उभा राहणार ना-
हीं आणि तिची प्रसिद्धी करण्याचा ज्यांचा धर्म आहे त्यां-
च्यांहि मनांत लज्जा वाटल्याविना त्याच्याने प्रसिद्धी
करवत नाहीं.

२ . नव्या कराराच्या पुस्तकांवर जें दुसरें दूषण आणि-
लें आहे ते असें आहे कीं "येशूचा जन्म झाल्यानंतरचा
"भाव पाहतां मजिशी लोकानी पूर्वदिशेस त्याचे नावचें न-
"क्षत्र पाहून हेरोदेस राजा होता त्याजकडे येऊन त्यांस
"तें वर्त्तमान सांगितलें यामुळें त्याला भीति प्राप्त होऊन
"त्याने मजिशी लोकांस कपटाने सांगितलें कीं तुह्मी जा-
"ऊन त्याचा शोध करून पूजा करावी व मजलाहि ख-
"बर दिल्ही ह्मणजे मी येऊन पूजन करीन. वास्तव ते
"मजिशी लोक तेथून निघाले. तेव्हां तें नक्षत्र त्याचे स-
"न्मुख येऊन त्याने त्यांस मार्ग दाखविला जेथें येशू
"होता त्या जाग्यावर तें नक्षत्र उभें राहिलें. नंतर ते
"आंत जाऊन मातोश्रीसह त्या मुलास पाहून त्या-
"ची पूजा करून सुवर्ण रौप्यादिकें करून त्याचा आ-
"दर केला व ते मजिशी लोक निद्रित झाले असतां
"त्यांचे स्वप्नांत ईश्वराचा दूत येऊन त्याने आज्ञा के-

ली

“ली कीं तुह्मी हेरोदेस राजाला खबर नदेतां येथून जावें.
“तसे ते गेले. नंतर येशूच्या पित्यास स्वप्न झालें कीं हे-
“रोदेसाचे भयास्तव या मुलास घेऊन तुह्मी नासऱ्या-
“स जावें व हेरोदेस मृत्यु पावल्यावर मग इकडे प्रग-
“ट व्हावें. योसेफ या स्वप्नांतून जागा होऊन मुलास घे-
“ऊन नासऱ्यास गेला. इकडे हेरोदेसाने मजिशीलोकांची
“वाट पाहून ते आल्यामुळें जो प्रदेश सांगितला होता
“तेथील ग्रहस्थाचीं मुलें दोन वर्षांचे वयाचीं धरून
“आणून जिवीं मारलीं. यांत दोष ईश्वराचा अवता-
“र सर्वांचें कल्याण करायास प्रगट झाला असतां त्याचे सं
“बंधाने कांहीं अनर्थ होऊं नये व त्याजला इतर मानवांप्रमा-
“णें कांहीं कर्म अशक्य असूं नये असें असतां त्याचा ज-
“न्म होतांच याच्या संबंधाने अनेक बाळकें जीं जन्मापासून
“पाप लिप्त नव्हतीं तीं व्यर्थ मारलीं गेलीं. हें शिशुहिंसाक-
“र्म कल्याणप्रद अवतार झाला असतां सर्वथा होऊं नये.
“याचे संबधानें त्या त्या बाळकाचे आईबापांस काय पुत्र-
“शोक व्हावा? हा शोक निर्माण होण्याचें कारण या ये-
“शूचें पलायन होय. हा जर अवतारी पुरुष असता त-
“र यास कोणाचें भय असूं नयें व याच्या अवतार प्रादु-
“र्भावाने सर्वत्रांचीं चित्तें फिरून ईश्वरा सन्मुख व्हावीं.
तें

“तें हि न झालें. यास मारूं नये असी तरी सर्वत्रांची बुद्धि व्हा-
“वी व हेरोदेस राजा जिवंत होता तों पावेतों येशू धर्मस्था-
“पण्याची गोष्ट न काढितां नासऱ्यास पळून जाऊन राहिला.
“तेव्हां अर्थात् येशूपेक्षां हेरोदेस राजा शक्तिमान दिसतो.
“तेव्हां असा अवतारी जो आपण पळून जाऊन बाळकें मा-
“रविणारा व अल्प सामर्थ्यी तो ईश्वराचा पुत्र किंवा ईश्वर
“संबंधी इतर कोणी देखील संभवत नाहीं.”

“ईश्वराचा अवतार सर्वांचें कल्याण करायास प्रग-
“ट झाला असतां त्याचे संबंधाने कांहीं अनर्थ होऊं नये.”
ह्या वचनांविषयीं कांहीं शोध केला पाहिजे. कोणीहि ख्री-
स्ती धर्मानुसारी त्या वचनांतील कारण आणि अनुमान
मान्य करणार नाहीं. सर्व मनुष्यें पापी आहेत ह्मणून सु-
ख भोगायास योग्य नाहींत. ईश्वर आपल्या महत् इच्छे-
प्रमाणें सर्व मनुष्यांस किंवा त्यांतून कांहीं लोकांस सूख
देईल अथवा नदेईल. अनर्थ घडला असतांहि त्यांतून
तो सूख कदाचित देईल कारण कीं तो अंधःकारांत उ-
जेड दाखवायास अशक्ताला शक्ति देण्यास आणि अ-
व्यवस्थेची व्यवस्था करायास समर्थ आहे.

बेथलेहेमांतील बाळें मारलीं गेलीं त्याविषयीं
असें समजावें कीं तो दोष ख्रीस्ताकडून घडला नाहीं तें
पाप

पाप त्याने केलें नाहीं परंतु हेरोदेस राजाने केलें. ख्रीस्ताने त्या दुष्ट बलात्कार करणाऱ्या राजाला ती हिंसा करण्यास आश्रय दिल्हा नाहीं किंवा त्या राजाने मोठीं अपराधी कर्मे केल्या नंतर ख्रीस्ताने त्याचा दोषांचें निवारण केलें. ती हिंसा ख्रीस्ताने टळिवली नाहीं ह्मणून ख्रीस्तावर आरोप आणणें हें फार मूर्खत्व आहे कारण कीं ईश्वराचें ह्या जगाच्या वर्तनासंबंधीं जे नियम आहेत त्याचा जे यथास्थित लक्ष देऊन विचार करितील त्यांस असें दिसून येईल कीं ईश्वर जरीं पापाचा द्वेष करितो आणि पाप्यांस दंड लावितो तथापि तो पाप होऊं देतो. त्या बाळांची हिंसा झाली तरीं ईश्वर निरपराधी आहे कारण प्रस्तुत काळीं जी हिंसा होती तरीं ईश्वर निरपराधी आहे. जीव देवाच्या स्वाधीन आहे आणि त्याच्या महत् इच्छेप्रमाणें तो प्राण अन्य अवस्थेंत घालण्यास समर्थ आहे. त्याने हेरोदेस राजास त्या बाळांचा प्राण घेऊं दिल्हा त्यास निःसंशय उत्तम हेतु होता. जर तीं बाळें वांचलीं असतीं तर त्यांस पाप करण्याची बुद्धि होती आणि त्यांस संकटेंहि भोगावीं लागतीं असें समजून ईश्वराने त्यांस ह्या पापी जगांतून काढून दुसऱ्या जगामध्यें सुखाच्या स्थितींत घालण्यास इच्छिलें असेल त्यांच्या आईबापां

नीं

नी पापें केलीं होतीं आणि ईश्वराच्या दयेविषयीं कृतज्ञ झाले नव्हते ह्मणून देवाने त्यांपासून त्याचीं बाळें घेण्याने दंड लावायास इच्छिलें असेल अणखी तीं बाळें पापांत संभवलीं होतीं पापांतच उपजलीं आणि त्यांचा स्वभावहि पापीच होता. ईश्वराच्या नियमाप्रमाणें एका कारणाने बहुत कार्यें होतात.

“एका मनुष्याविषयीं आह्मांस जें वाईट वाटतें तें
“सर्वांविषयीं चांगलें होत असेल. मनुष्यांची कामें किति-
“हि श्रमाने झालीं तथापि हजारों त्याकानी एकाचा कांचें-
“हि काम होत नाहीं परंतु ईश्वराच्या कामांत तुस्तें एक
“परिवर्त्तन आंपलें कार्य साधून दुसरेंहि कार्य साधतें.”

नारायणरावाने ख्रीस्ताच्या सामर्थ्याविषयीं जें दूषण आणिलें होतें तें निराधार आहे. ख्रीस्ताची नम्रता आणि बाळासारिखी अशक्तता आणि सर्व त्याचीं दुःखें केवळ स्वसंतोषानेच घडलीं होती. त्याला शक्ती नव्हती असें नाहीं परंतु नियमित काल येई तोंपर्यंत त्याने ती प्रगट केली नाहीं. पृथ्वीवरील सर्व राजे अथवा नरकांतील सर्व असुर त्याला मान्य झाल्यावांचून त्याचा जीव घेण्यास असमर्थ होते. कोणी मनुष्याला ईश्वराने कोणत्या उपायाने रक्षावें हें आह्मी ईश्वरास सांगणें नलगे. आपलीं कामें

साधा-

साधायासाठीं तो मनुष्यांस अथवा देवदूतास, अथवा निर्जीव पदार्थांस लावायास समर्थ आहे. तो ख्रीस्ताला येहुदा देशांत वांचवायास समर्थ होता परंतु ख्रीस्ताने मिस्र देशांत जावें असी देवाची इच्छा होती कारण कीं मिस्र देशांतून मी आपल्या पुत्राला बोलाविलें आहे हें भविष्यहि पूर्ण व्हावें तसीच देवाची इच्छा होती कीं भविष्य पूर्ण करायासाठीं ख्रीस्ताने नाजारेथ जाऊन राहावें. देवाच्या पवित्र इच्छेस आमच्याने दूषण लाववत नाहीं. आणि त्याने तें काम देवदूताच्या योगाने आणि योसेफाच्या प्रयासाने साधलें त्याजवर आमच्याने दूषण ठेववत नाहीं.

ह्या विचारानी नारायणरावाचीं दूषणें अगदीं दूर होतात. त्याने ज्या रीतीनें आपलें कार्य साधायास मांडलें होतें त्याहींकरून तें सिद्ध नझालें इतकेंच नाहीं परंतु त्याच्या विचारानी हिंदूशास्त्रावरच फार दोष येतात. यास दोन उदाहरणें देतों.

१. नारायणरावाच्या विचाराप्रमाणें अवताराच्या अंगीं विशेष सामर्थ्य असावें. बरें ही गोष्ट सत्य आहे असें मी ह्मणतों. आणि जरीं मी असें समजतों कीं अवताराने स्वेच्छेप्रमाणें आपलें सामर्थ्य चालवावें अथवा नचालवावें तथापि नारायणरावाचें आणि माझें मत ए-

एकच

कच आहे. कीं अवताराला अनंतशक्ति असावी. असी गोष्ट प्रत्यक्ष असतां नारायणरावाने विचार करावा कीं हिंदूच्या अवतारांचे कसे पराक्रम होते. असें निवेदिलें आहे कीं त्याच्या सर्व अवतारांत जेव्हां ते शक्ति चालवायास इच्छित तेव्हांच ते केवळ निर्बळ होते.

मत्स्य अवतार बुद्धीस विरुद्ध कामाविषयीं झाला. त्याचें कारण असें आहे कीं प्रळयानंतर समुद्राच्या तळीं वेद राहिले होते ते बाहेर काढावे. त्या पुराणांतील कथा असी आहे कीं देवाला पृथ्वी निर्माण करायासाठीं जेव्हां वेदांचें फार अगत्य लागलें तेव्हां ते वेद कोठें आहेत आणि ते पुनः कसे मिळवावे हें त्यास कळेना ह्मणून त्यास मत्स्य अवतार धरणें भाग झाला आणि वेद मिळवायासाठीं त्यास हजारों वर्षें शोध करावा लागला. ह्या गोष्टींत अशक्तपण प्रत्यक्ष आहे. अवतार धरण्याचें कारणहि अशक्तपण आणि सर्व अवतारामध्येंहि अशक्तपणच दाखविलें आहे.

मंदरागिरी घेऊन समुद्रमंथन करत्यासमयीं तो पर्वत रसातळीं जाऊं लागला ह्मणून विष्णूने कूर्म अवतार धरून आपल्या पाठीवर तो पर्वत धरिला पुढें समुद्र मंथन होऊन अमृत निघाल्यावर त्याच वि-

ष्णूला

ष्णूला तें अमृत असुरानी चोरून याविषयीं प्रतिबंध करवला नाहीं. आणि त्याने मोहनीचें रूप धरून त्यांस ठकविल्यांवांचून त्यांपासून तें मिळवायास तो असमर्थ होता.

वराह वामन आणि परशुराम अवतार धरण्याचें प्रयोजन असें आहे कीं हिरण्याक्ष हिरण्यकशिपु आणि बळी तसेच क्षत्रिय यांचा वध करायासाठीं ते अवतार धरिले त्यांत विष्णूचा पराक्रम फार दिसून येत नाही. त्या अवताराचें कारण असें ह्मटलेलें आहे कीं असुरानी सुरांस जिंकून स्वर्गांतून काढून टाकिलें ह्मणून असुरांचा वध करायासाठीं देवाला अवतार धरणें भाग झालें यास्तव ईश्वराच्या सर्व शक्तीस बाध येतो आणि मुख्यत्वें त्याच्या इच्छेस येईल तेव्हां तो प्राण घ्यायास समर्थ नाहीं असें ठरतें.

रामचंद्र आणि कृष्ण यांचें दुर्बळपण मोरभट दांडेकर याला म्या उत्तर दिल्हें आहे त्यांत सिद्ध केलें आहे.

वराह आणि वामन अवतार ज्या कामासाठीं झाला तशाच कारणासाठीं बुध्द अवतार झाला असें लिहिलेलें आहे. कलकी अवतार अद्यापि झाला नाहीं असें ह्मणतात त्याविषयीं मला कांहीं लिहिणें नलगे.

यावरून

यावरून स्पष्ट दिसावें कीं हिंदूंच्या अवतारांत देवाची शक्ति प्रगट झाली नाहीं. नारायणरावाला मी इतकेंच सांगतों कीं त्याने आपल्याच मताप्रमाणें विचार करावा. आणिं त्या अवतारांवर अगदीं विश्वास ठेवूं नये.

२. नारायणराव ह्मणतो कीं "अवतार प्रादुर्भावाने सर्वांची चित्तें फिरून ईश्वरा सन्मुख व्हावीं" मी मान्य करितों कीं अवताराने मनुष्याचीं चित्तें देवाकडून फिरवून येत. आतां नारायणरावाचें आणि माझें मत एकच असतां मी त्याला सांगतों कीं हिंदूंच्या देवानी केलेलीं पापें जीं म्या आपल्या अगोधरच्या पुस्तकांत निवेदिलीं आहेत त्यांविषयीं हिंदूलोक जीं उत्तरें देतात तीं सगळीं खोटीं आणि निरर्थक आहेत असें नारायणरावाने मान्य करावें. अणखी मी त्यास असें सांगतों कीं बुध्द अवतार ईश्वरापासून मनुष्यांचीं अंतःकरणें केवळ फिरवायाकरितां झाला ह्मणून त्याने त्या अवतारावरहि विश्वास ठेवूं नये. त्या अवताराविषयीं अग्निपुराणांत असें ह्मटलें आहे कीं "असुरानी "सुरांस जिंकिलें असतां सुर विष्णूला शरण गेले ह्मणून "विष्णूने जिनाचा पुत्र जो बुध्द त्याचें रूप धरून असुरांस ठ"किवलें. मग सुरांस वेदांतील धर्माचा त्याग करावा लाग"ला ह्मणून त्याचें सर्व सुरत्व हरण झालें. त्याकाळापासून

“सून बौद्ध धर्म चालला आहे.आणि बहुतेकानी वेदांतील
“ कर्में सोडून तो धर्म चालविला आहे.” ही कथा म्या सांगि-
तली त्याचें कारण वेदाचा त्याग करणें पाप कर्म आहे असें
मी समजत नाहीं परंतु नारायणराव जो जो सत्य विचार क-
रितो त्याने हिंदू धर्माचा नाश होतो हें दाखवायाकरितां म्या
ती कथा सांगितली.जो विचार त्याला धरावा लागला त्याव-
रून त्याला दिसेल कीं हिंदूच्या देवाचे अवतार पापी आ-
हेत असें निवेदिलें आहे तसेंच विष्णूने सर्व जे मानव अ-
वतार धरिले ते त्याच्या पापामुळेंच धरिले असें पुराणां-
तरीं आहे.त्याविषयीं मत्स्य पुराणांतील एक गोष्ट लिहि-
तों.“जेव्हां सुरानी असुरांस बहुत वेळां जिंकिलें तेव्हां
“असुरानी युद्ध टाकून पळत असतां शुक्र जो त्यांचा गु-
“रु त्याने शिव प्रसन्न करायासाठीं आणि असुरांचा जय
“होई असी सिद्धी मिळवायासाठीं उग्र तप करायाचा नि-
“यम केला.शुक्र तें कार्य करायास गेला असतां असुरा-
“नी आपआपणांत असा विचार केला कीं ‘आपल्या गु-
“रूने शस्त्रें टाकून सन्यास्यासारिखीं वल्कलें आणि का-
“ळें चर्म वष्टिलें आहे तर आह्मी युद्धांत सुरांस कसें जिंका-
“वें? तर चला आपण आपआपलीं शस्त्रें घेऊन शुक्राच्या
“आईस शरण जाऊं आणि शुक्र जो आपला गुरु तो तप
पुरें

“पुरें करून पुनः येई तोंपर्यंत दुःख सहन करूं.नंतर आप-
“लीं कवचें पुनः घालून सुरांबरोबर युद्ध करूं.असा निश्च-
“य करून ते भयाभीत होत्साते शुक्राच्या आई संन्निध
“जाते झाले.तिने त्यांस आश्रय देऊन ह्मटलें कीं ‘भिऊं
“नका भिऊं नका माझ्या जवळ असा ह्मणजे तुह्मास कां-
“हीं संकट प्राप्त होणार नाहीं: असुर ह्याप्रमाणें शुक्राच्या
“आई जवळ स्वस्थ आहेत असें सुरानी पाहून तेथें यु-
“द्धार्थ जाऊं लागले तेव्हां असुरांस सुरानी वेढा घातला
“आहे असें त्या देवीने पाहून क्रोधयुक्त होत्सातां इंद्रा-
“स ह्मटलें कीं ‘जर तूं युद्ध नसोडून देसील तर तुझें स्व-
“र्गाचें राज्य तुजपासून घेईन! तेव्हां इंद्र तिच्या क्रोधयुक्त
“शब्दांस आणि तिच्या साबरी विद्येस भिऊन युद्ध सोड-
“तो आहे इतक्यांत विष्णु सुरांच्या सैन्यांत प्रगट होऊ-
“न ह्मणाला ‘हे इंद्रा भिऊं नको मी तुला साहाय्य करितों:
“इंद्राला विष्णूने आश्रय दिल्हा असें त्या देवीने पाहून
“क्रोधयुक्त होऊन ह्मणाली ‘आतां माझ्या तपाच्या बळें-
“करून मी इंद्राला आणि विष्णूला कसें जिंकितों तें पा-
“हा! मग इंद्र आणि विष्णू आपण जिंकले जाऊं असें पा-
“हून परस्परासीं ह्मणूं लागले आतां आपण ह्या अरिष्टां-
“तून कसें सुटावें? इंद्र ह्मणाला हे विष्णू तिने मंत्र उ-
चारिला

“चारिला नाहीं इतक्यांत त्वराकरून तिला जिंकावें नाहीं “तर आपण जिंकले जाऊं नंतर विष्णूने विचार केला कीं “जर शुक्राच्या आईने मंत्र सामर्थ्य करून आह्मास जिंकलें “तर देवांस फार दुःख होईल तर अशा प्रसंगीं स्त्री हत्या “करणें निर्दोष आहे मग त्याने चक्र घेऊन तिचा शिरच्छे- “द केला. परंतु भृगूने स्त्री हत्या हें मोठें पातक त्यांत आप- “ली स्त्री वधली असें पाहून फार संतप्त होत्सातां विष्णूला “शाप देता झाला कीं ‘त्वां स्त्रीहत्ये सारिखें मोठें पातक “जाणत असतां तें केलेंस ह्मणून तूं सातवेळां मानवांत “जन्मसील.’ मग असा उःशाप दिल्हा कीं ‘परंतु प्रत्येक “जन्मी जगाचें कल्याण आणि न्यायाची स्थापना होई- “ल.’ विष्णूने मानवांत जन्म घेतले त्याचें कारण पाप हें ए- थें केवळ स्पष्ट सांगितलेलें आहे. ‘न्यायाची स्थापना कर- ण्याविषयीं’ असें जें ह्मटलें आहे त्याविषयीं आह्मी असें सिद्ध केलें आहे कीं अन्याय मात्र केले आहेत.

३. नव्या करारावर तिसरें दूषण असें आणलें आहे कीं “मागिशी लोकांस येशूला दाखविण्या करितां एक नक्षत्र “मार्ग दाखविणारें झालें ही गोष्ट मोठी आश्चर्याची आहे. “ख्रीस्ती ब्रह्मांडाचे वर्णनांत सर्व नक्षत्रें आपल्याल्या पृथ्व्यां “चें सूर्य असें आहे. जर तें नक्षत्र ह्मणजे सूर्य आपल्या

स्थानापासून

“स्थानापासून इषन्मात्र चलित झालें तर महत् अनर्था- “चें कारण आहे. असें असतां तें नक्षत्र स्वस्थानापासून या- “पृथ्वीचे समीप येऊन ही पृथ्वी दग्ध न होतां कसी टिकली? “असी ख्रीस्ती ज्योतिष विद्या व धर्म यांत परस्परें वैपरी- “त्यें याचीं कीं काय ?

नारायणरावाने बोलण्याच्या जनरूढी विषयीं विचार केला नाहीं ह्मणून त्याने जें वर लिहिलें आहे तें त्यास विपरीत भासतें. त्याने नक्षत्र असा शब्द लिहिला आहे तो ग्रेकी भाषेंतील मूळ शब्दांसी अथवा नव्या कराराच्या मराठीं भाषांतरांतील शब्दांसीं मिळत नाहीं. तारा हा शब्द बरोबर आहे. त्याचा अर्थ नारायणरावास माहितच आहे कीं उल्का अथवा तारा होतो. मग जर असें अनुमान केलें कीं पूर्वेकडील ज्ञानी लोक जे ख्रीस्ताला पाहायास येत होते त्यांस उल्कापात अथवा तसाच कांहीं तेजस्वी पदार्थ दिसला तर नव्या करारांतील वृत्तांतामध्यें कांहींच विपर्यास नाहीं. येशू जेव्हां जन्मला तेव्हां “ज्ञानी” लोकांस आकाशामध्यें नवी स्थिर तारा दिसली असें अनुमान केलें असतां असें समजायास कांहीं विपरीत नाहीं कीं ती तारा समोर पाहून त्यांनी त्या बाळाच्या घराविषयीं निश्चय केला कीं ती जेथें ब-

रोबर

शेवर मध्यान्हास आहे तेथें तें घर आहे. अलंकार भाषेप्र-
माणें तारा फिरती असें आपण समजतों तें लोकांच्या रीती-
प्रमाणें नीटच आहे आणि आह्मी सूर्योदय सूर्यास्त जसें
ह्मणतों तसेंच तेंहि आहे. येशू जो मनुष्याचा तारणारा त्या-
च्या जन्मकाळीं नवी तारा निर्माण होणें हें चिन्ह योग्यच
आहे. त्या तारेच्या दिसण्यांत किंवा अदृश्य होण्यांत देवा-
च्या शक्तीस कांहींच बाधकारी नाहीं आणि जोतिषांच्या
अनुभवाचेंहि कांहीं विपरीत नाहीं. उलविच शहरांतील
राजाच्या लश्करी महाशाळेंतील सिद्धांत शिक्षक बार्लो
साहेब याने असें ह्मटलेलें आहे कीं "कितीएक नव्या
"तारा कांहीं काळपर्यंत दिसून मग अदृश्य झाल्या. पु-
"रातन काळीं ज्या कांहीं तारा लिहिलेल्या आहेत त्या सां-
"पडत नाहींत. आणि ज्या तारा प्राचीन लोकांस माहित
"नाहींत अशा तारा नेहेमी स्पष्ट दृष्टीस पडतात. व्हेल-
"नामें नक्षत्र मंडळांतील 'बेटा' तारेसारिख्या कितीएक
"उत्तरोत्तर अधिक तेजस्वी दिसतात. अगस्ती नक्षत्रांती-
"ल 'डेल्टा' तारेसारिख्या कितीएक तारा नेहमी अंधुक
"होत आहेत. आणि बहुत तारा नियमित काळानी अ-
"धिक अथवा उण्या तेजस्वी दिसतात. ख्रीस्ती सन १५७२
मध्यें टैकोने कासिओपिया नक्षत्रांत एक नवी तारा पा-

हिली

हिली तिची फार चमत्कारीक गति झाली आहे. ती अकस्मा-
त् इतकी तेजस्वी झाली कीं शुक्र आणि बुध ह्यांच्या तेजा-
पेक्षांहि अधिक आणि दिवसासहि मध्यान्हरेषेवर दिसत
होती. मग तिचें तेज उणें होऊं लागलें आणि ती प्रथम दि-
सल्यापासून "सोळा महिन्यानंतर अदृश्य झाली. सन १६०३)
"(१६०४) मध्यें सर्पेन्टारिअस नामें नक्षत्र मंडळांत जी
"नवी तारा दिसली तिचाहि तसाच चमत्कार झाला मग
"कांहीं महिनेपर्यंत दिसून नंतर ती अदृश्य झाली."

४. नव्या करारावरील चवथें दूषण असें आहे कीं "ये-
"शू देहासहीत परलोकास गेला ह्मणून पाद्री साहेबाने लि-
"हिलें आहे. त्याचें देहासहीत गगनास जाणें हें पृथ्वीच्या
"आकर्षण शक्तीने होऊं शकणार नाहीं. त्याच्या जोतिष
"विद्येस व ख्रीस्तीमत बैबलास असें वैपरीत्य यावें का-
"य?"

असें स्मरण होईल कीं पूर्वी नारायणरावाने ख्री-
स्ताने आपली दैवी शक्ती ज्याकाळीं स्वस्थ असावी तेव्हां
चालिवली नाहीं ह्मणून दोष ठेविला. आतां ख्रीस्ताने आ-
पली दैवी शक्ती चालवून इच्छा वाटली तेव्हां आकाशा-
स गेला ह्मणून नारायणराव दोष ठेवितो! ख्रीस्त आका-
शांत जाण्यास जर अशक्त असता आणि मग जर त्या-

ने

ने दूषण ठेविलें असतें तर तें ठीकच होतें परंतु तो आकाशांत चढला ह्मणून तर तो देवाकडून आलेला असें मान्य करावें.

ख्रीस्ती पदार्थ विज्ञान संबंधी जे दोष नारायणरावाने आणिले आहेत ते व्यर्थ आणि खोटे आहेत. ते वर सांगितले आहेत. त्याने ते दोष आणल्यामुळें हिंदूधर्माचीच अनावस्था होती. तो धर्म तर बहुत प्रकारें विद्येस आणि पदार्थ विज्ञानाचे विपरीत आहे. तो धर्म त्यांसी मिळतो असें कोणाच्याने अनुमान करवत नाहीं. ह्याविषयीं विचार केला असतां ह्या नाशकारक खोट्या धर्माचा कदाचित् नाश होईल.

मोरभट दांडेकरास म्या उत्तर दिल्हें आहे त्यांत म्या हिंदूंच्या जोतिःशास्त्राविषयीं आणि भूगोलाविषयीं कांहीं सुचना केली आहे ती पाहावी. आणि त्यासंबंधीं स्कंद पुराणांतील चमत्कारीक वाक्यें मी खालीं लिहितों तीं भागवत इत्यादि ग्रंथांतील वाक्यांसारिखींच आहेत.

"हे राजा पुत्रासारिखा बाण धारण केला आहे अ-
"सा जो तूं प्रकृतीच्या पूर्वी काय होतें त्याविषयीं निश्चं-
"कपणें एक प्रकृतीपासून ज्ञान ज्ञानापासून त्रिगुण त्रि-

गुणापासून

"गुणापासून पंचज्ञान इंद्रियें आणि पंच महाभूतें निर्माण
"झालीं. पृथ्वीसारिखीं अंडें पंच महाभूतांपासून निर्मा-
"ण झालीं त्यांची संख्या १०००००००००००० हीं अंडें एका-
"वर एक रचिलेलीं नाहींत परंतु सर्व एका बाजूस एक अ-
"शा सपाटीवर आहेत. तीं सोन्यासारिखीं आहेत.

"त्या अंडांतून तुझ्याजवळ १००८ आहेत. त्यांतून
"एकाचा प्रकार मी तुला सांगतों तेणेंकरून तें तुला केव-
"ळ पारदर्शी पळासारिखें दिसेल.

"२४ किर्णें ह्मणजे एका केंसाची रुंदी ८ केंस ह्मण-
"जे एक लीख ४ लिखा ह्मणजे एक ऊ ८ उवा ह्मणजे एक
"यव. ३ यव ह्मणजे एक अंगुळ. २४ अंगुळें ह्मणजे एक
"हात. ४ हात ह्मणजे एक दंड. २ दंड ह्मणजे एक काठी.
"२००० काठ्या ह्मणजे एक कोश ४ कोश ह्मणजे एक यो-
"जन.

"त्या अंडाची लांबी रुंदी सारिखीच आहे ह्मणजे
"१००००००००० योजने. आणि दुसरीं अंडेंहि तितक्या-
"च महत्वाचीं आहेत. आतां म्या त्या अंडाचें आणि त्यां-
"त वास करणारांचें वर्णन करितों तें लक्ष देऊन श्रव-
"ण कर!"

"ह्या पृथ्वीस सात द्वीपें आहेत ह्मणजे जंबु कुश

प्लक्ष

“प्लक्ष शाल्मली कौंच शाक आणि पुष्कर. जंबुद्वीपाच्या स-
“भोंवती क्षारसमुद्र आहे कुशद्वीपाच्या भोंवती मद्यस-
“मुद्र आहे. प्लक्षद्वीपाच्या भोंवतीं इक्षुरसमुद्र आहे. शा-
“ल्मली द्वीपाच्या भोंवतीं घृतसमुद्र आहे. कौंचद्वीपाच्या
“भोंवतीं दधिसमुद्र आहे. शाकद्वीपाच्या भोंवतीं दुग्ध
“समुद्र आहे. आणि पुष्करद्वीपास भोंवती गोड पाण्या-
“चा समुद्र आहे. तीं सर्व वर्तुळाकार आहेत.

“गोड्या पाण्याचा भोंवती सोन्याची मोठी सपाटी
“आंहे तिच्या भोंवती डोंगरांची आणि अक्षय अंधःकारा-
“ची भींत आहे..

“पहिलें जंबुद्वीप १००००० योजने आंहे आणि त्या-
“च्या भोंवतालचा समुद्रहि तितकाच मोठा आहे दुसरें द्वी-
“प पहिल्याच्या दुप्पट आहे आणि तसेंच पुढें तीं सर्व मि-
“ळन २९४९०००० योजने आहेत.

“मेरूपर्वत जंबुद्वीपावर आहे तो कमल पुष्पाका-
“र आहे. त्याची उंची ८४००० योजने आहे. आणि तो पृथ्वी-
“च्या गर्भांत १६००० योजने आहे त्याच्या अग्रभागाची रुं-
“दी ३२००००० आणि पायाची रुंदी १६००० त्याला तीन ऊ-
“र्ध्व कोण आहेत आणि त्यांतील फार मोठ्या कोणावर
“अनेक टोंकें आहेत.

“पृथ्वी आकाश इत्यादि आहेत.

“त्याजवर स्वर्गवासी गंगा आहे. तिजवर पृथ्वी पा-
“सून १००००० योजनें सूर्य आहे. तेथें ३३००००००० देव
“आहेत. त्याजवर १००००० योजनें चंद्र आहे. त्याजवर सं-
“भर तारा मंडळें आहेत. पुढें २००००० बुध त्यापुढें २०००००
“शुक्र आहे. पुढें २००००० मंगळ त्यापुढें २००००० बृहस्प-
“ति. आणि त्यापुढें २००००० योजनें शनी आहे. त्यावर
“१००००० योजनें (अगस्ती) सप्त ऋषी आहेत. आणि त्या-
“जवर १००००० योजने ध्रुव आहे.”

त्या पुराणांतील सर्व मोठ्या चुक्या लिहिणें कठीण आहे. प्रकृतीपासून ज्ञान ज्ञानापासून त्रिगूण त्रिगुणापासून पंच ज्ञानेंद्रियें आणि पंच महाभूतें उद्भवलीं ह्या मताचा विचार ज्या ऋषीनी हीं पुराणें कल्पिलीं त्याच्या अनुसारी पुरुषानीच करावा. ज्यांस जोतिषाचें आणि कांहीं भूगोलाचें ज्ञान आहे ते मान्य करितील कीं पृथ्वीच्या आकाराविषयीं पृथ्वीच्या भागाविषयीं आणि ग्रहांच्या तारांच्या चंद्राच्या सूर्याच्या अंतराविषयीं जें त्यांत लिहिलें आहे तें खोटें आहे. अति दूर प्रवास करणारांस तीं द्वीपें माहित नाहींत आणि गलबतांत बसून फार दूर फिरणारांसहि क्षार मधु इक्षुरस घृत दधि दुग्ध आणि मधुरउ-

दक हे समुद्र ठाऊक नाहींत. पृथ्वीच्या महत्वासंबंधी जी
अतिशयोक्ती लिहिली आहे तिजवरून स्पष्ट होतें कीं ज्या
ऋषींनी पुराणें केलीं त्यांत जोतिषासंबंधी फार मोठे दोष
केले. पुराणांत मेरूची ऊंची ८४००० योजनें सांगितली
आहे परंतु त्रिकोणमितीच्या गणिताप्रमाणें मेरूचें अ-
तिऊंच टोंक २७००० फुटी पेक्षां अधिक नाहीं त्याची रुं-
दी आणि महत्वें त्यासारिखींच खोटीं लिहिलीं आहेत.
सूर्य पृथ्वीपासून १७१२९००० योजनें दूर आहे परंतु पु-
राणांत त्याचें अंतर १००००० योजनें मात्र आहे. चंद्र पृ-
थ्वीपासून ३०००० योजने आहे. त्याचें अंतर २०००००
योजनें ह्मणजे सूर्याच्या दुप्पट लिहिलें आहे. त्याप्रमाणें-
च ग्रहांचीं स्थानें खोटीं लिहिलीं आहेत. पृथ्वीपासून अ-
गस्ती तारांचें आणि ध्रुवाचें अंतर इतकें फार आहे कीं त्यां-
चें माप घेतां येत नाहीं. ग्रहांच्या अंतरासीं आणि त्यासीं
कांहींच संबंध नाहीं.

ज्या पुराणांतून ह्या वरलीं वाक्यें उतरून त्यांवि-
षयीं विचार लिहिला आहे त्यांत ग्रहणासंबंधी असी
कथा आहे कीं "समुद्रमंथन झाल्यानंतर विष्णूने दे-
"वांस अमृत दिल्हें त्याकाळीं त्या मंडळींत दोघे अ-
"सुर होते त्यानींहि तें घेऊन प्राशन केलें परंतु त्या-
नी

[illegible] Oriental MSS. Library,
[illegible] P.O., Mad-

"नी आपोशन घेतलें नाहीं. तें चंद्र आणि सूर्य यानी पाहू-
"न विष्णूला खुणावलें कीं ते देव नव्हेत परंतु असुरानी
"कापट्य वेष धरून अमृतप्राशन केलें. तेव्हां विष्णूनें तें
"कापट्य पाहून देवांच्या मंडळींत त्यांजजवळ जाऊन
"हातांत दर्वी होती तीणें करून त्याचा शिरच्छेद केला
"आणि वरकड अमृत देवांस वाटून दिल्हें. त्या असुरानी
"जें अमृतपान केलें तें त्यांचा शिरच्छेद केला तेव्हां माने-
"च्या खालीं उतरलें नव्हतें ह्मणून जरीं त्यांचीं शरीरें ल-
"यास पावलीं तथापि शिरें मरण पावलीं नाहींत. हें पाहू-
"न ज्या विष्णूने एकवेळहि सर्व पृथ्वी एका पदाने आटोप-
"ली त्याने ह्मटलें कीं अमृतपान केलें आहे त्यापेक्षां ते स्व-
"र्गांतच राहतील. त्याने त्यांस ग्रहांचें स्थान दिल्हें. तेव्हां-
"पासून तीं दोन डोकीं तांबडे आणि काळे सर्पाच्या रूपा-
"ने सूर्यचंद्रास ग्रासतात." राहू केतू चंद्रास ग्रासतात
ह्मणून ग्रहण लागतें असें वर ह्मटलें आहे तें तसें नाहीं-
त्याचें कारण असें आहे कीं सूर्य आणि चंद्र यांच्या म-
ध्यें पृथ्वी येण्याने अथवा सूर्य आणि पृथ्वी यांच्या म-
ध्यें चंद्र येण्याने ग्रहण लागतें. पृथ्वी आणि सूर्य यां-
च्यामध्यें चंद्र आला असतां सूर्यग्रहण लागतें. आणि
सूर्य आणि चंद्र यांच्यामध्यें पृथ्वीची छाया पडली अ-
सतां

सतां चंद्रग्रहण लागतें.

भागवतांत आणि दुसऱ्या पुराणांत असें आहे कीं चंद्र आपल्या स्वभाविक प्रकाशाने प्रकाशतो राहुच्या आपेंकरून त्याच्या कळा चढतात आणि उतरतात. परंतु चंद्र स्वयंप्रकाश नाहीं. याच्या ज्या अर्धभागीं सूर्य प्रकाशतो त्याभागापासून आपल्या स्थलाप्रमाणें त्याच्या कळा चढतात असें दिसतें. सूर्याचें अंतर आणि त्याचा प्रकाश याहींकरून मात्र त्या सर्व कळा दिसतात. वर्धमान चंद्राची तेजस्वी कोर नेहमी सूर्याकडे असती आणि प्रतिमहिन्यास चंद्र सूर्यापासून जसजसा दूर जातो तसतसी त्याची कोर रुंद होती. मग तसीच उणी होत जाती.

भागवतांत असें आहे कीं त्रिविक्रमाने बळीपासून स्वर्ग पृथ्वी आणि पाताळ हीं स्थलें ज्याकाळीं तीन पावलानी घेतलीं, तेव्हां ब्रह्म्याने त्याचे पाय धुतले. त्याने पाऊलें अशा ठिकाणीं ठेविलीं होतीं कीं तेणेंकरून आकाशगंगा पृथ्वीवरील गंगा आणि पातालांत भोगावती निर्माण झाली. परंतु तारांच्या मोठ्या समुदायाचा पसरलेला आणि जोडलेला जो प्रकाश तीच आकाशगंगा आहे. इतर नद्यांप्रमाणें गंगा नदी हिमालयांतून निघाली आहे. भोगावती आहे कीं नाहीं आणि तिचा प्रकार याविषयीं कांहीं

च सांगवत नाहीं.

पुराणांतरीं असें आहे कीं कूर्म पसरतो आणि आकुंचित होतो अथवा ब्रह्म ऊर्ध्व समुद्रांतील पाणी शोषण करितो आणि पुनः टाकून देतो तेणेंकरून समुद्राचें पाणी वाढतें किंवा कमी होतें यथाविद्या असें आहे कीं चंद्र आणि सूर्य यांच्या आकर्षणामुळें फारकरून चंद्राच्याच आकर्षणाने भरती सुखती होतात.

भागवतांत आणि दुसरे पुराणांत असें ह्मटलें आहे कीं पृथ्वी स्थीर राहावी ह्मणून तिजवर पर्वत केलें आहेत. भूगोलवर्णनांत तसें ह्मणत नाहीं. त्यांत असें ह्मटलें आहे कीं डोंगर पृथ्वीवरील ऊंच नीच अवयव आहेत त्याचा उपयोग फार आहे कीं त्याहींकरून पृथ्वीवर नानाप्रकारचे चमत्कार होतात ढगें आकर्षलीं जातात वातावरण आणि हवा बदलतात आणि पाणी जमतें किंवा उतरतें तेणेंकरून नद्यांचे उगम होतात.

पुराणांतरीं असें आहे कीं इंद्र आपलें वज्र जमलेल्या ढगांवर मारितो तेणेंकरून घडघडाट होतो जोतिःशास्त्राप्रमाणें असें आहे कीं ढगें जीं परस्पराजवळ असतात त्यांत एक तैजस प्रवाह जात असतो तेणेंकरून घडघडाट होतो.

पुराणांत असें सांगितलें आहे कीं इंद्राच्या आज्ञे-
प्रमाणें मेघ हत्तीचें रूप धरून सोंडेनें समुद्रांतील अथ-
वा नद्यांतील पाणी प्राशन करितात तेणेंकरून पाण्याचे
झोत दिसतात. परंतु त्यांचें वास्तविक कारण असें आहे
कीं तैजस पदार्थांच्या योगानें अथवा हवेचे वेगवेगळे प्र-
वाह एकच झाल्यानें पाण्याचे झोत होतात.

"इन्कायरर" नामें वर्तमानपत्राच्या कर्त्यानें असें
ह्मटलें आहे कीं "जर हिंदूंस असें सांगितलें कीं ढगांतील
"तैजस पदार्थ लखलखतो त्यास वीज ह्मणतात तर त्यां-
"स खरें वाटणार नाहीं कांकीं वीज एक सुंदर देवी आहे.
"असें त्यांच्या धर्मांत आहे. त्यांस जर असें दाखविलें कीं
"हैड्रोजन आणि आक्सिजन या दोन पदार्थांच्या संयो-
"गानें पाणी होतें आणि नैट्रोजन आणि आक्सिजन यां-
"च्या योगानें हवा होती तर त्यांस सत्य वाटणार नाहीं का-
"रण पाणी आणि हवा महद्भूतें आहेत असें ते समजतात.
"त्यांस समजावा कीं पृथ्वी आकाशांत निराधार राहिली
"आहे आणि दोन विरुद्ध आकर्षण शक्तींच्या मुळें ती च-
"लित होत नाहीं तसें त्यांस असत्य वाटेल कारण त्यांच्या
"धर्मांत असें ह्मटलें आहे कीं पृथ्वी शेषानें मस्तकावर
"धरली आहे. त्यांस सांगा कीं पृथ्वीमध्यें ज्वालाग्राही
पदार्थ

"पदार्थ आहेत त्यांच्या अवाजानें धरणीकंप होतो तर तें
"त्यांच्या धर्माच्या विरुद्ध आहे कारण त्यांत असें ह्मटलें
"आहे कीं शेष आपलें डोकें हालवितो तेणेंकरून धरणी
"कंप होतो." ही सगळीं धर्ममतें पुराणांत आहेत.

ऐतरेय ब्राह्मणांत असें लिहिलें आहे कीं "पाउस पड-
"ल्यावर तो वाफरूप होऊन चंद्रावर राहून जातो." पुराणां-
त असें आहे कीं चंद्राच्या योगानें पाऊस वर्षाकाळीं पड-
तो. मनुस्मृतींत असें आहे कीं सूर्य किरणांनीं आठ महि-
नेपर्यंत जें पाणी शोषून जमविलें जातें तें वर्षाकाळीं चं-
द्र सर्व पृथ्वीवर शिंपतो परंतु सूर्य आपल्या मार्गाच्या ए-
का भागीं असतो तेणेंकरून आणि सूर्याच्या उष्णतेंकरू-
न जे वायू सुटतात त्यांहींकरून पाऊस पडतो.

मनुष्याच्या शरीर आणि मानसिक धर्माविषयीं
पुराणांत आणि दुसऱ्या धर्मपुस्तकांत चमत्कारीक गोष्टी
सांगितल्या आहेत. असें ह्मटलें आहे कीं अंतःकरणापा-
सून एकोत्तरशें नाडी निघाल्या त्यांतून एक नाडी ब्रह्मां-
डीं गेली आहे. तिला सुषुम्ना ह्मणतात. असें ह्मटलें आहे
कीं योगी आपला प्राण ब्रह्मांडीं नेऊन ठेवितो आणि पाहि-
जे तेव्हां खालीं उतरवितो त्यास खाण्यापिण्याचें अग-
त्य नसतें आणि तो आपला आत्मा परात्परांत मिळवूं श-
कतो.

कतो. अंतःकरणास जडलेल्या १६ पांकळ्या* आहेत. त्यांतून एक एका पांकळीवर अंतःकरण फिरत असतें ज्याज्या पांकळीवर बसतें त्यात्या प्रमाणें कल्पना इच्छा आणि वृत्ति बदलती. कांहीं पाकळ्यांवर अंतःकरण बसलें असतां निद्रा येती. तेथून जेव्हां दुसऱ्या पांकळ्यांवर जातें तेव्हां जागृति होती. एकाद्या पांकळीवर असतां अंतःकरण पाप करतें. एकाद्या पांकळीवर असतां पुण्याची रास मिळवितें." जेव्हां अन्नभक्षण करावें तेव्हां त्याच्या जाडी बा"रकी प्रमाणें तीन पदार्थ होतात. धान्य आणि जड पदा"र्थांचें मांस होतें परंतु त्यांचा चोंथा बाहेर पडतो आणि "तत्व इंद्रियांचें पोषण करितें. पाण्यापासून रक्त होतें "त्यांतील जाडे कण मूत्रद्वारानें निघतात आणि बारीक "कणांपासून श्वासोश्वास चालतात. तेल आणि दुसरे ते"जस पदार्थ ज्याला घाही आहेत त्यांचा भेद होतो. त्यांतू"न जाडे अंश हाडामध्यें राहतात आणि बारिकांपासून "वाचा शक्तीचें पोषण होतें." हीं हिंदू शास्त्रांतील वेडेपणाची उदाहरणें आहेत.

हिंदूशास्त्रांत वेगवेगळ्या जनावरांविषयीं उद्बीजाविषयीं आणि धातूंविषयीं फार खोटे विचार सांगितले आहेत.

---

* अंतःकरणाला कधीं अष्टदल ह्मणतात.

हेत. ह्या देशांतील कोणी मनुष्य जर ते विचार वाचील आणि सृष्टिविज्ञान शास्त्र शिकेल तर त्याला ते विचार तेव्हांच खोटे आढळतील. ह्याविषयीं शोध व्हावा ह्मणून मात्र म्या ती सुचना केली आहे.

वर जे विषय म्या सांगितले त्यांच्या पुढें जे विचार मला अवश्य केले पाहिजेत ते खालीं लिहितों.

(१) ख्रीस्ती शास्त्रांत "मुख्यत्वें देव कसा समजावा "आणि तो आह्मास अवश्यमेव काय करायास सांगतो "तें सांगितलें आहे." त्यांत जें जें सांगितलें आहे तें सर्व यथान्याय आहे. त्यांत जें ज्ञान मनुष्यांस अत्यंत हितकारक तें सांगितलें आहे आणि बुद्धिने ज्या गोष्टी कळायाजोग्या आहेत त्यांविषयीं त्यांत फारकरून कांहींच सांगत नाहीं. हिंदूशास्त्रांची रीति वेगळी आहे. त्यांच्या शास्त्रकर्त्यांनी ज्या गोष्टी मनुष्याच्या हितावह नाहींत त्या सांगितल्या आहेत. आणि त्यांत त्यानी असंख्य दोष केले आहेत.

(२) मोरभट दांडेकरास म्या उत्तर दिल्हें आहे त्यांत म्या ह्मटलें आहे आणि आतांहि मी सांगतों कीं हिंदूस्थानांत कळाविद्यांच्या प्रसारेंकरून हिंदूधर्माचा फार नाश होईल. कारण कीं ती गोष्ट तसीच आहे आणि त्या क-

ल्पने

त्यनेप्रमाणेच घडत आहे. कलकत्यांतील आणि मुंबईती-
ल विद्वान लोकांत शास्त्राचाठायीं अविश्वास आणि त्याच्या
आज्ञेचा भंग फार होत चालला आहे. ईश्वर करो आणित-
सें फारसें होवो.

(३) ज्या शिक्षाशाळांमध्यें खीस्ती धर्म शिकवीत
नाहींत त्यांचे आश्रय देणारे फार विपरीत आचरण करि-
तात. ते ह्मणतात कीं आह्मी ह्यादेशांतील लोकांच्या धर्मा-
चा आड येत नाहीं परंतु ते त्यांस भूगोल आणि जोतिः
शास्त्रांचीं तत्वें तर खुशाल शिकवितात तेणेंकरून त्यां-
च्या धर्माचा निःसंशय नाश होईल. आत्म्यास विश्रांती
मिळे आणि पापापासून मुक्ति आणि ह्या जगांतील आ-
णि आकाशांतील कामांचें ज्ञान होई असें सत्य शास्त्र
तें शिकविणार नाहींत परंतु बहुत प्रतिष्ठीत आणि बुद्धि-
मान तरुण मुलें हिंदूधर्म सोडायास आणि त्यांतील वि-
धी मार्ग अवमान्य करायास जेव्हां सिद्ध होतात आणि
बहुतजण आंतून मात्र तीं कर्में करितात परंतु बाहे-
रून त्यांचा त्याग करायाची इच्छा करितात तेव्हां बं-
गाल्यांतील सरकारी शिक्षामंडळीस जसा आनंद हो-
तो तसाच एथील मंडळीस होईल. मी आशा करितों
कीं ह्या देशांतील मुख्य लोकांचे डोळे आपल्या हिता-
विषयीं

विषयीं उघडतील. शिक्षेंकरून आमच्या धर्माचा नाश हो-
ईल असा विचार त्यांनी करूं नये परंतु आह्मास त्याजब-
द्दल अणखी कोणता धर्म मिळतो कीं नाहीं हा त्यांनी
विचार करावा.

(४) नव्या करारावर चवथें दूषण असें आणलें आ-
हे कीं "ईश्वराचा पुत्र येशू असें ह्मणतात त्यास पुत्रसंबं-
"धानें ईश्वरास जड शरीर व प्रपंच संभवतो व दूतहि आ-
"हेत ह्मणून हा त्याचा एक संसारच झाला व आकाशां-
"त राहण्याचें त्याचें स्थानहि लिहिलें आहे. तर मग ई-
"श्वर आमच्या सारिखाच झाला."

नव्या करारांत वारंवार खीस्ताला निःसंशय ईश्व-
राचा पुत्र ह्मटला आहे. आह्मी पूर्वींच दाखविलें आहे कीं
खीस्ताचा मनुष्यदेह पवित्र आत्म्याच्या शक्तीने संभव-
ला. आणि नारायणरावाच्या मनांत कांहीं कुकल्पना या-
व्या असें खीस्ताच्या जन्मासंबंधीं कांहींच घडलें नाहीं.

खीस्ताच्या पुत्रत्वाविषयीं मी असें उत्तर देतों कीं
तो आपल्या बापाचा केवळ संबंधी आहे. जे तिघे देवपणां-
त आहेत त्यांमध्यें तो एक आहे. ईश्वरत्वाच्या प्रकृतीम-
ध्यें जे तीन पुरुष आहेत त्या तिघांचा स्वभाव शक्ती आ-
णि ऐश्वर्य समान आहेत. त्या तिघांची नामेंहि ईश्वर
त्यांस

त्यांस ईश्वरत्वाचा अधिकार आहे. त्यांचे गुण ईश्वराचे
त्यांची कामें ईश्वराचीं त्याचा संबंध ईश्वराचा आणि त्यांस
सन्मानहि ईश्वराचा आहे असें स्पष्ट ह्मटलेलें आहे. बापा-
चा आणि शब्दाचा ह्मणजे येशूख्रीस्ताचा संबंध ख्रीस्ती-
शास्त्रांत बहुत ठिकाणीं पुत्र आणि एकुलता एक पुत्र असीं
ख्रीस्ताला नामें देऊन प्रगट केला आहे. हीं नामें कांहीं फा-
र मोठे अर्थाकरितां दिल्हीं आहेत. अवतारी शब्दाचा देह
पवित्र आत्म्याकडून संभवला आणि तो प्रगट झाल्यावर
त्याला देवाचा पुत्र ह्मटलें. परंतु तो त्याकाळीं देवामध्यें न-
व्हता असा अर्थ केला असतां त्या नामाचें मर्म बरोबर ल-
क्षांत येत नाहीं. ख्रीस्ताच्या स्वाभाविक आणि अक्षय का-
ळ पुत्रत्वासंबंधी विचार ख्रीस्ती शास्त्रांत सांगितला आ-
हे. त्या शास्त्राच्या कितिएक लिहिणारानी असें ह्मटलें
आहे कीं ईश्वरानें आपला पुत्र देण्याने आणि त्यांस पा-
ठिवण्याने त्याची प्रीति प्रगट केली आहे. योहान्नाने ये-
शूच्या प्रगट होण्याविषयीं ह्मणत असतां असें लिहि-
लें आहे कीं "बापाजवळील एक जनिताच्या गौरवासा-
"रिखें आह्मी त्याचें गौरव पाहिलें." ख्रीस्ताने आपल्या
बापासीं आपला स्वाभाविक संबंध त्याविषयीं असें
स्पष्ट ह्मटलें आहे कीं "मी बापांत आहें आणि बाप मा-

"झ्यांत आहे" पाउलस प्रेषिताने ईब्रीलोकांस पत्रांत अ-
सें लिहिलें आहे कीं "ईश्वराने ह्या शेवटल्या दिवसीं आ-
"ह्मास पुत्राकडून ह्मटलें आहे ह्याला अवघीं यांचा वतन
"धनी असें ठेविलें आहे आणि ह्याकडून भुवनें उत्पन्न के-
"लीं हा त्याचा गौरवाचें तेज व तत्वतेची प्रतिमा आहे आ-
"णि आपल्या सामर्थ्ये शब्दाकडून अवघीं वागवितो या-
"स्तव हा स्वतां पापाविषयीं आमची शुद्धता करून परम
"थोराच्या उजव्याकडे उंचामध्यें बसला आहे. कां हा दू-
"तांपेक्षां जेवढें उत्कृष्ट नाम असें वतन पावला आहे तेव-
"ढ्याने त्यांपेक्षां उत्तम आहे." असें असतां ख्रीस्त ईश्वरा-
चा पुत्र आहे असें आह्मी अवश्य समजावें आणि पूर्वीं
ह्मटल्याप्रमाणें त्या नावाचा अर्थ असा समजावा कीं बा-
पाचा आणि शब्दाचा अक्षय काळपर्यंत जो संबंध तो
त्या नामाने कांहीं प्रगट होतो. मनुष्यें आणि देवदूत दे-
वाने उत्पन्न केलेले आणि रक्षिलेले त्यामुळें ईश्वराचे
पुत्र आहेत आणि कुटुंबांत घेतल्यामुळें ख्रीस्तावर विश्वा-
स ठेवणारे देवाचे पुत्र आहेत परंतु ख्रीस्त अतिशय मो-
ठ्या संबंधाने देवाचा पुत्र आहे. जो बापाच्याच स्वभावा-
चा आहे जो बापाच्या केवळ प्रीतीचें पात्र आहे आणि
जो बापाच्या ऐश्वर्यास प्रसिद्ध करणारा आहे तो बापा-

चा पुत्र फार मोठ्या संबंधाने आहे असें मान्य केलें जावें. तो उत्पत्तीच्या संबंधाने किंवा त्यास साधारण रीतीने जन्म दिल्याच्या संबंधाने देवाचा पुत्र नाहीं परंतु स्वभावाच्या आणि वर्तणुकीच्या अक्षयत्वाने आणि केवळ एकत्र असण्याने तो ईश्वराचा पुत्र आहे. जो मनुष्यांचा तारणारा त्याजमध्यें ते सर्व अधिकार अवश्य असावे कारण जर तो ईश्वरी पुरुष नसला तर त्याच्याने एका मनुष्यालाहि तारवणार नाहीं. उत्पन्न केलेले पुरुष कसेहि ऊंच दीपचे आणि बुद्धिमान असोत त्यांस देवाच्या अभंग आज्ञेप्रमाणें आपल्या सर्व अंतःकरणाने देवाची प्रीति केली पाहिजे आणि आपल्या सर्व शक्तीने आणि सर्व बुद्धिने आणि सर्व आवकाशांत ईश्वराची सेवा केली पाहिजे त्या उत्पन्न केलेले लोकानी आपल्यास जें अवश्य केलें पाहिजे त्याहून अधिक करवत नाहीं ह्मणून त्याच्याने दुसऱ्याचें कर्ज फिटे असीं पुण्यादिक कामें करवत नाहींत.

आकाश देवाचें राहायाचें स्थान ह्यावरून नारायणरावाने जें अनुमान केलें आहे तें मान्य करायाजोगें नाहीं. मोरभट दांडेकरास म्या उत्तर दिल्हें त्यांत असें ह्मटलें आहे कीं ईश्वर सर्व व्यापक आहे आणि "तो आका-

शांत

शांत आपलें गौरव विशेष दाखवितो" हें नारायणरावाने पाहिलें नाहीं. त्या पवित्र स्थानीं देवदूत राहत असतात. ईश्वरास जरी त्याच्या सेवेचे अगत्य नाहीं तथापि तो त्याच्या द्वारें आपलें गौरव करितो आणि त्यांस सुख देतो.

ह्यावरच्या दूषणावरून पूर्वी सांगितल्याप्रमाणें हिंदूंच्या देवांचें दुर्बळपण आणि अशक्तपण यांचें स्मरण होतें. त्या शास्त्राप्रमाणें असें आहे कीं ते देव आपआपल्या ठिकाणींच बद्ध आहेत आणि जरी ते दुसऱ्या ठिकाणीं जायास इच्छितात तथापि त्यांच्याने आपलीं स्थानें सोडवत नाहींत. ते आपल्या शक्ती बरोबर रत असतात ह्याविषयीं फार अपवित्र आणि कंटाळवाण्या कथा आहेत. दैत्यानी कापट्य वेष धरिले तेव्हां विष्णूला जसें तें समजलें नाहीं त्याप्रमाणें ते आपल्या समोर काय होतें आणि आपणास काय अशक्य आहे हेंहि त्यांस समजत नाहीं. त्यांस वर्तमाने कळवायास नारदमुनी पाहिजे वर्तमाने लिहून ठेवायास चित्रगुप्त हवा आणि बृहस्पती उपदेश आणि मंत्र सांगायास असावा.

नारायणरावाने नव्या करारावर जीं दूषणें आणलीं तीं सर्व पांच म्या वर सांगितलीं आहेत आणि खोटीं ठरविलीं आहेत. तें पुस्तक टाकून तो प्रेषितांच्या कार्या-

वर

वर दोष ठेविनो.

१ त्याविषयीं लिहित असतां त्याला आश्चर्य वाट-
लें कीं ख्रीस्ती धर्म हिंदुस्थानांत इतका मागून प्रसिद्ध
झाला. त्याने असें ह्मटलें आहे कीं "जर ख्रीस्ती शास्त्र ख-
"रें आहें व त्यांत लिहिल्याप्रमाणें ईश्वर सर्व शक्ती व स-
"र्वहृदयांचा प्रेरक आहे तर येशू ख्रीस्त उत्पन्न झाला ते-
"व्हांच ईश्वराने सर्व पृथ्वीवर ख्रीस्ती धर्मोपदेशक पाद्री
"पाठवायाचे होते. या हिंदुस्थानांत सुमारें अठराशें व-
"र्षांनंतर पाठविलें आणि रुशिया, इराण, चीन, तुर्कस्थान
"आर्बस्थान एथें अद्यापिहि पाठविले नाहींत. यामुळें ख्री-
"स्ती शास्त्राप्रमाणें अनंतकोटि लोक नरकास गेले व पुढें-
"हि जातील. हा अन्याय त्यांकडे नाहीं कारण कीं त्यांस
"ख्रीस्ती धर्म ठाऊक नव्हता ह्मणून त्याचा उपाय नाहीं.
"ईश्वर तर सर्वशक्ती आहे त्यास पूर्वीच पाद्री पाठवून
"देण्यास सामर्थ्य होतें. दुसरें आतां जरी एथें पाद्री आ-
"ले आहेत. तथापि ईश्वर सर्व हृदयांचा प्रेरक असतां
"एथील लोकांच्या मनांत त्याचे उपदेश खरे असें आ-
"णून देत नाहीं यावरून दोहोंतून एक गोष्ट सिद्ध होती.
"एक ईश्वर निर्दय आणि कठोर आहे व लोकानी नरका-
"सच जावें असेंच त्याचे मनांत आहे किंवा ख्रीस्ती ध-
र्म

"र्म खोटा आहे ह्मणून पाद्री याणी धर्माचीं दुकानें घात-
"लीं असतांहि तो त्यांच्या व्यापारास आश्रय देत नाहीं-
"या दोन सिद्धांतातून ईश्वर निर्दय आहे ही गोष्ट सर्व
"शास्त्रांसीं व सर्व लोकांच्या प्रत्ययासीं विरुद्ध आहे ते-
"व्हां अर्थात् ख्रीस्ती धर्म खोटा आहे. आणि एथें पाद्री
"यांचे सजातीयांचे राज्य झालें ह्मणून ते अनेक प्रकार-
"च्या भुलथापी देऊन लोकांस बाटवायास या देशांत
"आले आहेत असें उघड सिद्ध होतें."

वरल्या विचारामधील वादास उत्तर देण्याच्या पू-
र्वी नारायणरावाला कांहीं गोष्टी नीट समजल्या नाहींत
ह्मणून त्याने त्या उफराट्या दाखविल्या आहेत त्याविषयीं
त्याला नीट समजाविलें पाहिजे ह्मणजे ख्रीस्ती धर्म ईश्व-
रनिर्मित असें त्याला प्रमाण स्पष्ट दिसेल.

येहुदा देशामध्यें ख्रीस्ताने ज्याकाळीं अवतार ध-
रिला तेव्हांपासून त्याचा धर्म प्रगट झाला असें केवळ
नाहीं. मनुष्यांचे पहिले पूर्वज आदाम आणि हवा यां-
स वचन दिल्हेलें होतें कीं ख्रीस्त येणार आहे आणि
कामाविषयीं आणि त्यापासून आशीर्वाद मिळणार
त्यांविषयीं त्यांस वर्तमान कळिवलें होतें. त्यांस आ-
णि त्यांच्या संततीस तसेंच नोहा आणि त्याचे पुत्र पृ-
थ्वी

थ्वी निर्माण झाल्यापासून १६६२ वर्षांनी जो जलप्रलय
झाला त्यांतून जे वांचले आणि ज्याजपासून ह्या जगांतील
सर्व लोक उत्पन्न झाले त्यांस देवाने असी आज्ञा केली कीं
आपल्या पापाकरितां आपण मरणास योग्य आहां अ-
सें चिन्हित व्हावयासाठीं आणि नियमित काळीं येशू पृ-
थ्वीवर उत्पन्न होऊन पाप्यांच्या उद्धारासाठीं आपला प्राण
देईल त्याच्या मृत्यूची प्रतिमा दाखवायासाठीं यत्न क-
रीत असावें. मनुष्यांस अन्याय करणें जर आवडलें नस-
तें त्यानी जर देवाचा मार्ग सोडला नसता आणि आपल्या-
स जर खोटे देव-नलावून घेतले असते तर देवाचा मित्र
आब्राहाम त्याच्या संततीवर जसा देवाचा आशिर्वाद हो-
ता तसा सर्व मनुष्यांवरहि असता. भक्तिवान् जे इस्राएल
लोक ज्यानी तारणाराच्या येण्याचा भरवसा धरिला हो-
ता आणि जे आनंदाने त्याची मार्गप्रतीक्षा करीत हो-
ते त्यांस देवाने जसें तारलें तसें तुह्मासहि तारलें असतें.

ख्रीस्ताने आपला प्राण देऊन मनुष्याच्या पात-
काचें जेव्हां प्रायश्चित घेतलें आणि जेव्हां तो आकाशा-
वर जाऊं लागला तेव्हां त्याने आपल्या शिष्यांस आ-
ज्ञा केली कीं जां सर्व लोकांस उपदेश करा आणि बा-
प पुत्र आणि पवित्र आत्मा याच्या नामाने बाप्तिस्मा
द्या.

द्या. ही जी ख्रीस्ताने आज्ञा केली ती सर्वांस लागती. ख्री-
स्ताने सर्वांचे कल्याण व्हावें असें चिंतून सर्व मनुष्यांस
आपल्या शिष्याच्या उपदेशावर सोंपलें. ख्रीस्ताने देश
अथवा रंग अथवा रीति अथवा कर्म अथवा पद्वी अथवा
शक्ती अथवा ज्ञान अथवा भोग हे भेद धरिले नाहींत. त्या-
ने येहुदा देशांत अवतार धरिला तेथें किंवा आसमंतातीं-
ल देशावर जसी दृष्टी ठेविली तसीच पृथ्वीच्या फार दूर-
देशीं आणि अगम्य भागावरहि दृष्टी ठेविली. ज्या लोका-
नी ज्ञान मिळवून आणि उत्तम बुद्धि धरून आणि कळा वि-
द्यांत प्रवीण होऊन तसेंच सर्व संपत्ती करूनहि आपलें
नाम फार विख्यात केलें त्यांस ख्रीस्ताने जसें मानिलें त्यां-
च सारिखें केवळ रानवट लोक ज्यांच्या रीती आणि नीति
केवळ ओंगळ ज्यांचे धर्म तर केवळ पशूंच्यांच धर्मा सा-
रिखे आणि ज्यांच्या शक्ती आणि देश केवळ अल्प त्या-
नाहि त्याने गणलें. सगळ्या पृथ्वीवरील मनुष्यें अपरा-
धांत दुःखांत आणि नाशांत पडलीं आहेत असें त्याने
पाहिलें आणि त्याने आज्ञा केली कीं येरूशालेमापासू-
न सगळ्या लोकांस पश्चात्ताप आणि पापाची क्षमा ह्या-
विषयीं उपदेश करा ख्रीस्ती धर्मातील विचार आज्ञा आ-
णि नियम केवळ सरळ ह्मणून सर्व मनुष्यांस यथास्थी-
त

त उपदेशिले असतां समजायास आणि सत्य मानायास यो-
ग्य असें ख्रीस्ताला वाटून त्याने तो धर्म सर्व मनुष्यास शिक-
वावा असी आज्ञा केली.

ख्रीस्त आकाशावर गेल्यानंतर कांहीं दिवसानी सर्व प्रेषित एकचित्त आणि एकास्थळीं असतां त्या सर्वां मध्यें पवित्र आत्मा संचरून त्यानेंच त्यांस वाचा दिल्ही असतां ते सर्व भाषा बोलूं लागले. मग ते आपले देशांतील इस्राएल लोकांस उपदेश करूं लागले. त्याच्या योगाने येशूला वधस्तंबावर देणाऱ्यांतून कितीएकानी ख्रीस्त खरा तारणारा आहे असें मान्य केलें. ह्याप्रमाणें येरूशालेमांत बहुत लोक आणि उपाध्याय त्या धर्माप्रमाणें आचरण करूं लागले. शेवटीं ते दुसऱ्या देशांत उपदेश करिते झाले. प्रेषितांस वाटलें कीं मूर्तिपूजक लोकहि उपदेशिले पाहिजेत ह्मणून ते त्यांच्या उद्धारासाठीं श्रम करूं लागले. ख्रीस्ताचें अपार हीत मूर्तिपूजकांस मिळावें ह्मणून पवित्र आत्म्याने सुख्यत्वें पांउलसाला आणि बार्नाबसाला वेगळें केलें. परंतु त्या प्रेषितांतून कोणीहि आपल्या धन्याची आज्ञा विसरला नाहीं किंवा ती मान्य करायास विसरला नाहीं. मार्कस प्रेषिताने असें ह्मटलें आहे कीं "प्रभु त्यांसह वर्तमान "कार्य करीत असतां आणि वाक्यांस अनुलक्षून राहिले

असे

"असे जे साक्षात्कार त्यांच्या योगानें त्या सत्य करीत अस-
"तां त्यानी निघून सर्व ठिकाणीं घोषण केलें."

मनुष्यांस ख्रीस्ताकडे वळवायास ते कांळीं अवकाळीं फार झटले. ख्रीस्ती धर्म शोधायास जे समर्थ होते त्यांस आणि जे केवळ मूढ होते त्यांसहि त्यानी त्या धर्माचा उपदेश केला. मित्रांस तसेंच शत्रूंसहि त्यानी सत्य धर्म प्रगट केला. सभेमध्यें थोरांस आणि लाहानांस त्यानी स्वकार्य विदित केलें. स्वदेशांतील किंवा परदेशांतील लोकांस उपदेश करायास ते विसरले नाहीं. बंदिवान आणि मोकळे श्रीमंत आणि गरीब, रानवट आणि सुधारलेले अशा प्रकारचे लोकांस त्यानी उद्धार होण्याचा मार्ग प्रसिद्ध केला. देवळांत खोल्यांत दरबारांत रस्त्यांत बाजारांत शेतांत गलबतावर आणि बंदीशाळांत त्यानी देवाकडे अंतःकरण फिरवायास आणि ख्रीस्तावर विश्वास धरायास उपदेशिते झाले. येरूशालेमांत आंटियखांत लुस्त्रामध्यें एफेससामध्यें आंथेनैसांत रोमशहरांत आणि अणखीहि बहुत ठिकाणीं त्यानी उद्धार पावण्याचें शुभवर्तमान उपदेशिलें त्यांजवर जींजीं संकटें पडलीं त्याहींकरून ते उदासीन झाले नाहींत. मनुष्यास केवळ उपद्रव होण्याजोगीं विघ्नें आणि प-

रम

रम संकटें त्यांचें धर्म अथवा स्फुरण किमपि उणें करूं सकत नाहीं. ते केवळ मरणासच नेमलेले असे दिसूं लागले पृथ्वीवरील मनुष्यांस आणि देवदूतांस केवळ आश्चर्यकारक झाले ख्रीस्तासाठीं केवळ वेडे ह्मटले गेले भूक ताहान सहन करूं लागले नग्न राहिले आणि बुक्यानी मारले गेले राहायासहि ठिकाण त्यांस नव्हतें हाताने श्रम करूं लागले परंतु ते देवावर अगदीं कुरकुरले नाहींत. जे त्यांस शिव्या देत त्यांस ते आशिर्वाद करीत. जे त्यांस मारीत त्यापासून ते सहन करीत. जे त्याची अपेक्षा करीत त्याजसाठीं ते प्रार्थना करीत. ते पृथ्वीवरील सूख शोधीत नव्हते. आणि जगांत कीर्ती किंवा सामर्थ्य वाढवायास ते इच्छीत नव्हेते. त्यानी अशक्तांची दुःखें सहन केलीं आणि आपणासच संतुष्ट करायास पाहिलें नाहीं. त्यानी सत्य केवळ सत्य आणि सत्याव्यतिरिक्त काहींच उपदेशिलें नाहीं. अप्रमाणीकपणा सोडून त्यानी कृत्रिम बुद्धी धरिली नाहीं. अथवा कापट्याने ईश्वराचें वाक्य सांगितलें नाहीं. परंतु सत्यप्रसिद्ध करून ईश्वराच्या समोर त्यानी मनुष्यांचे अंतःकरणांत आपणाविषयीं चांगला भाव उत्पन्न केला. धर्मावर ठपका येऊनये ह्मणून त्यानी कोणत्याहि प्रकारें कोणास दुखविलें नाहीं

परंतु

परंतु धैर्येंकरून बंदिशाळेंत गलबल्यांत पाहारा करण्यांत उपासांत पवित्रतेंकरून ज्ञानेंकरून सहनशीलतेकरून ममतेने पवित्र आत्म्याने निष्कपट प्रीतीने सत्यवचनाने ईश्वराच्या शक्तीने उजव्या डाव्या हातांत पवित्रतेचीं शस्त्रें धरल्याने मान अपमानाने दुष्कीर्तीने अथवा सुकीर्तीने ठक वाटूनहि प्रमाणिक अज्ञात असूनहि ज्ञात मरत असतां पाहा ते वांचले मारलेगेले आणि जिवें मारले गेले नाहींत दुःखी असूनहि सर्वदां आनंदी गरीब असूनहि बहुतेकांस मातबर करणारे आणि जवळ कांहीं नसतां सर्व पदार्थ असणें ह्याप्रमाणें सर्व गोष्टींत आपण ईश्वराचा धर्मोपदेशक असें दाखिवलें.

त्याप्रमाणें त्यानी देवाच्या आज्ञा मान्य केल्या ह्मणून त्यांस देवाचा आशीर्वाद मिळाला. ते त्याच्या धर्माचा उपदेश करिते झाले आणि देवाने त्याविषयीं प्रमाण दाखविलें धर्माच्याठायीं अविश्वास ठेवणारे जे येहुदी लोक त्यांचा दीर्घद्वेष रोमी लोकांच्या लश्कराचें मोठें भय आणि अनिवार विषयासक्तपणा यांच्या प्रतिबंधाने त्या प्रेषितांच्या कार्यास अडथळा झाला नाहीं. त्यानी गर्विष्ठ विद्वान लोकांची खोटीं मतें आणि दांभिक पांडित्यें खंडन केलीं आणि देवस्की व कौल लावणें याहीं करून

लोकांस

लोकांस ठकवीत असत तीहि मोडून टाकलीं. राज्यांतील सर्व अधिकारी लोक आणि सगळ्या पृथ्वीवरील ज्ञानी आपल्या कुत्सित स्वभावामुळें ज़री धर्मांतील भलभलत्या गोष्टी आणि खोटीं मतें खरीं मानीत असत तथापि बहुत ठिकाणीं त्या प्रेषितानी देवाच्या सहायानें त्यांचें छेदन केलें. बहुत देशांत जेथें सैतानाचा सन्मान होता तेथें त्यानी ख्रीस्ती धर्म स्थापित केला आणि तेणेंकरून पाप्यांस तारणाराजवळ आणिलें. सैतानाच्या भयंकर बंधनांत अत्यंत धिःकारलेले जे लोक होते त्यांस त्यानी त्या बंधनापासून सोडवून त्यांच्या अमर आत्म्यास योग्य अशा पदीस त्यांस चढविलें. रक्तबोंभाळ बळी देण्याचीं स्थानें धिःकार करायास योग्य अशामूर्ती आणि अपवित्र देवालयें त्यांच्या विजयी गमनापुढें नाशाप्रत पावलीं. त्यानी बळिष्ठांपासून निर्बळांचें रक्षण केलें आणि पापांत बंदिवानांस मोकळें केलें. क्रूरतेचीं ठिकाणें फिरवून पवित्रतेचीं ठिकाणें केलीं ज्या स्थानीं रानवटपणा युद्धें क्लेश आणि दुष्टपणा होता तेथें भलेपणा स्वस्थता सुख आणि नीति निर्माण केलीं. त्यांच्या योगानें ख्रीस्ती धर्माचा प्रसार झाला म्हणून तो ईश्वरनिर्मित धर्म आहे असेंहि एक खचित

प्रमाण

Oriental MSS. Library,
P.O., Madras

प्रमाण आहे. ख्रीस्ती धर्म कसा निर्माण झाला आणि त्याचा कसा प्रसार झाला याचा शोध व्हायास उपाय होते. आणि त्याविषयीं शोध करायासहि फार कारणें होतीं असें असतां जर तो धर्म असत्य असता तर त्याजवर लोकांचा विश्वास कसा बसता आणि जर तो ईश्वराच्या इच्छेप्रमाणें नसता तर त्याचा इतका फारजय होणें अशक्य होतें.

म्या सांगितल्याप्रमाणें ज्या देशांत ख्रीस्ती धर्माचा जय झाला त्यांत इराण तर्कस्थान आणि आर्बस्थान हेहि देश होते. त्या देशांत सांप्रत जें अज्ञान आणि नीचत्व आहे त्याचें कारण पूर्वीं त्यांस ख्रीस्ती धर्म बराच अवगत होता परंतु त्याचें त्यानी मनन केलें नाहीं आणि त्यांतील आज्ञेप्रमाणें वागले नाहीं. रूस देशांतील मोठ्या भागांत ख्रीस्ती धर्मच चालविला आहे. हिंदुस्थानांतहि ख्रीस्ती धर्म पूर्वींच आणला होता. ख्रीस्ती धर्मांतील बहुत प्राचीन लिहिणारानी असें म्हटलें आहे कीं थोमास आणि बार्थलम्ये हे ख्रीस्ताचे शिष्य ख्रीस्त उपदेश करीत असतां जवळच होते त्यास ख्रीस्तानें आपले प्रेषित नेमिले असतां त्यानी हिंदुस्थानांत येऊन ख्रीस्ती धर्माचा उपदेश केला. त्याच ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं थो-

मास

मास प्रेषित मद्रासेजवळ कलामिना नामें जो पर्वत ह्मणजे मलयपुर तेथें मरण पावला तेथें अज्ञान ख्रीस्ती लोक अद्यापि धर्मपुरी असें समजून जात असतात. पांतिनस नामें एक ख्रीस्ती धर्मानुसारी सन १८० मध्यें होता तो हिंदुस्थानांत आला होता तेव्हां एथील ख्रीस्ती धर्मानुसारी लोकांजवळ माथीचें पुस्तक होतें तें त्याने पाहिलें. थेओफिलस नामक ख्रीस्ती सन ३२५ मध्यें नीके शहरांतील सभेंत गेला होता तो गुजराथेंतील दिवगावांत जन्मला होता. त्या सभेंत योहान्नेस नामक एक धर्माध्यक्ष होता तो मोठें हिंदुस्थान आणि इराण एथील धर्माध्यक्ष असें लिहिलेलें आहे. एदेसागावांतील फ्रुमेंतिअस त्याच काळीं हिंदुस्थानांत ख्रीस्ती धर्मोपदेश करीत होता त्याने बहुत लोकांस ख्रीस्ती धर्मानुसारी केले आणि तो शिकंदऱ्या आणि मिश्रदेशांत गेला तेव्हां त्याला धर्माध्यक्ष नेमिला होता. तो पुनः हिंदुस्थानांत आला तेव्हां त्याने बहुत ख्रीस्ती देवालयें बांधिवलीं. ख्रीस्ती साहाशें वर्षांवर आश्शूर देशांतून ख्रीस्ती लोक एथें येऊन बहुत हिंदूंस आपल्या धर्मास लाविते झाले. कोसमास नामक पुरुष ख्रीस्ती सन ५२२ मध्यें यां देशांत आला होता त्याने लंकेमध्यें आणि किलानामध्यें ख्रीस्ती देवालयें होतीं असें ह्मटलें आहे.

आहे. कालिकोट एथील पहिला वसिवणारा सेरन फिरुमल नामक त्याने सन ५०० वर्षांवर ख्रीस्ती लोकांस आपल्या राज्यांत बहुत अधिकार देऊन उत्तम पदवींत मानिले होते. त्या काळापासून मलबाराकडील ख्रीस्ती लोकांचा वृत्तांत यथास्थित अवगत झाला आहे. प्रस्तुत ते लोक बहुत आणि प्रतिष्टीत आहेत. बेबर साहेबाने लार्डांच्या गृहांतील निवडक सभेंत साक्षी दिल्ही त्यांत ते लोक १००००० एक लक्ष आहेत असा आकार केला आहे आणि असें ह्मटलें कीं "त्रावांकूर आणि कोंची एथी-
"ल राज्यामध्यें इतरांपेक्षां ते लोक फार उत्तम आहेत.
"ते लोक फार उद्योगी नीतिवान आज्ञेप्रमाणें वागणा-
"रे आणि बहुतेक द्रव्यवानहि आहेत."

ही गोष्ट निःसंशय खेद मानायाजोगी आहे कीं ख्रीस्ताच्या शिष्यांस देवाने आज्ञा आणि वचन दिल्हें असतांहि त्यानी ख्रीस्ती धर्म वाढिवण्यास इतके थोडे श्रम घेतले. अणखी हेंहि वाईट वाटायाजोगें आहे कीं ज्यांस ख्रीस्ती धर्म अवगत आहे ते त्याविषयीं इतके उदासीन आणि त्यांतील विचार करायास एवढे थंड आहेत आणि त्यां धर्माचें सत्यत्व मान्य करीत नाहींत. ज्यांस ख्रीस्ती धर्माचें ज्ञान नाहीं किंवा

तें

तें मिळवायास अनुकूलता नाहीं ते मेल्यावर अपराधी ठरतात ह्याचें कारण त्यांस ख्रीस्ती धर्म माहीत आहे असें नाहीं. परंतु त्यांच्या कुत्सितपणाकरितां आणि कांहींच अन्याय करूं नको असी आज्ञा देवाने मनुष्यांच्या अंतःकरणांत लिहून ठेविली असतां तिचा भंग करितात ह्मणून ते अपराधी ठरतात.

वाचणारानी वरले विचार ध्यानांत ठेवावे. आतां नारायणरावाला त्याच्या वादाचें उत्तर. त्याने असें अनुमान केलें आहे कीं ख्रीस्तीधर्म जर खरा असता तर दयाळू ईश्वराने इतक्या थोडया लोकांस दिल्हा नसतां आणि एकटया थोडयांच्या अंतःकरणांत बिंबित केला नसता.

१ पहिल्याने मी असें उत्तर देतों कीं ईश्वराने कोणतें एक शास्त्र कोणी मनुष्यास प्रगट करावें हें त्याला आवश्यक आहे असें कोणी नह्मणावें.

आह्मी सर्व पापी आहों यांत कांहीं शंका येणार नाहीं. आमच्या अपराधांविषयीं प्रमाण नीट आणि सुबोध आहे आणि तें खोटें ठरविणें अशक्य आहे असें समजून आह्मास मान्य केलें पाहिजे कीं आह्मी ईश्वराच्या रागास पात्र आहों आणि देवाची कांहींच कृपा आह्मास योग्य नाहीं ह्मणून आह्मी असें समजावें कीं देवाने आपलें

शास्त्र

शास्त्र प्रगट करावें इतक्या दयेस आह्मी योग्य नाहीं. आह्मास एथें लिहिणें अगत्य आहे कीं स्वाभाविक धर्माच्या मताप्रमाणेंहि आह्मी आमच्या आपल्या स्थितींत आहों असें बहुधां नाहीं. ईश्वराने निरंतर आपल्या चांगुलपणाप्रमाणें आमच्या प्रथम पूर्वज्यांस पापरहित उत्पन्न केलें आणि जें पाप होत आहे तें निःसंशय मनुष्यापासून आहे. यास्तव ईश्वराने आह्मावर दया करावी असें देवाकडे कांहीं उरलें नाहीं. ईश्वर आह्मास स्वाभाविक अज्ञानांत ठेवितो आणि आह्मास स्वाभाविक दुःख भोगायास लावितो असें अनुमान करून आह्मी देवाकडे दोष लावूं सकत नाहीं. जो उपदेश आह्मी विसरलों तो आह्मास पुनः कळवायास आणि पापांतून मुक्त व्हायाचा मार्ग दाखवायास जर देवाने दया केली तर ती आपल्या महत् कृपेने करील तरच करील.

२ . वरल्या विचारावरून असेंहि सिद्ध होतें कीं ईश्वर जर शास्त्र प्रगट करितो तर त्याने तें सर्व मनुष्यांस विदित करावें असें त्याला आवश्यक नाहीं.

ईश्वरानें आपलें शास्त्र प्रगट करावें हें जर त्याला आवश्यक नाहीं तर त्याने तें सर्व मनुष्यांस परिचित करावें हेंहि त्याला आवश्यक नाहीं. न्यायाधीश

न्याय

न्याय ठरवितांना कोणास माफ करितो अथवा माफ करीत नाहीं तो खराच आहे त्याजवर कोणाच्यानें आरोप आणवत नाहीं. जर कांहीं दावा किंवा करार नाहीं तर तो द्यायास अथवा घ्यायास समर्थ आहे.

ईश्वराने कांहीं तरी शास्त्र प्रगट केलें आहे ह्यावर नारायणरावाच्या दूषणोने आरोप येतो हें त्याच्या लक्ष्यांत नाहीं असें दिसतें कारण कीं ईश्वर निर्मित ग्रंथ असे ह्मणवितात तेहि सगळ्या पृथ्वीवरील लोकांस मान्य नाहींत अथवा परिचितहि केलें नाहींत. स्वाभाविक धर्मांतील जीं फारच हितावह मतें तींहि हजारों लोकांस माहित नहोतां ते मरण पावतात हें नारायणराव विसरला. सृष्टींतील अनीतिवंत आणि नीतिवंत प्राणि याविषयीं सगळा सिद्धांत तो चुकून गेला. प्रकृति चित्तविषय मनाच्या शक्ती आणि उत्तम होण्याचे उपाय इत्यादिक ईश्वराचीं मनुष्यांस देणी केवळ असमान आहेत. कितिएकांस तीं बहुत दिल्हीं आहेत कितिएकांस नेमस्त आणि कितीएकांस थोडीं दिल्हीं आहेत. रोग बरे होण्याचे अमुक उपाय सृष्टींत आहेत परंतु उत्तरोत्तर अथवा काहींसे प्रसिद्ध होतात. जर नारायणराव आपल्या मताप्रमा

णें

णें विचार करील तर त्याने पुढें होऊन स्थापित करावें कीं रसायन विद्या त्याच्या वडिलांस माहित नव्हती ह्मणून तें खोटें आहे. ख्रीस्ती धर्माचें प्रमाण त्याने शोधावें आणि त्याप्रमाणें त्याचा निवाडा करावा हा त्याचा धर्म आहे.

ज्यावादाचा म्या वर विचार केला आहे तेणेंकरून नारायणरावाने आपल्या हिंदूधर्मासहि दोष लाविला आहे. हिंदूधर्म इतर धर्माच्या लोकांस आपल्यांत मिळवून घेणार नाहीं. त्यांतील आज्ञा आणि मतें याहींकरून तो भरत खंडांतील लोकांस मात्र आपल्यामध्यें मिळवून घेतो. त्यांत असें ह्मटलेलें आहे कीं म्लेंछांतील कोणी मनुष्याने जरी हिंदूधर्म स्वीकारिला आणि त्यांतील सर्व मतांवर विश्वास धरिला तथापि त्यास मोक्ष मिळणार नाहीं. यांत असें लिहिलें आहे कीं म्लेंछ लोक आपल्या जातीमुळें उद्धार होण्यास योग्य नाहींत. एक अथवा अनेक पापामुळेंच ते दुसऱ्या देशांत जन्म घेतात त्यांची क्षमा याजन्मांत होतनाहीं. वास्तविक हिंदूधर्म देवाने ह्मणून मनुष्यासाठीं दिल्हेला नाहीं. तो धर्म सगळ्या पृथ्वींतील परिचित नाहीं ह्मणून मी तसें ह्मणतों असें नाहीं परंतु त्याचें कारण असें आहे कीं जे त्या धर्माचा स्वीकार

करितील

करितील त्यानाहि तो आपल्यांत मिळवून घेत नाहीं. इत-
कें बरें आहे कीं तो धर्म दुसऱ्या लोकांस आपल्यांत मिळवू-
न घेत नाहीं. तो धर्म आपल्या मर्यादेंत जेथजेथें पसरले-
ला आहे त्यासर्व ठिकाणीं त्याच्या योगाने नीतीचा केवळ
नाश झालेला आहे त्याने मनुष्याची बुद्धि भ्रष्ट केली स्वा-
भाविक धर्माचीं तत्वेंहि विपरीत केलीं मनुष्यांचें अंतःकर-
ण अधिक कुत्सित केलें आणि दुराचरणाची फार वृद्धी के-
ली.

२ . आपल्या ग्रंथाच्या वाचणारानी ख्रीस्ती धर्माचा द्वे-
ष करावा अशा बुद्धीने नारायणरावाने पाद्रींच्या खर्चावि-
षयीं आणि श्रमाविषयीं सुचिवलें आहे. "पाद्री याणी आ-
"जपर्यंत बहुत द्रव्य खर्च करून व श्रम करून त्यांचे उद्यो-
"ग किती सफळ झाले हें त्यांचे लक्षांत असेलच. किती वि-
"द्वान हिंदूंनी आपला धर्म टाकून आजपर्यंत ख्रीस्ती ध-
"र्म घेतला आहे हा त्यानी विचार करावा आणि एथील
"लोक न्यूझीलंड व अमेरिका एथील आरण्यक पशुतु-
"ल्य लोकांसारिखे सहज बाटले जाणार नाहींत आणि
"त्यांची शास्त्रें सर्व विषयेंकरून परिपूर्ण आहेत हें पक्कें
"लक्ष्यांत ठेवावें."

वर लिहिलें तें कसेंहि असो परंतु मला निश्चय वा-

टतें

टतें कीं नारायणरावाची खातरी आहे कीं ख्रीस्ती धर्मा-
मुळें ज्ञानप्रसिद्धी तसाच लोकांच्या मनांतील ख्रीस्ती ध-
र्माचा विश्वास आणि कितीएकानी तर तो धर्म घेतला
हें इतकें फार होत चाललें आहे कीं तें नारायणरावाला
किंवा त्याच्या मित्रांस चांगलें वाटत नाहीं अथवा हिंदू ध-
र्मावर लोकांचा जसा पूर्वी विश्वास होता तसा राहायास
अवघड पडतें. त्याला माहित आहे कीं बहुत शहरांत
आणि खेड्यांत ख्रीस्ती धर्मोपदेशकाने जें शिकविलें
आणि लिहिलें तें व्यर्थ गेलें नाहीं. नारायणरावाला मा-
हित आहे कीं जरीं कोणी जाणून आणि कोणी नजाणू-
न ख्रीस्ती धर्मास प्रतिबंध करितात तथापि तो धर्म वा-
ढत चालला आहे. त्याला माहित आहे कीं हिंदुस्थाना-
च्या दक्षिणभागीं ख्रीस्ती धर्म आलिकडेस जय पावला.
यास उदाहरण नैयुर गावांमध्यें ९८९ कुटंबें ह्मणजे ३६६७
मनुष्यें ख्रीस्ती धर्माप्रमाणें चालतात. गतवर्षी त्याच प्रां-
तांत २८९ कुटुंबानी मूर्तिपूजन सोडून दिल्हें नागरका-
ईलमध्येंहि तसाच जय झाला आहे आणि त्या प्रांता-
च्या आसमंतांतील १६० शहरांत आणि गावांत ह्या दे-
शांतील ज्या लोकानी ख्रीस्ती धर्म घेतला आहे त्यांचे
समुदाय आहेत त्रिनावल्लीच्या आसमंतात ११०००

ख्रीस्ती

ख्रीस्ती लोकांची प्रजा आहे.

कदाचित हें सत्य असेल कीं अद्यापि थोड्या विद्वान हिंदूनी ख्रीस्ती धर्म स्वीकारला आहे तरीं त्यांचें कांहींच आश्चर्य नाहीं. हिंदूलोकांत विद्वान थोडेच आहेत. जो अधर्म होत आहे तो नेहमी चालवायास त्यांस फार चिंता लागली असती त्यांस आपल्या विद्येचा फार गर्व असतो दुसऱ्या देशांतील विद्यांचा धिःकार केल्याने त्याचीं मनें लहान झालीं आहेत. आणि सत्याचा शोध करायास ते फारसे झटत नाहींत परंतु कांहीं फार विद्वान लोक त्यानी ख्रीस्ती धर्म घेतला आहे आणि आपल्या आचरणें करून आणि भाषणेंकरून त्या धर्माला शोभा आणिली आहे. त्यांतील कांहीं एक पुरुषांविषयीं मी कळवितों. तेणेंकरून धर्म पालटल्याचा प्रकार आणि म्या जें आतां ह्मटलें तें स्पष्ट समजून येईल.

कार्न एथील मागील लिहिणाराने असें ह्मटलें आहे कीं "तंजोर एथील ज्या लोकानी ख्रीस्ती धर्म घेतला "आहे ते फार संभावित लोक आहेत त्यांतून बहुतेक "उत्तम प्रतीचे आहेत." तेथील माझ्या एक मित्राने साक्षी दिल्ही ती असीच होती.

त्रांकिबारमध्यें पहिल्याने मुदाली आपा याने ख्री-

स्ती

स्ती धर्म घेतला त्याचा आजा त्या देशाचा राजा होता आणि बाप बराच मातबर होता. तो ग्रहस्थ हिंदूशास्त्रांतील वेदशास्त्रांत चांगला गम्य होता. आणि त्याने ख्रीस्ती धर्म स्वीकारिल्या नंतर त्याला ज्या ज्या लोकांबरोबर प्रसंग घडला त्यांस त्याने उत्तम आचरण दाखविलें. त्याच प्रांतांत एक विद्वान हिंदू जो प्रसिद्ध कवी होता त्याने ख्रीस्ती सन.१७१९ मध्यें ख्रीस्ती धर्म धरिला. त्यामध्यें सत्यज्ञानाचा प्रकाश फार झाला आणि त्याने ह्मटलें कीं पुराणांत कांहीं नाहीं परंतु सर्व लबाडी सांगितल्या आहेत. त्याला त्याचे सख्या सोयऱ्यानी फारच प्रतिबंध केला तथापि त्यांतूनहि त्याने ख्रीस्ती धर्म धरिला आणि त्याप्रमाणें आचरण केलें. १७६९ मध्यें तशाच एका मनुष्याने ख्रीस्ती धर्म धरिला. तो मनुष्य उत्तम वर्णाचा होता. आणि तो हिंदूशास्त्रांत बराच प्रवीण होता आणि त्याने चार वर्षे विचार केल्यानंतर ख्रीस्ती धर्म स्वीकारिला. आरण्यस्थल नामक एका संन्याशानें ख्रीस्ती धर्म धरिला त्याचें वर्तमान फार चमत्कारीक आहे. तो नामांकीत गुरूजवळ पांच वर्षेपर्यंत पढला होता आणि विद्वान आणि विख्यात उपाध्याय झाला होता. हिंदूशास्त्रांतील वेडेपणा आणि बीभत्सपणा याहीं-

करून

करून त्याला त्या शास्त्राविषयीं कांहीं संशय वाटूं लागला.
पुढें त्याला कदलूर गावांत ख्रीस्ती धर्माचें ज्ञान झाल्याव-
र त्याच्या बुद्धीला तो धर्म आवडला इतकेंच नाहीं परंतु
त्याचें अंतःकरण आणि हृदय समाधान पावलें. त्याने
खरें शास्त्र मान्य केलें आणि प्रसिद्ध रीतीने ख्रीस्ती धर्मा-
प्रमाणें चालूं लागला तो नवीन मत धरून आचरतो हें पा-
हून धर्मपूर एथील संन्याशांच्या मठांतील पुरुषांस फार
क्लेश झाले आणि त्याने तो धर्म सोडून द्यावा ह्मणून त्या-
नी त्याला पुढलें पत्र लिहिलें आहे. “शिव जो निर्माण क-
“रणारा रक्षणाकरणारा आणि संहार करणारा त्याच्या कृ-
“पेने आरण्यस्थल याच्या आत्म्याला बोध होवो. तुला आ-
“ह्मी कशास्तव पत्र लिहिलें आहे हें जर विचारसील त-
“र असें समज कीं तूं काशीपुण्यक्षेत्रीं जाण्यास मार्गा-
“टन करीत असतां पाहा कीं कृत्रिम पिशाचाने तुझ्या
“थोर ज्ञानास आणि बुद्धीस भ्रंश केला आणि हलके आ-
“णि नीच असे जे फिरंगी आणि विलायती लोक अंत्य-
“जाहूनहि वाईट त्यांजवळ जाऊन त्यांच्या धिःकारयो-
“ग्य धर्माचें श्रवण करायास आणि उपदेश करून घ्या-
“यास तूं कदलूर एथें गेलास तेव्हां तुला कांहींच ला-
“ज वाटली नाहीं. तुझी असी अवस्था ऐकून आह्मा-

स

“स किती दुःख झालें. आह्मी तें वर्तमान ऐकतांक्षणीं सं-
“न्याशांच्या मुख्य शाळेंत एकत्र मिळालों आणि तुझ्या-
“विषयीं विचार करूं लागलों. खरें आह्मी दुःखाच्या साग-
“रांत बुडालों आहों तुजसारिख्या सूज्ञ मनुष्याप्रत ब-
“हुत शब्द लिहिण्याचें अगत्य नाहीं. जर तूं नीच लोकां-
“त जन्मला असतास तर बहुत शब्द लिहिणें प्राप्त हो-
“तें. आरण्यस्थला पाहा कीं कोणी राजा जसा अंत्यज हो-
“तो तसी तुझी अवस्था झाली आहे आह्मामध्यें तुझा का-
“य उणें होतें? तुला सन्मान आणि जीविका पाहिजे ति-
“तकी नव्हती काय? संन्याशाच्या प्रतिष्ठेस असा बट्टा
“लावण्यांत तुझा काय हेतु होता तो कळत नाहीं. त्वां पू-
“र्वजन्मीं कांहीं पातक केलें असेल ह्मणून तुला हा अनर्थ
“प्राप्त झाला असें वाटतें. आरण्यस्थला विचार कर कीं
“तुंडमारच्या उत्तम वर्णांत तूं जन्मलास. अति नीच लो-
“क जे गोमांस खातात त्यांजमध्यें तूं राहतोस. त्यां लो-
“कांमध्यें कांहीं तरीं ज्ञान आहे? तुला हें पत्र पोंहचतांच
“तूं एथें माघारा ये. शिव तुला ज्ञान देवो” ह्या पत्राला आ-
रण्यस्थलाने उत्तर दिल्हें तें असें कीं “परात्पर वस्तू यहो-
“वा जो जिवंत देव जगांचा उत्पन्नकर्ता आणि रक्षिता त्या-
“च्या कृपेने धर्मपूर एथील सगळ्या संन्याशांचे आत्मे
भरोत.

“भरोत. तुमचें पत्र मला पावलें आणि तें वाचून मला सद्ग-
“द दया आली. त्याचें कारण कळावें तें असें कीं तुह्मी जिवं-
“त देव जो सर्व वस्तूंचा नित्य उत्पन्न करणारा त्याला तुह्मी
“व्यर्थ सोडून दिल्हें आणि त्याला जो सन्मान योग्य तो नि-
“र्माण केलेल्या वस्तूला दिल्हा आहे. तुह्मी केवळ अतिमूर्ख-
“पणांत जरी पडले आहां तरीं आपण शाहणें ह्मणवितां. सै-
“तान जो सर्व चांगल्या गोष्टींचा द्वेष करितो त्याची तुह्मी आ-
“राधना करितां. मनुष्यें जीं आईबापापासून जन्मलीं आ-
“णि ज्यानी आपल्या आयुष्यांत व्यभिचार कर्में ठकपण
“आणि हत्या प्रसिद्ध रीतीने केल्या त्यांस तुह्मी देवाचा स-
“न्मान देतां. तुमच्या शास्त्रांत इतक्या अतिबीभत्स गो-
“ष्टी लिहिल्या आहेत कीं काम जो सैतानाचा अग्नी तो ए-
“काक्षणांत चेतला जातो. माझें हृदय मजमध्यें विरघ-
“ळतें. मी तुह्मासाठीं खेद पावतों. चवदा वर्षांपर्यंत म्या तु-
“मच्या अमंगळ देवालयांतील अमंगळ पूजा पाहिल्या आ-
“हेत आणि माझ्या अंतःकरणाची खातरी झाली आहे
“कीं जो मार्ग सरळ नर्काकडे आणि नाशाकडे नेतो त्यां-
“त तुह्मी आहां. ख्रीस्ती लोकांच्या धर्मपुस्तकांत जो देव
“सांगितला आहे तो किती पवित्र आणि किती मोठा
“आहे. तुह्मी त्यांस नीच आणि अज्ञान ह्मणतां तें सै-
तानाची

“तानाचा गर्वरूप जो आत्मा त्यामुळें तसें ह्मणतां. माझ्या प्रि-
“य मित्रांनो या आणि ज्या देवाने तुह्मास केलें त्याची मज-
“बरोबर आराधना करा. लिंगाला धुण्याने आणि त्यासा-
“ठीं होम करण्याने पाप जातें असें समजून ठकूं नका. ईश्व-
“राला योग्य असें प्रायश्चित्त ख्रीस्ती लोकांमध्यें मात्र आहे.
“जेव्हां मी तुमच्यां अंधत्वाचा विचार करितों तेव्हां मा-
“झ्या अंतःकरणांत तुमची दया येती. तुह्मी माझा प्रामा-
“णिकपणा जाणतां तुह्मी मजविषयीं दोषाची गोष्ट कधीं
“ऐकिली नाहींत. तर माझ्या वडिलांचा धर्म खोटा आ-
“णि फार नाश करणारा आहे असी माझी खातरी झा-
“ल्यावांचून म्या तो सोडला असें तुह्मास मग वाटतें का-
“य? अनंत दयाळू ईश्वराने मला मोठ्या पाप्याला सैता-
“नाच्या पाशांतून सोडविलें. तुह्मी मला प्रतिष्ठा आणि
“द्रव्य द्यायास वचन देतां त्याचें मला कांहींच वाटत ना-
“हीं. मला सदोदित राज्याची आशा आहे. तुह्मी जर प-
“श्चात्ताप पावाल तर तुह्मालाहि तें मिळेल म्या आपला
“धर्म बदलला परंतु जाती बदलली नाहीं. ख्रीस्ती झा-
“ल्याने मी इंग्रज झालों नाहीं. मी अद्यापि तुंदमार आ-
“हे. एथील उपाध्यायाने मला स्वजातीचे विरुद्ध कां-
“हीं करायास सांगितलें नाहीं. त्याने मला गोमांस भ-
क्षाया-

“क्षायास सांगितलें नाहीं त्यांत जरीं कांहीं पाप भाहीं तरीं “मीहि त्याला किंवा कोणीहि तामली ख्रीस्ती लोकांस गोमांस खातांना पाहिलें नाहीं. जिवंत देवाकडे फिरा असें आरण्यस्थल जो पूर्वीं संन्यासी होता परंतु आतां समर्थ ख्रीस्ताचा शिष्य आहे तो लिहितो.”

बलारीमधील रेवरेंड मेस्तर रीड साहेबाने कृष्णापानामक ब्राह्मण ज्याने ख्रीस्ती धर्म धरिला होता त्यांविषयीं विचार करायाजोगें वर्तमान अलीकडेस छापलें होतें. तो तरुण आणि फार बुद्धिमान आणि विद्या संपन्न होता. त्याने बहुत ठिकाणीं फार शोध केल्यानंतर ख्रीस्ती धर्म ईश्वरनिर्मित आहे असी त्याची खातरी झाली. त्याची बुद्धि अभिमानेंकरून आच्छादित झाली होती ती पवित्र आत्म्याकडून सप्रकाश झाली. त्यास त्याचे अपराध निर्बळपण आणि क्लेश दिसूं लागले. खऱ्या देवाला संतुष्ट करायास आपलें पुण्य केवळ अल्प आहे मूर्तिपूजन मूर्खत्व आणि पाप आहे आपल्या बापाने उद्धार होण्यासाठीं ज्या उपायावर आशा धरिल्या होत्या ते सर्व व्यर्थ आहेत असी त्याची खातरी झाल्यानंतर पाप्यांचा एकच जो तारणारा ज्याचा कामाची योग्यता ज्याचा पुण्याचें सामर्थ्य आणि ज्याच्या कृपेची शक्ती कृष्णापाला आवडली आणि त्याच्या अंतः

अंतःकरणांत प्रतिबिंबित झाली तो उपदेश होई तेथें नियमाने जात असें आणि वारंवार एकांतांत प्रार्थना करीत असे. कांहींशा काळानंतर ख्रीस्ती धर्म प्रसिद्ध रीतीने आचरावयास इच्छित असतां त्याला आणि त्याचा जो भाऊ त्यालाहि भाषणें उपयोगीं पडलीं त्यांस बाप्तिस्मा दिल्हा आणि देवळाच्या मंडळींत घेतलें त्यानी जानवीं तोडून आणि ब्राह्मण जातिदर्शक सर्व बाहेरील चिन्हें टाकून अंतरांतील मूर्तिपूजनाचा अभिमानहि सोडिला.” कृ“ष्णापाला देवालयांत घेतल्यानंतर त्याने तारणाराच्याशी“तीमुळें आपल्या देशाच्या मूर्तिपूजक लोकांत ख्रीस्ताचें “गौरव आणि धर्म वाढिवण्यांत उद्युक्त झाला. त्याने धर्मोप“देशकांबरोबर त्याच्या उपदेश करण्याच्या ठिकाणीं जावें “आणि फार आवेशाने मूर्तिपूजकांचीं नीच कर्में प्रसिद्ध “करावीं दयेचें शुभवर्तमान प्रगट करी आणि ज्या ख्री“स्ताच्या महत्वाचा अनुभव त्याला झाला होता त्याला “शरण जायास सांगे. असल्या कामांत परिपूर्ण होण्या“करितां त्याने मोठ्या तत्परतेने ख्रीस्ती शास्त्राचा अ“भ्यास केला तेणेंकरून ख्रीस्ती धर्मावर त्याचा पूर्ण नि“श्चय झाला आणि उपयोगी त्यांत त्याला अधिक गम्य“ता झाली आणि उपयोगी गोष्टी समजल्या.” मेस्तर रीड

रीड ह्मणतो "त्याच्या स्थितींत बहुत फेरफार झाल्यानंत-
"र म्या त्याला माझ्याजवळ मुनशीचें काम सांगितलें
"त्याचाकरीत तो मला फार उपयोगीं पडला. त्याने आप-
"ल्या तारणारासंबंधी उपदेश करण्याचें श्रामिक काम आ-
"नंदाने पत्करिलें. ख्रीस्ती सन १८३१ च्या मार्च महिन्यांत
"बलारी सोडून तो धर्मोपदेशकांबरोबर हंपीच्या उत्साह-
"स्थानीं बहुत लोकांचा समुदाय मिळतो त्याना ख्रीस्तीध-
"र्माचा उपदेश करण्यासाठीं निघाला. परंतु पहिल्या म-
"जलेवर एका मनुष्यास कांहीं घरच्या कामासाठीं पर-
"तून बलारीस जावें लागलें होतें त्यासाठीं सर्व मंडळी
"राहिली होती तेथें त्याला वाखा होऊन पांच तासानं-
"तर तो चिरकालच्या जगांत जाता झाला. त्याच्या मर-
"णाच्या कांहीं दिवस पूर्वीं त्याच्या आत्म्यास फारच गं-
"भीरपणा आणि अतिभक्ति प्राप्त झाली होती ती येथ-
"पर्यंत कीं त्याच्या मंडळींतील लोकांस त्याविषयीं आ-
"श्चर्य वाटलें होतें. त्याला वाखा होण्याच्या पूर्वीं त्याला
"सकाळीं मंडळींत प्रार्थना करावयास बोलाविलें अस-
"तां त्याने परम सद्गद होऊन आणि पवित्रतेने प्रार्थ-
"ना केली. मरणाच्या पूर्वीं कांहीं घटका तो सावध होता
"आणि जेव्हां त्याच्या वेधना किंचित् उण्या झाल्या ते-

व्हां

"व्हां त्याने नम्र पश्चात्ताप झालेल्या पाप्यासारिखें असें
"भाषण केलें कीं जसें त्याला ख्रीस्ताच्या पुण्याने समाधा-
"न मिळालें. ख्रीस्तावर त्याचा विश्वास अचल होता आ-
"णि त्याला आकाशाच्या प्राप्तीच्या आशा फार आणि अ-
"टळ होत्या त्याने शेवटीं असे शब्द ह्मटले कीं 'मी मा-
"झ्या प्रियकर तारणाराजवळ जातों."

ख्रीस्ती सन १८१८ मध्यें श्रीरामपुरामधील धर्मोप-
देशकांच्या मंडळीसंबंधी ६०० लोक मुलानी ख्रीस्ती धर्म
धरिला होता. डाक्तर ब्रौन आपल्या धर्म प्रसार संबंधीं इ-
तिहासांत असें ह्मणतो कीं "नीच पदवीच्या लोकांवाचून
"दुसरे कोणी ख्रीस्ती धर्म घेणार नाहींत असें सर्वत्र सम-
"जतात परंतु ती मोठी चूक आहे. ख्रीस्ती धर्मांत जे आ-
"ले आहेत त्यांत ब्राह्मण आणि अणखीहि उत्तम वर्णां-
"चे पुरुष आहेत." त्यांतून कितीएक आपल्या देशाच्या
अज्ञात लोकांस ख्रीस्ती धर्माचा उपदेश करितात.

कलकत्यामध्यें प्रतिष्ठीत लोकांचीं कांहीं मुलें ज्या-
नी मोठ्या शाळांत विद्यासंपादन केली त्यानी ख्रीस्ती ध-
र्म धरिला आहे. मुंबईतील दर्पणांत त्यांच्या बाप्तिस्मा-
विषयीं कोठे कोठें सुचना केल्या आहेत. इन्क्वायरर व-
र्तमानपत्राचा कर्त्ता त्यांतील एक पुरुष आहे.

मुंबई

मुंबई खालच्या देशांत अद्यापि तिकडील लोकांपेक्षां थोडया लोकानी ख्रीस्ती धर्म धरिला. परंतु ज्यानी मूर्तिपूजन आणि खोटे देव सोडून दिल्हे त्यांत कितीएक बरेच बुद्धिमान आणि संपन्न ब्राह्मणहि आहेत.

विद्वान हिंदूनी ख्रीस्ती धर्म धरिला आहे यास अणखीहि उदाहरणें आहेत परंतु तींहि याच प्रमाणें समजावीं. अपर आत्म्याची किमत आणि मध्यम आणि कनिष्ठ प्रतीचे लोक देवापासून धिःकारले जात नाहींत यांचा जेव्हां विचार करितील आणि ख्रीस्ती धर्माचें ज्ञान आणि विश्वास वाढतो आहे असें म्या लिहिलें आहे त्याचा जेव्हां नीट विचार करितील तेव्हां असें दिसेल कीं ह्या देशांत फार मोठें काम वाढत चाललें आहे. त्यासाठीं जें द्रव्य आणि श्रम खर्चले आहेत त्यांपेक्षां अनंत वांटूयाने अधिक हितावह आहे. जे ख्रीस्ती लोक हें द्रव्य खर्चितात आणि श्रम करितात ते समजतात कीं तारणांराची सेवा करणें आणि मनुष्याचें कल्याण करणें हा त्यांचा धर्म आणि अधिकार आहे. ईश्वराचें गौरव करण्याची फार हौस आणि हिंदू भावांची सप्रेम प्रीती यांसाठीं ते अधिक द्रव्य आणि श्रम अर्पण करितील असी माझी आशा आहे. ईश्वराची आ

शीं

ज्ञा त्यानी तें काम करावें असी आहे आणि त्याचा पूर्ण विजय होईल असें ईश्वराचें वचन आहे.

ख्रीस्ती धर्मांत श्रीमंतावर जसी कृपा होती तसीच गरीबांवरहि होती त्याविषयीं नारायणरावाने त्याजवर स्पष्ट दूषण आणलें नाहीं. ख्रीस्ती धर्मांत तसें आहे म्हणून त्याला वाईट वाटतें असें त्याच्या एका वाक्यावरून मी अनुमान करितों. त्यासाठीं मी त्याला आणि त्याच्या मतासारिखे जे असतील त्यांस सांगतों कीं ख्रीस्ती धर्मांत तीएक फारच उत्तम गोष्ट आहे. ख्रीस्ती धर्मांत जे जे जातील त्यांस त्यांतील पुण्य मिळेल आणि मनुष्यांच्या स्वरूपाची मान्यता होणार नाहीं हिंदूशास्त्रांत गरीब लोकांस हलके गणलें आहे तेणेंकरूनहि तो धर्म मनुष्याने आणि पापी मनुष्याने कल्पिला आहे असें सिद्ध होतें. त्यांत असें सांगितलें आहे कीं त्यांच्या पूर्वजन्मीं पाप केलें म्हणून त्यांस दरिद्रप्राप्त होतें यद्यपि जरीं त्यांस त्याचें स्मरण होत नाहीं आणि मातबर लोकांस उद्धार होण्याचे जे जे उपाय आहेत ते त्यांस नाहींत तर त्यानी तसेंच असावें. त्यांत मातबरांस असें सांगितलें आहे कीं त्यांच्या पूर्वजन्मींच्या पुण्य संचयामुळें त्यांस आतां संपत्ती प्राप्त

झाली

झाली आणि त्यांनी खुशाल विषय भोगावे त्याविषयींत्यां-
स कांहीं भय नाहीं. त्या धर्मांत सर्व मुख्य लाभ ब्राह्मणांस
आहेत आणि शूद्रांस नाहींत.

नारायणरावानें आपल्या पुस्तकाच्या शेवटीं थो-
डे विचार लिहिले आहेत ते बहुधा लक्ष्यास योग्य नाहीं-
त.

त्यानें महादेव चंदमलिकाविषयीं जें लिहिलें आहे
त्यावरून असें दिसतें कीं तो मलिक आणि त्याचे मित्र पु-
नः हिंदूधर्मांत शिरतील असी नारायणरावाला आशा
आहे परंतु असें घडणें बहुधा होणार नाहीं. त्याविषयीं
मी विशेष ह्मणत नाहीं परंतु नारायण स्मरण करो कीं
बाटलेल्या मनुष्यांस हिंदूधर्मांत पुनः घेण्याविषयीं
फारसा प्रतिबंध नाहीं. ब्राह्मणांस कांहीं भोजनें कांहीं
रुपयांची दक्षणा देणे किंचित् प्रयास करणे कांहीं नि-
रर्थक मंत्राचा घोष करणें कोणे एका नदींत किंवा तळ्या-
वर स्नान करणें आणि कांहीं शेणाच्या गोळ्या खाणें हें
त्या भ्रष्ट मनुष्यानें सर्वांबरोबर एकत्र बसून भोजन के-
लें नसतां पुष्कळ झालें. मग मनांतील विचार कसेहि अ-
सोत त्याचें कांहींच नाहीं.

नारायणराव ह्मणतो कीं ख्रीस्ती शास्त्रांत दोष
आहेत

आहेत ते काढून दाखविले नाहींत त्यास तो समजतो कीं त्या-
ने कांहीं दोष स्थापित केले आहेत. तो जर मागील पत्रें वाची-
ल तर आपणच चुकलों असें त्याला दिसेल. मला वाटतें कीं
त्यालाहि तसीच भ्रांती झाली. ह्मणून तो हिंदूधर्माच्या द्वे-
ष करणारांची प्रार्थना करितो कीं त्यांनी त्या धर्माचें रक्षण
करावें. तो ह्मणतो कीं त्या धर्मांत जे गम्य आहेत त्यांना त्यां-
त कांहींच शंका वाटत नाहीं जसें ख्रीस्ती धर्मांत जे प्रवीण
आहेत त्यानाहि आपल्या धर्मांत बाधकें वाटत नाहींत त-
सें तर मग हें आश्चर्य आहे कीं नारायणराव असें ह्मणतो
मात्र परंतु त्या धर्मावरील दूषणाचें एकहि उत्तर दिल्हें नाहीं.
मी सांगतों त्याचा त्याला राग येऊं नये कीं त्याच्यानें किं-
वा कोणी कसाहि विद्वान आणि चतुर ब्राह्मण असो त्या-
च्यानें खऱ्या वादानें आणि प्रमाणानें हिंदूधर्माचें स्थापन
करवणार नाहीं. ख्रीस्ती शास्त्रांत बाबेलाच्या मोठ्या गोपु-
राविषयीं जसें ह्मटलेलें आहे त्याप्रमाणें तो धर्म मनुष्या-
च्या अभिमानानें मूर्खत्वानें आणि पापानें उभा केलेला
तो पडायासाठींच उभा आहे आणि तो लवकर पडतो आ-
हे परंतु तो पडेल त्याचा कोणास खेद वाटूं नये. देवानें
पवित्र आश्रम आपल्या निर्भय अक्षय राजासनासारि-
खा उभा केला आहे त्यांत दुर्बळ जातीनें आश्रय पावा-
वा

या त्यांत त्यानी निर्भय राहावें आणि त्यांत त्यानी अनिर्वाच्य अखंड सुख भोगावें. ईश्वर मनुष्यांला खचित सांगतो कीं जे त्या आश्रमांत जाणार नाहींत ते निखालस लय पावतील. परंतु उद्धार होण्याविषयीं मनुष्याची प्रीति केली आहे तिजमुळें ईश्वर आपल्या सत्याने आत्म्याने आणि नियमाने मनुष्यांस त्या आश्रमांत जायास सांगतो. त्या देवाच्या आज्ञेप्रमाणें नारायणरावाला मी ममतेने आणि हौसेने त्या आश्रमांत जाण्याचा मार्ग दाखवितों आणि इहलोकीं आणि परलोकीं मी त्याचें शुभ इच्छून त्याची आज्ञा घेतों. ईश्वर आपल्या परमकृपेने असें करो कीं नारायणरावाला आणि त्याच्या स्वदेशीय लोकांला उद्धार होण्याचीं आवश्यकता स्पष्ट दिसून येवो. आणि उद्धार येशूख्रीस्तांत आहे असें दिसो ज्या ख्रीस्ताने जगाच्या प्रीतीमुळें मनुष्यदेह धारण करून पापाचें हवन होण्याविषयीं आपला प्राण दिल्हा आणि आह्मी केवळ अयोग्य असतां आह्मावर त्याची दया पुष्कळ आहे आणि जे त्याजवर विश्वास धरितात त्यांस आपल्या आत्म्याने पवित्र करायास आणि आकाशांतील आनंद द्यायास तो सिद्ध आहे.

जान विल्सन.